साळअखेर ॥ ७ ॥ ८८

किरकोळ अंकास ...................८४

नोटिशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ८१८६

दुसरे खेपेस ........८१

Six monthly............3 " 8 as.

Single copy...............................4 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3as

VOL XXVII AKOLA 4 MONDAY DECEMBER 1893 NO 47

वर्ष २७ आकाला सोमवार तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९३ इ० अंक ४७



अमूल्य ऐतिहासिक . थ

सुप्रसिद्ध व अतुल पराक्रमी

## झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाईसाहेब ह्यांचें चरित्र.

( दोन सुंदर तसबिरीसह )

सन १८५७ च्या बंडामध्यें सर ह्यू रोज सारख्या युद्धकलाविशारद सेनापतीस व अखिल इंग्रज सैन्यास पराक्रम गुणानें थक्क करून सोडल्यामुळें सर्व जगास श्रुत झालेल्या झांशी संस्थानच्या महाराणी लक्ष्मीबाई साहेब ह्यांचें मनोरम चरित्र खुद्द त्यांचे दत्तकपुत्र श्रीमंत दामोदरराव व मातुश्री चिमाबाई साहेब ह्यांच्याकडून व रा० ब० चिंतामण वैद्य, मि० डिग्बी सी. आय. इ. इत्यादिकांच्या सद्गृहस्थांच्या मदतीनें आधार व विश्वसनीय माहिती मिळवून लिहिलें आहे. ह्यांत सर जान के, माल्सिन, डा० लो, इव्हान्स बेल, व चार्लस म्याकफर्सन इत्यादि अनेक इंग्रज इतिहासकारांच्या लेखांचाही योग्य उपयोग केला आहे. त्यामुळें हें पुस्तक फार महत्वाचें व अत्यंत मनोरंजक झालें आहे. राणी साहेबांचें बाळपणापासूनचें एकंदर साद्यंत चरित्र, झांशी संस्थान लार्ड डलहौसीनीं खालसा केलें तो वृतांत व पुढें बंड होऊन झांशी, काल्पी, ग्वाल्हेर इत्यादि ठिकाणीं झालेले घनघोर संग्राम व त्यात व्यक्त झालेले राणी साहेबांचें अद्वितीय शौर्य इत्यादि गोष्टींचा खरा इतिहास ह्या पुस्तकामध्यें फार चटकदार रीतीनें विस्तारपणें लिहिला गेला आहे. पुस्तकाच्या शेवटीं राणीसाहेबांचा हृदयद्रावक मृत्यु व श्री० दामोदररावांचा करुणरसपूरित जीवन वृतांत जो दिला आहे तो वाचून ज्याच्या डोळ्यांतून अश्रुपात होणार नाहीं असा मनुष्य विरळा. मराठी भाषेमध्यें अद्वितीय स्त्रीचा, दुर्मिळ ऐतिहासिक माहितीनें परिष्कृत असा हा पहिलाच चरित्र ग्रंथ आहे. हा ग्रंथ 'निर्णयसागर' मध्यें छापत असून डिसेंबरमध्यें तयार होईल. बारीक टाइपाचीं पृष्ठें ३०० पेक्षां जास्त होतील. पुस्तकाची किंमत साधें बायंडिंग २ रुपये व कापडी बायंडिंग व सोनेरी नांव २॥ रुपये. टपाल व व्ही. पे. चा खर्च निराळा पडेल. सदर मुदतीपुढें घेणारास किंमत जास्त पडेल.

विशेष फायदाः— नोव्हेंबरपर्यंत ह्या चरित्रास जे आश्रय देतील त्यांस लोकप्रिय झालेलें व विद्वानांनीं नावाजलेलें सुंदर मासिक पुस्तक महाराष्ट्र कोकिळ एक वर्षभर निम्या किंमतीस ह्मणजे टपाल हशिलासह ८११ आण्यास मिळेल. ग्राहकांनीं नांवें त्वरित पाठवावी.

पत्ता.— रा० रा० व्यवस्थापक महाराष्ट्र कोकिळ सातारा.


Out of the shadow of night.
The world moves into light.
It is day—break everywhere.
Lougfellow.

सर्व जगाच्या व त्यांतून सुधरलेल्या देशांच्या स्थितीकडे थोडीशी नजर फेंकिली तर असें दिसून येईल कीं सर्व ठिकाणीं प्रत्येक क्षणांत मोठमोठाल्या अद्ला बदली होत आहेत यांहूनपेक्षां अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां हेंही दिसून येईल कीं पुढें येणारें शतक जगाच्या इतिहासांत फारच महत्वाचें होणार आहे, व चालू शतक ह्मणजे १९ वें शतक हें पुढील शतकाच्या प्रस्तावने दाखल आहे असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. १९ व्या शतकांतही मोठमोठ्या गोष्टी झाल्या नाहींत असें नाहीं. परंतु कालाच्या रहाटीवरून असें अनुमान होतें कीं हा नुकता आरंभच आहे. कारण पुढें काय होणार हें पाहण्या करितां "ग्रहज्ञावरा दि" ज्योतिष शास्त्रें धुंडाळण्याची गरज नाहीं. ज्या गोष्टी मागें घडल्या त्या वरून हल्लीं कसकसें घडतें याचें अनुमान स्थूळ दृष्टीनें करितां येतें. तसेंच हल्लीं ज्या गोष्टी घडतात त्यावरून पुढील गोष्टींचा संभवनीय तर्क काढणें फारसें चुकीचें होणार नाहीं. हा तर्क नेहमींच बरोबर पटतो असें नाहीं तरी त्या पैकीं बहुतेक ठोकळ गोष्टी जुळण्यास फारशी अडचण पडत नाहीं. सृष्टिक्रमावरून सर्व मनुष्यांना पुढें मोठा सुदिन येणार आहे असें म्हणणें सर्वांशींच खोटें ठरणार नाहीं. त्या वेळीं मनुष्य हा सर्व सृष्टीचा व सर्व वस्तूंचा मालक होऊन पंचमहाभूतें जणूं काय त्याचे बंदे गुलाम असें होईल; व हा समय फार लांब आहे असें नाहीं. ह्या गोष्टीस बळकट प्रमाण म्हटलें ह्मणजे आजपर्यंतचा अनुभव हेंच होय.

एका मागून एक घडणाऱ्या गोष्टींशीं कार्य कारणभावाचा संबंध मुळींच नसतां व साखळींत अडकविलेल्या कड्यांच्या जुडग्याप्रमाणें आजपर्यंत घडलेल्या गोष्टींचा परस्पर संबंध असतां तर वेळेचीं चिन्हें मुळींच दिसलीं नसतीं. परंतु ज्या प्रमाणें आजचा दिवस गेला ह्मणजे उद्याचा दिवस उगवलाच पाहिजे, एक साल गेलें कीं दुसरे यावयाचेंच त्याप्रमाणें "प्रसाद चिन्हानि पुरःफलानि" ह्या कालिदासाच्या उक्तीची सत्यता थोड्या बहुत प्रमाणानें व्यवहारांत दृष्टोत्पत्तीस आलीच पाहिजे मागील स्थितीवरून सद्य स्थितीचीं व सद्यः स्थितीवरून भविष्य स्थितीची प्रमाणयुक्त अनुमानें निघालींच पाहिजेत.

आतां चालू शतकांत काय काय घडलें ह्या विषयींचें दिग्दर्शन थोडक्यांत करूं.

सर्व मनुष्यांना सारख्याच लागूं पडणाऱ्या व तितक्याच महत्वाच्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे "वेळ व स्थळ" ह्या होत. ह्याच गोष्टी मनुष्याच्या उन्नतीला कारणीभूत होतात. ह्या दोन गोष्टींत बदल झाला ह्मणजे मनुष्याच्या स्थितींतही बदल होतोच. त्याचप्रमाणें अर्वाचीन सुधारणेची गति जास्त वाढण्यास दोन मुख्य गोष्टी "वाफ आणि विद्युत" ह्या होत. ह्या दोन गोष्टींच्या साह्यानें अत्यंत दूरचीं राष्ट्रें अगदीं शेजारीं आणून ठेवल्या सारखीं वाटतात. सुमारें ६०।७० वर्षांपूर्वी ज्या गोष्टी होण्याला आठ पंधरा दिवस लागत त्या गोष्टी हल्लीं एका दिवसांत होतात. वेळ वाचविणाऱ्या यंत्रांची योजना रोजच्या काम धंद्यांतही झाली आहे. पूर्वी प्रवासाचे बोली "महिने व वर्षे" ह्यांवर होती ती हल्लीं दिवस व तास ह्यावर आली आहे. १।२० दिवसांच्या अवकाशांत पाताळांतून मृत्यु लोकांत जातां येऊं लागलें. एकमेकांचें दळणवळण पूर्वीपेक्षां जास्त वाढल्यामुळें नवीन नवीन कल्पना निघून त्या सर्वांस फार लवकर कळतात. लोकमत ह्मणजे काय वतें कसें प्रगट करावें वगैरे गोष्टी सर्वांसच समजू लागल्या आहेत. ज्या गोष्टी अमलांत येण्याला प्राचीन काळीं वर्षेंगणती लागणार त्या गोष्टी हल्लीं हां हां ह्मणतां होतात. इतकें जरी झालें तरी ह्या सर्व गोष्टी येथेंच थांबावयाच्या नाहींत व त्यांचे खरे परिणाम आपल्या दृष्टीस अद्याप पडले नाहींत.

हल्लींच्या स्थिती वरून जगांतील कोणताही भाग कितीही दूर असो तो अप्रसिद्ध असा फार वेळ राहणारच नाहीं व तो रानटी स्थितींत असला तरी तेथें ज्ञान-सूर्याचे किरण पोंहोंचल्या वांचून राहणारच नाहींत. ह्या गोष्टीचीं उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे आफ्रिकेचा कांहीं भाग, आस्ट्रेलिया व समुद्रांतील बहुतेक बेटें हीं होत. ह्या ठिकाणची स्थिति बघतां बघतां बरीच सुधारली व ते देश कांहीं दिवसांनीं आपल्या पुढेंही जातील.

देशाचा संबंध इतर राष्ट्रांशीं जसजसा जास्त होत जातो तसतशीं तेथील स्थिति जास्त सुधारत जाते. यूरोपचा समुद्रकिनारा असा कांहीं चमत्कारिक आहे कीं जगांतील बहुतेक खंडांशीं त्याचा थोडा बहुत तरी संबंध अहेच. ह्या मुळेंच तें खंड सुधारणेचें आदिस्थान होऊन बसलें आहे. एशिया खंडामधील अतिशय उंच व लांबवर पसरलेले पर्वत, विस्तीर्ण अरण्यें, उष्ण हवा, नौकानयनाच्या साधनांचा अभाव व अफाट समुद्र ह्या, व ह्या प्रकारच्या दुसऱ्या अनेक गैरसोयीमुळें यूरोपपेक्षां एशियाखंड सुधारणेंत बरेंच मागें आहे. त्या प्रमाणेंच आफ्रिकेचा जो भाग भूमध्यसमुद्राजवळ आहे तेवढ्या भागांत कांहीं कांहीं सुधारणा झालेली आढळते. परंतु बाकीचे भाग अद्याप रानटी स्थितींत आहेत. शिवाय एशियाखंडापेक्षां आफ्रिकेचा किनारा कमी सोयींचा आहे, ह्मणून च तेथील लोक अजून मागें आहेत. परंतु हे लोक अज्ञानावस्थेंत आतां फारच थोडा वेळ राहतील; कारण जगाच्या सुधारणेचा कल असा अहे कीं जे लोक मागें पडले आहेत त्यांना बाकीच्या लोकांबरोबर आणावयाचें आणि असें झालें ह्मणजे रानटीपणाच अगदीं नाहींसा होईल. ह्या प्रमाणें जगाची समाजस्थिति फारच झपाट्यानें बदलत चालली आहे.

आतां जगाची राजकीय स्थिति कशी आहे हें थोडक्यांत पाहूं.

१८ व्या शतकांत इंग्लंड खेरीज करून सर्व यूरोपभर स्वतंत्रता नव्हती. लुई (१९) वा यानें तर आपल्या कारकिर्दींत मोंगली अंमल गाजविला. परंतु पुढें फ्रेंच लोकांनीं जी राज्यक्रांति केली त्या मुळें जवळपासच्या सर्व लोकांचे डोळे उघडले व त्या नंतर त्यांनीं स्वतंत्रतेचा मार्ग शोधून काढण्याची तयारी केली. नेपोलियन बोनापार्ट यानें आपला मतलब साधण्या करितां येवढा मोठा व्यूह रचला, तरी तो लोकांच्या हक्काला अनुकूलच झाला व त्या वेळीं जुलमी अंमल जरी थोडा वेळ चालला तथापि तेव्हां पासून प्रजासत्तात्मक राज्यपद्धतीला विशेष बळकटी येत चालली.

"रॉबर्ट मेकंझी" आपल्या "१९ व्या शतकांत" ह्मणतात कीं, "६०।७० वर्षांपूर्वी यूरोपमध्यें जुलमी अंमल चालूं होता. परंतु आज मितीला पाहिलें तर पाश्चिम यूरोपांतील सर्व राज्यें प्रजेच्याच सत्तेनें चालतात." स्वाभाविक व पायाशुद्ध सुधारणेस स्वतंत्रता हीच कारणीभूत आहे. ही सुधारणा फारच महत्वाची आहे असें ह्मटलें पाहिजे. कारण जुलमी राज्यपद्धति सुधारणेला मोठा अडथळा आणते व हें कुंपण हुसकून दिल्याशिवाय सुधारणेची स्थापना योग्य रीतीनें होणें कठीण आहे. राष्ट्रांची सुधारणा नेहमीं दोन बाजूंनीं होत असते. एक व्यक्तीची सुधारणा व दुसरी समाजसुधारणा. दुसरी सुधारणा पहिलीवर अवलंबून असते. कारण व्यक्तीमात्र सुधारल्याशिवाय समाज सुधारत नाहीं. यूरोपमध्यें कांहीं काळपर्यंत एकतर्फीच सुधारणा होत असे. परंतु यूरोपांत १८ व्या शतकांत समाजसुधारणा फारच विलक्षण रीतीनें झाल्यामुळें तेथील लोकांना लवकरच फलप्राप्ति झाली. अमुक प्रकारची सुधारणा आताचे आं झाली पाहिजे असें होणें फारच कठीण आहे. समाजसुधारणा करणें ह्मणजे शिंप्याकडे जाऊन नवीन तऱ्हेचे कपडे शिवविणें इतकें सारखें सोपें नसून ती आपो आप झाली पाहिजे हें तत्व प्रत्येकानें लक्ष्यांत धरून केलें असतां कोणत्याही प्रकारचा दुष्परिणाम होण्याची भीति नसते.

या नंतर ह्या शतकांतील शास्त्रीय शोध कोणते झाले व त्या पासून एकंदर लोकसमूहावर कोणता परिणाम झाला हें पाहणें अगदीं जरूरीचें आहे. ह्या शतकात शास्त्रीय शोध बरेच लागले आहेत. ते सर्व येथें दिले असतां बरीच मोठी याद होईल. व त्यां पैकीं बहुतेक माहीत असल्यामुळें सर्वांचीं नांवें देण्यांत विशेष तात्पर्य नाहीं.

प्रवासाची उत्तम सोय झाल्यामुळें जगांतील दूरदूरच्या निरनिराळ्या राष्ट्रांचा निकट संबंध होऊन परस्परांची ओळख वाढत चालली. छापण्याची कला निघाल्यामुळें ज्ञान वाढण्याची साधनें सुलभ होऊन लोकांना ज्ञानाची अभिरुचि जास्त लागूं लागली आहे श्रम व वेळ वांचविणारीं यंत्रें निघाल्यामुळें जगांतील व्यापार व देवघेव अतोनात वाढून उद्योग करणारांस जास्त उत्तेजन मिळूं लागलें आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें लोकांच्या इच्छा जागृत होऊन या जगांतील जीवित जास्त सुखावह करण्यास जो तो खटपट करूं लागला आहे.

ही सुधारणा हळूं हळूं न होतां एकदम एकाच दिवशीं झाली असतां तर आपण ह्याच भूमंडळावर आहोंत किंवा सूर्यलोक, चंद्रलोक या सारख्या दुसऱ्या लोकांत आपली बदली झाली आहे कीं काय अशी आपणांला भ्रांति पडली असती. इतकें जरी झालें तरी जो शोध पुढें लागणार आहे त्याचा हा आरंभ देखील नाहीं असें ह्मणणें वावगें होणार नाहीं.

शास्त्रीय शोधापासून दुसरे अनेक फायदे झाले आहेत त्यां पैकीं मुख्य फायदा ह्मटला ह्मणजे "पुरातन कालीमुळें मनुष्यांच्या रीती भातींत व समजुतींत गैरे समजाचें जंग चढून निराळेंच स्वरूप बनून गेलें आहे. तें नाहींसें होऊन सत्याचा जय होत चालला आहे" हा होय. अर्थांत त्यामुळें मनाला कार्यकारणभाव पाहण्याची संवय लागली ह्मणजे मानसिक भोळेपण व वेडगळपणीं नाहींसा होत जातो. त्यामुळें सत्याची चिकित्सा होऊन सत्याचाच जय दृढतर होतो हें अनुभवावरून सिद्ध होतें.

व्यापार वाढल्यामुळें एकमेकांत चढाओढ लागते व त्यापासून चांगलींच फळें निष्पन्न होतात. ही स्पर्धा कोणत्या प्रकारची पहिजे हें निराळें सांगायाला नकोच. मनुष्यें पुष्कळ उत्पन्न होऊन ती कितीही स्वस्त झालीं तरी त्यांच्यानें वाफेची बरोबरी करवणार नाहीं. १८८७ सालीं बर्लिन येथें जो अंदाज केला त्यावरून असें कळतें कीं "वाफेच्या यंत्रांनीं १,०००,०००,००० मनुष्यांचें काम केलें; ह्मणजे ह्या पृथ्वीवर काम करणारे जितके लोक आहेत त्यांचे तिप्पट मनुष्यांनी जितकें काम केलें असतें तितकें काम वाफेच्या यंत्रांनीं केलें" यावरून ह्या दोघांना "देव व दानव" यांचीच उपमा शोभण्याजोगी आहे. १०० मनुष्यें एका आठवड्यांत तोंड जितकें काम करतील तितकें किंवा त्याहून ज्यास्त काम वाफेचें यंत्र एका दिवसांत करून टाकील.

ह्या सर्व गोष्टींचा योग्य विचार करून आपण आपल्या स्थितीकडे पाहिलें तर आपली आपल्यालाच मोठी शरम वाटते. जर आपणाला ह्या जगांत नांव किंवा कीर्ति घेऊन आपण सुधारलेलें राष्ट्र आहें असें दाखवावयाचें असेल तर आपणांला शास्त्रीय ज्ञानाची अत्यावश्यकता आहे हें कोणीही नाकबूल करणार नाहीं. हा हेतु सिद्धीस नेण्यास आपणांला हे विषय शाळेंतील शिक्षणक्रमांत घातले पाहिजे.

परंतु शाळेंतील विषय पाहिले तर मोठें आश्चर्य वाटतें. शास्त्रीय विषय उच्च प्रतीच्या शाळांतूनच बहुत शिकविले जातात, कांहीं शास्त्रीय नाहीं त्यांचा आरंभ आद्य शिक्षणांत केला असतां त्यापासून मोठें फळ मिळण्याचा संभव आहे. कारण मुलांना ल्हानपणापासून तशा प्रकारचा विचार करण्याची संवय लागून त्यांची बुद्धि वाढण्याचा संभव असतो इतकेंच नाहीं परंतु त्यापासून खरोखरच कांहीं तरी फायदा झालाच पाहिजे. शास्त्रीय विषय शाळांतून शिकविण्याकरितां त्या खात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनींच कांहीं तरी चळवळ केली पाहिजे कदाचित सरकारचें मत ह्या गोष्टीला प्रतिकूल असल (व सरकारचें तसें करणें साक्षगिरीचें होईल) तर मात्र त्याबद्दल कोणलाच दोष देतां येत नाहीं. परंतु ज्यांनीं खासगी शाळा स्थापन केल्या आहेत त्यांनीं तरी आपापल्या शाळांतून शास्त्रीय विषय शिकविण्याची कळकळ बाळगून तसें शिक्षण दिलें तर थोडक्याच काळांत त्यापासून होणारा अमोलिक फायदा लोकांच्या डोळ्यापुढें आल्या वांचून राहणार नाहीं. यास्तव ज्या सरकारी अधिकाऱ्यांना किंवा खासगी शाळांच्या चालकांना ह्या वरील सूचनांचा यथायोग्य उपयोग करून घेतां येईल ते आपल्या कडून होतां होईल तोंपर्यंत तसें करण्यास कसूर करणार नाहींत अशी सविनय प्रार्थना करून आह्मी हा लेख येथेंच समाप्त करितों,

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य १२ शके १८१५

नामदार दादाभाई नवरोजी एम. पी. हे परवां सायंकाळीं मुंबई बंदरांत दाखल झाल्यावर दुसरे दिवशीं ह्मणजे रविवारीं प्रातःकाळीं बहुमानानें वाजत गाजत त्यांचें स्वागत करून त्यांस स्वगृहीं पोंहोचविण्याचा मुंबईतील मुख्य मुख्य कांग्रेसवाल्या लोकांनीं ठराव केला त्या प्रमाणें काल रोजीं सर्व समारंभ उत्तम प्रकारें घडून आला असेलच. लोककार्या साठीं देह झिजविणारा महात्मा दुर्यैत विरळा निपजतो अशा उत्तम कोटींतला थोर पुरुष विजयी होऊन परत स्वदेशीं आला ह्मणून लोक त्याचा धन्यवाद गातील यांत नवल तें काय!

मि. ह्यूम साहेब हल्लीं हिंदुस्थानांतील कांग्रेस कमिट्यांच्या प्रांतिक सदर सदर ठिकाणीं जाऊन लोकांची अखेरची भेट घेत आहेत. त्यांच्या आगमना निमित्त जागजागीं सभा भरतात, त्यास मानपत्रें देतात त्यांच्या परमपूज्य सन्मूर्ती वर लोक पुष्पांजळी उधळतात, आणि त्यांचा सन्मान केल्यानें आपल्यास धन्य व कृतकृत्य समजतात. पण मि ह्यूम यांच्या दर्शना मुळें लोकामध्यें जें देश सेवेचे वारें शिरतें, राष्ट्रीय सभेचीं कार्यें करण्यास जें स्फुरण चढतें, आणि त्यांच्या उदहरणानें जी अनुकरणबुद्धि जागृत होते त्या सर्वांचें महत्व फार मोठें आहे आणि त्याचें फळ ही परिणामीं अत्यंत हितकारक आहे. राष्ट्रीय सभेच्या बैठकी मुळें जो राष्ट्रीयपणा लोकामध्यें येत चालला आहे त्याहून अधिक जोरानें व सत्वर लोकांच्या हृदयांत राष्ट्रीयपणा मि. ह्यूम साहेब आपल्या समक्ष भेटीनें प्रेरित चालले आहेत. हा लाभ अमोल; अद्वितीय, व चिरकालीन आहे. एकट्या मि. ह्युम साहेबांच्या सत्कृतीनें हा अवाढव्य देश आपापल्या धर्माच्या, ज्ञातीच्या, भाषेच्या व आचारविचाराच्या भिन्नपणाला विसरून एक दिलानें एकवटला आहे आणि एक राष्ट्रत्वाच्या पदवीला पोचला आहे हें कळविलें ह्मणजे त्या सत्पुरुषाच्या थोरवीची कल्पना होईल. या आठवड्याच्या अखेरीस मि. ह्यूम साहेब मद्रासेकडे गेले आहेत तिकडे त्यांच्या सन्मानार्थ फार कडेकोट तयारी चालली होती.

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण.

( ४९ वे अंकावरून पुढें चालूं )

देशाची लोक संख्या २८ कोटी आहे या पैकीं निम्मी प्रजा अन्नान्न करीत फिरत आहे! मग वस्त्रप्रावरणाची गोष्ट तर राहूंच द्या. कसें तरी मोलमजुरी करून पोट भरणार! त्या मध्येंच सर्व आयुष्य जाणार! मग शिक्षणाची कल्पना त्यांच्या डोक्यांत कोठून येणार! व आली तरी उपयोग काय? अगोदर पोटाचीच जर व्यवस्था नाहीं मग शिक्षणाची गोष्ट कशाला पाहिजे! बाकी राहिलेल्या प्रजे पैकीं पुन्हां अर्धी प्रजा सरासरी पोट भरीत आहे! व कसें तरी करून अन्न पाण्याची व चिरगुट पांघरुणाची सोय करून घेत आहेत. बाकीच्या प्रजे पैकीं बरीच प्रजा मध्यम स्थितींत आहे. पण तिला प्राथमिक शिक्षणाकडे मात्र खर्च करण्याची ताकद आहे! हें तरी भीत भीतच म्हणावें लागतें. तें असो! आतां श्रीमंत लोक जे आहेत त्यांना शिक्षणाची मुळींच चाड नाहीं. ते बहुतेक व्यापारी लोक आहेत. त्यांचा धंदा पैसा जमवावयाचा! ते शिकण्याची काळजी घेतात कशाला! व त्यांना आपला देश आपले देशबांधव ह्या गोष्टी कुठें ठाऊक आहेत. मग त्यांच्या पासून मदत ती कसली मिळणार! प्रसिद्ध तत्ववेत्ता डाओजेनिस् यानें म्हटलें आहे कीं श्रीमंत जे आहेत त्यांना विद्येची किंमत कळत नाहीं. परंतु विद्वान जे आहेत त्यांना पैशाची किंमत पूर्ण पणें अवगत असते. म्हणून विद्वान धनवान लोकांची परवा बाळगतात. तशी परवा लक्षाधिश हे विद्ये संबंधानें अथवा विद्वाना संबंधानें बाळगीत नाहींत! व त्या तत्वाला अनुसरूनच आपल्या देशांतील श्रीमंताची गोष्ट आहे. आतां त्यांच्यांत हो कांहीं हरीचे लाल आहेत त्यांच्या पासून समजाला फायदा होतो. पण तो फायदा किती होणार! "सहारा" सारख्या वाळवंट प्रदेशांत जर एक मोठी पावसाची सर पडली तर तो प्रदेश जलयुक्त होईल काय? तर असे कळकळीचे लोक पुष्कळ झाले पाहिजेत! त्यांची तर उणीव आहे. ही उणीव भरून काढण्यास आम्हाला ब्रह्म देवा कडेच लेखी अर्ज पाठविला पाहिजे. असो. आतां जे उच्च प्रतीचें शिक्षण मिळविण्याचा प्रयत्न करितात त्यांची गोष्ट घेऊ. यातील कांहीं मध्यम स्थितींतले असतात व त्यांनां उच्च प्रतीचे शिक्षणा साठीं खर्च करण्या पुरतो ऐपत असते! पण अशा लोकांना, आपलें शिक्षण पुरें झालें म्हणजे लगेच आपली, आपल्या कुटुंबांच्या पोटाची व्यवस्था पहावी लागते. कारण वडिलांनीं जो थोडा पैसा मिळविला होता तो त्यांच्या शिक्षणाकडे खर्च केला गेला. व ह्मणून सर्व खजिना रिकामा पडला. त्याची ही भर हळू करण्याचें काम त्यानां करावें लागतें. असल्या पेचांत पडल्यावर आपल्या देशबांधवाच्या शिक्षणासाठीं हात भार तो काय लावणार! लेखणीची व तोंडाची मदत बरीच मिळते. पण ती पासून फायदा तो काय होणार! बरें कित्येकांची स्थिति शोचनीय असते. त्यांच्या वडिलांना किंवा पोशिद्यांना कर्ज काढावें लागतें. असें कर्ज काढून एकदाचें शिक्षण पुरें झालें मग पुढचा उद्योग ह्मटला ह्मणजे कर्ज फेडण्याचा. वाचक हो कर्जा सारखा दुसरा रोग नाहीं. त्याचें पथ्य पाणी करतां करतांच त्यांचा जीव जेरीस येतो. मग आपल्या देशबांधवांच्या शिक्षणाला ते मदत ती काय देणार. मनांत पुष्कळ असतें पण हातानें कांहीं होत नाहीं मग त्यांत अर्थ काय! बरें थोडे दोन चार पैसे जमले तर ते पुढल्या संतती साठीच ठेवावे लागतात. मग शिल्लक काय राहिलें. सारांश "चणे आहेत तों दांत नाहींत, दांत आहेत तों चणे नाहीत" अशी दशा आहे. या मुद्यासंबंधानें इतकेंच पुरें आहे.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 4, 1893

We acknowledge with thanks, the receipt of the Report of the Berar Municipalities. The report is on the whole interesting and instructive and affords considerable matter for reflection on the working and administration of the Municipalities.

There are in Berar eight Municipalities. The Municipal Act of 1886 providies for $\frac{3}{4}$ of the members to be elected and the remaining one-fourth to be nominated by the Government. The benefit of this provision is enjoyed to its full extent, by all the Municipalities excepting that of the Amraoti Camp—which is not as yet admitted to this elective franchise. The total number of members elected and nominated is 129; of these 90 are elected and the rest appointed by the Government; 35 are officials and 94 non-officials; 19 Europeans and 110 Natives.

1t is not a long time since the elective system was introduced in Berar and it is a happy augury and bids fair in the future, that the Municipalities have begun to appreciate the real value of the right conferred upon them. At present, this is the the only mode in, which Government can directly or indirectly impart political education to their subjects and infuse a spirit of liberty and self-government in them. It would not be too wide of the mark to say that the Municipal administration is on the whole satisfactory notwithstanding some irregularities and defects noticed by the Commissioner. It was little expected

of the Amraoti Town Municipality that it would allow itself to be surpassed by other Municipalities in the Province in certain respects and be the subject of sever criticism at the the hands of both the Commissioner and the Resident in connection with the system of collecting revenue. We hope that it will soon improve its position.

The income and expenditure of all the Municipalities together for the year of the Report are respectively Rs.207997 and 194787.

The Commissioner has made several remarks on the expenditure and working of the Municipalities, but we mean to confine our attention to some of them only.

There are some defects in the Municipal administration which call for immediate attention. Of these fire establishment is the one. Every body must have observed how many poor people are rendered houseless and thrown in unbearable distress when a great fire breaks out. A fire engine is the only effective instrument in checking its ravages and saving life and property from destruction. Only two of the Municipalities have provided themselves with this machine. No doubt the necessary accompaniment of a fire engine is abundant supply of water. But the Municipalities ought not to remain silent until the water works in contemplation are completely executed and they should try to maintain a proper and adequate establishment to cope with the exigency of fire.

With regard to payments on account of pensions and gratuities, the example of the Khamgaon Municipality is worthy to be followed. Well trained hands can scarcely be secured without any prospect of some provision being made in times of utmost need. To many Government service is enticing only because it is pensionable. If Municipal service be placed in this report on the same footing with Government service, with some chances of the promotion, many a young and energetic mind would be allured to enter this department; and this is the surest and safest way of making the executive administration of the Municipalities as efficient as could be desired.

The unsatisfactory feature in the Ellichpoor Municipality is that the city is not provided with lights. One justification for this want may be found in the fact that the town, besides being not prosperous, has its population scattered over a large area and it would be a sheer waste of money to light unfrequented streets. But we should like to urge the necessity of lighting only those parts of the city which are busy and where the traffic is considerable.

The Commissioner expresses dissatisfaction with the drainage system generally. It requires great extension in his view and we are at one with him in this respect. Cleanliness of the town is in direct proportion with the extent and proper working of the drains. In removing the dirty water to places remote from the towns, the Municipalities would lessen a good deal, the chances of epidemics arising and germs of cholera taking their root. For it is an observed fact that these diseases break out readily and invariably in filthy places. It is to the credit of all the Municipalities excepting Shegaon that they pay much attention to conservancy.

---

The Compensation allowances to the non—native servants of India have *looted* the national treasury and threaten to thrust the ryots on the brink of poverty and ruin into the oblivion of misery and extinction. The Hindu of Madras thus portrays the effects of this strange *benevolence.*

"The Government taxes Peter to pay Paul. And, Heaven knows, Peter is far worse off than Paul. A more unconscionable act of misguided philanthropy we have never come across; and the matter is not made better by the fact that the money with which the Government is so charitable is money held by it in trust for the voiceless millions of this country. Granting compensation to Anglo-Indian officials at the expense of the poor ryots of this country! The parable of the ewe lamb which greatly kindled David's anger is as nothing to this. Is there no Nathan sent as of old to chide the iniquity of these compensation allowances? to call back the Government to a sense of its injustice? to assure Government that its sin has been put away and that it shall not die? Have the ministers and missionaries of Christanity no voice to intercede on behalf of the poverty—stricken inhabitants of this country? Under the British Indian Government, it is the poor who suffer. To him who hath, everything is given; but from him who hath not everything is taken away. We once more protest against these compensation allowances as being unjust, unrighteous, and ill-timed."

---

## वऱ्हाड.

हवामान—आकाश निरभ्र असून थंडी चांगली पडूं लागली आहे खरिपांची पीकें बहुतक वुडाल्या सारखीं आहेत परंतु रब्बीचे पेरे चांगला हात देतील अशी उमेद वाटते. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. आर. डी. हेअर डेपुटी कमिशनर अकोला यांची स्वारी एलवण मुक्कामावर आहे.

कर्नल मेकंझी कमिशनर यांचा वार्षिक दवरा येत्या १० वे तारखेस अकोल्यास होणार होता पण तो थोडा लांबणीवर पडला. सरबराईचा उपद्रव लोकांना फार होतो म्हणून लोक बड्या बड्या साहेबांच्या भेटीला कटाळलेले असतात!

रा. रा. देवराव जयकृष्ण एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर कोर्ट तेल्हारा यांचे चिरंजीव रा. रा. शिवराव देवराव यांस यवतमाळास नायब तहशिलदार नेमिलें. कर्नल मेकंझी साहेब जुने सरदार आहेत तेव्हां त्यांनीं कृपावंत होऊन रा. रा. देवराव जयकृष्ण यांच्यावर म्हातारपणीं चांगलाच उपकार केला हें पाहून कोण आनंद पावणार नाहीं.

यंदा मुंबई युनिव्हर सिटीच्या फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेत रा. रा. गणेश परशराम दातार आणि इंटर मिजीअट परीक्षेंत रा. रा. कृष्णराव दिनकर देशपांडे, व गोविंद कृष्ण पर्वते असे तीन वऱ्हाडांतील विद्यार्थी पसार झाले.

---

नोटीस.

मिस्तर. लखमीचंद पिरामल वा॥ जयनारायण साहु दुकान खामगांव यांस खाली सही करणार यांजकडून नोटीसीनें कळविण्यात येतें कीं पेठ खामगांव येथें श्री बालाजीचें मंदीर आहे. तें फक्त आमचे मालकीचें आहे यांत दुसरे कोणी हक्कदार नाहीं. या देवस्थानाचे खर्चीचे संबंधानें आलिशान निझाम सरकाराकडून एक सनद सरकारी महसुला शिवाय सदर्हू देवस्थानास एक आणा धर्मादाय मिळावा अशा बदल खामगांव येथील साहु गुलाबराय गज्यानंद यांजवर एक अण्याचा फैसल आमचे गुरूनीं मिळविलेला आहे. तें तुह्मास माहीत आहे. ते देव योगानें मरण पावले. त्यांचे जागी आह्मी कायम झालो त्या समयी आपण आह्मांस कबूल केले कीं, सदरील अनामत सदर्हू देवस्थानास आणून आपल्यास देऊ त्या प्रमाणें आजपावेतो दिल्हे नाहीं. दुसरे धान्य बाजाराचा कटोरा आमचा कदीमचा असून तुह्मी बेपारी लोक बजारांतून एक बेपाऱ्या पासून चार शेर धान्य घेऊन गेल्यामुळें पुष्कळ प्रकारचा पुकारा माल कमी बदल झाला, त्यांत तुह्मास तें धान्य घेणें मुनासिब नाहीं. या प्रकरणात गुदस्त सालीं मे. डेपुटी कमिशनर साहेब बहादुर यांच्या कडेस चौकशी झाल्यात आपण आमचे देवस्थानची भिक्षा बंद करणे बदल सही दिल्ही. ही चुकी तुमची व नुकसानी आमची. हा धर्म तुमचा नाहीं. खामगाव येथे आपले बंधु पुरनमल हे आमच्या सदरील संस्थानचे गृहस्थी शिष्य असून त्याणी जिवंत असते समई आम्हास असें कबूल केलें होतें कीं मौजे शेलगांव येथील नंबर आहेत ते आम्ही श्री बालाजीस संकल्प केलें आहे वरून आमच्या बगीच्यातील झाडे संत्रे जांब वगैरेच्या जमिनींत लावले गेले असून त्या जमिनीचा खातें आमचे नांवें अद्याप झालें नाहीं तसेंच अकोला येथें आपले बावाजी मयत झाले त्यांचें संकल्पांत रुपये ५०० कबूल केले पर तेही अद्याप आह्मास मिळाले नाहींत त्या मागे आपले फुपा गंगावरजी अकोल्यास मरण पावले त्यांचे संकल्पांत रुपये (११००) अकराशे देणेचे कबूल केलें ते सुद्धां दिले नाहींत. आह्मी साधु लोक असून भिक्षा घेण्याचा अधिकार आमचा आहे तो आपण ही नोटीस पावल्या एका हप्त्याचे आंत आमचें आह्मास देऊन निकाल करावा. पुष्कळच दिवस आपलेवर पूर्ण भरंवसा ठेऊन राहिलो परंतु दिपवाळी झाल्यानंतर नऊ दिवसांनीं अवळा नवमी येतें त्या दिवशीं अवळीचे पुजेकरितां आमचे बगीच्यात जवजे लखमीचंद जवजे पिराजाल व जवजे नरसिंगदास व जवजे मोतीलाल ह्या येऊन आमचे दर्शन घेऊन तुमचे मनांतील हेतु गैर मार्गीचा ह्मणजे थापाथापी देणेचा आह्मांस जाहिर केल्या मुळें आह्मास ही नोटीस देणें भाग पडलें. येणारे जाणारे सर्व साधु लोकांस खरचाची अती तंगी आहे. याजकारितां सदरील लिहिले प्रमाणें आमचा काय तो निकाल सदर्हू मुदतींत करावा. असें झालें नाहीं तर रीती प्रमाणें काम चालवून त्याचा निकाल होई पर्यंत जो खर्च वगैरे होईल तो सर्व भरून घेतला जाईल. अह्मी हे आपणास अगोदर कळविलें आहे तर याजबदल जे कांहीं आपले सांगणें वगैरे असेल तें सर्व लेखी द्यावें. तोंडी सांगण्यावर कांहीं भरंवसा राहिला नाहीं ह्मणून दिली नोटीस सही तारीख २ माहे डिसेंबर सन १८९३ इसवी.

(सही) गणेशदास गुरू रामचरण दासजी महंत संवस्थान श्रीबालाजी खामगांव तर्फे मुखत्यार सुंदर लाल मनुलाल मुनसी दस्तूर खुद्द.

---

श्री दत्तप्रसन्न.

खाली सही करणार याजकडून जाहिरात देण्यांत येतें कीं आमची हल्लीं सालांत पेठ खामगांव येथें नवीन अडतीचें दुकान स्थापन झालें आहे त्या दुकानावर आमचे जे इसम आहेत त्यांनीं फक्त रुईबाजार व धान्य बाजार आणि आठवडे बाजार या बाजारांत जो परगांवचा माल अडतीत विकण्यास येईल तो विकून रक्कम आणून माल ज्याचा असेल त्यास देण्यास आमची परवानगी आहे. शिवाय पेठेंत दुसरे काम हुंडी आंकडा व सव्याचा सवदा वगैरे करण्यास आमची मनाई आहे. कोणी त्यांच्याशी कोणतेच प्रकारें वर लिहिलेले व्यव्हारा पैकीं आमचे सहीचे पत्र असल्या शिवाय व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. कळावें मिती कार्तिक वद्य ७ संवत १९५० ता० ३।१२।१८९३ इ० दस्तूर केशव गणेश कुळकर्णी गु०

सही.

खुशाल नारायण रावणकार शिराळेकर दु० खामगांव मालक.

सखाराम खुशालजी रावणकार राहणार शिराळे व खामगांव

---

## जाहिरात.

हे पाक पहा व शिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैदर्भांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतुंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतीणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. वाटेल त्यांनीं मागविल्यास आह्मी व्ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ सालममिश्रीपाक दर शेरास (८० तोळ्यास) } किंमत ३ रु

२ बदाम पाक.......................... २॥ रु.

३ सालममिश्री व बदाम प्रत २.......... २ रु.

४ सौभाग्यसुंठ .......................... २ रु.

५ कुष्मांड पाक .......................... ५ रु.

६ गोखरू पाक .......................... ७ रु.

७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखान.

आकोला — वऱ्हाड.

---

## वर्तमानसार

of the Amraoti Town Municipality that it would allow itself to be surpassed by other Municipalities in the Province in certain respects and be the subject of sever criticism at the the hands of both the Commissioner and the Resident in connection with the system of collecting revenue. We hope that it will soon improve its position.

The income and expenditure of all the Municipalities together for the year of the Report are respectively Rs.207997 and 194787.

The Commissioner has made several remarks on the expenditure and working of the Municipalities, but we mean to confine our attention to some of them only.

There are some defects in the Municipal administration which call for immediate attention. Of these fire establishment is the one. Every body must have observed how many poor people are rendered houseless and thrown in unbearable distress when a great fire breaks out. A fire engine is the only effective instrument in checking its ravages and saving life and property from destruction. Only two of the Municipalities have provided themselves with this machine. No doubt the necessary accompaniment of a fire engine is abundant supply of water. But the Municipalities ought not to remain silent until the water works in contemplation are completely executed and they should try to maintain a proper and adequate establishment to cope with the exigency of fire.

With regard to payments on account of pensious and gratuities, the example of the Khamgaon Municipality is worthy to be followed. Well trained hands can scarcely be secured without any prospect of some provision being made in times of utmost need. To many Government service is enticing only because it is pensionable. If Municipal service be placed in this report on the same footing with Government service, with some chances of the promotion, many a young and energetic mind would be allured to enter this department; and this is the surest and safest way of making the executive administration of the Municipalities as efficient as could be desired.

The unsatisfactory feature in the Ellichpoor Municipality is that the city is not provided with lights. One justification for this want may be found in the fact that the town, besides being not prosperous, has its population scattered over a large area and it would be a sheer waste of money to light unfrequented streets. But we should like to urge the necessity of lighting only those parts of the city which are busy and where the traffic is considerable.

The Commissioner expresses dissatisfaction with the drainage system generally. It requires great extension in his view and we are at one with him in this respect. Cleanliness of the town is in direct proportion with the extent and proper working of the drains. In removing the dirty water to places remote from the towns, the Municipalities would lessen a good deal, the chances of epidemics arising and germs of cholera taking their root. For it is an observed fact that these diseases break out readily and invariably in filthy places. It is to the credit of all the Municipalities excepting Shegaon that they pay much attention to conservancy.

The Compensation allowances to the non—native servants of India have *looted* the national treasury and threaten to thrust the ryots on the brink of poverty and ruin into the oblivion of misery and extinction. The Hindu of Madras thus portrays the effects of this strange *benevolence*.

"The Government taxes Peter to pay Paul. And, Heaven knows, Peter is far worse off than Paul. A more unconscionable act of misguided philanthropy we have never come across; and the matter is not made better by the fact that the money with which the Government is so charitable is money held by it in trust for the voiceless millions of this country. Granting compensation to Anglo-Indian officials at the expense of the poor ryots of this country! The parable of the ewe lamb which greatly kindled David's anger is as nothing to this. Is there no Nathan sent as of old to chide the iniquity of these compensation allowances? to call back the Government to a sense of its injustice? to assure Government that its sin has been put away and that it shall not die? Have the ministers and missionaries of Christanity no voice to intercede on behalf of the poverty—stricken inhabitants of this country? Under the British Indian Government, it is the poor who suffer. To him who hath, everything is given; but from him who hath not everything is taken away. We once more protest against these compensation allowances as being unjust, unrighteous, and ill-timed."

## वऱ्हाड.

हवामान—आकाश निरभ्र असून थंडी चांगली पडूं लागली आहे खरिपांची पीकें बहुतक बुडाल्या सारखीं आहेत परंतु रब्बीचे पेरे चांगला हात देतील अशी उमेद वाटते. रोगराई म्हणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. आर. डी. हेअर डेपुटी कमिशनर अकोला यांची स्वारी एलवण मुक्कामावर आहे.

कर्नल मेकंझी कमिशनर यांचा वार्षिक दवरा येत्या १० वे तारखेस अकोल्यास होणार होता पण तो थोडा लांबणीवर पडला. सरबराईचा उपद्रव लोकांना फार होतो म्हणून लोक बड्या बड्या साहेबांच्या भेटीला कटाळलेले असतात!

रा. रा. देवराव जयकृष्ण एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर कोर्ट तेल्हारा यांचे चिरंजीव रा. रा. शिवराव देवराव यांस यवतमाळास नायब तहशिलदार नेमिलें. कर्नल मेकंझी साहेब जुने सरदार आहेत तेव्हां त्यांनीं कृपावंत होऊन रा. रा. देवराव जयकृष्ण यांच्यावर म्हातारपणीं चांगलाच उपकार केला हें पाहून कोण आनंद पावणार नाहीं.

यंदा मुंबई युनिव्हर सिटीच्या फर्स्ट बी. ए. च्या परीक्षेत रा. रा. गणेश परशराम दातार आणि इंटर मिजीअट परीक्षेंत रा. रा. कृष्णराव दिनकर देशपांडे, व गोविंद कृष्ण पर्वते असें तीन वऱ्हाडांतील विद्यार्थी पसार झाले.

### नोटीस.

मिस्तर. लखमीचंद पिरामल वा॥ जयनारायण साहू दुकान खामगांव यांस खाली सही करणार यांजकडून नोटीसीनें कळविण्यात येतें कीं पेठ खामगांव येथें श्री बालाजीचें मंदिर आहे. तें फक्त आमचे मालकीचे आहे यांत दुसरे कोणी हक्कदार नाहीं. या देवस्थानाचे खर्चीचे संबंधानें अलिशान निझाम सरकाराकडून एक सनद सरकारी महसुला शिवाय सदर्हू देवस्थानास एक आणा धर्मादाय मिळावा अशा बद्दल खामगांव येथील साहू गुलाबराय गज्यानंद यांजवर एक आण्याचा फैसल आमचे गुरूनीं मिळविलेला आहे. तें तुह्मास माहीत आहे. ते देव योगानें मरण पावले. त्यांचे जागी आह्मी कायम झालो त्या समयी आपण आह्मांस कबूल केले कीं, सदरील अनामत सदर्हू देवस्थानास आणून आपल्यास देऊ त्या प्रमाणें आजपावेतो दिल्हे नाहीं. दुसरें धान्य बाजाराचा कठोरा आमचा कदीमचा असून तुह्मी बेपारी लोक बजारांतून एक बेपाऱ्या पासून चार शेर धान्य घेऊन गेल्यामुळें पुष्कळ प्रकारचा पुकारा माल कमी बदल झाला, त्यांत तुह्मास तें धान्य घेणें मुनासिब नाहीं. या प्रकरणात गुदस्त साली मे. डेपुटी कमिशनर साहेब बहादुर यांच्या कडेस चौकशी झाल्यात आपण आमचे देवस्थानची भिक्षा बंद करणे बद्दल सही दिल्ही. ही चुकी तुमची व नुकसानी आमची. हा धर्म तुमचा नाहीं. खामगाव येथे आपले बंधु पुरनमल हे आमच्या सदरील संस्थानचे गृहस्थी शिष्य असून त्यांणी जिवंत असते समई आम्हास असें कबूल केलें होतें कीं मौजे शेलगांव येथील नंबर आहेत ते आम्ही श्री बालाजीस संकल्प केलें आहे वरून आमच्या बगीच्यातील झाडे संत्रे जांब वगैरेच्या जमिनींत लावले गेले असून त्या जमिनीचा खातें आमचे नांवें अद्याप झालें नाहीं तसेंच अकोला येथें आपले बावाजी मयत झाले त्यांचें संकल्पांत रुपये ५०० कबूल केले पर तेही अद्याप आह्मास मिळाले नाहींत त्या मागे आपले फुपा गंगावरजी अकोल्यास मरण पावले त्यांचे संकल्पांत रुपये (११००) अकराशे देणेचे कबूल केले ते सुद्धां दिले नाहींत. आह्मी साधु लोक असून भिक्षा घेण्याचा अधिकार आमचा आहे तो आपण ही नोटीस पावल्या एका हफ्त्याचे आंत आमचें आह्मास देऊन निकाल करावा. पुष्कळच दिवस आपलेवर पूर्ण भरंवसा ठेऊन राहिलो परंतु दिपवाळी झाल्यानंतर नऊ दिवसांनीं अवळा नवमी येते त्या दिवशीं अवळीचे पुजेकरितां आमचे बगीच्यात जवजे लखमीचंद जवजे पिरालाल व जवजे नरसिंगदास व जवजे मोतीलाल ह्या येऊन आमचे दर्शन घेऊन तुमचे मनांतील हेतु गैर मार्गीचा ह्मणजे थापाथापी देणेचा आह्मांस जाहिर केल्या मुळें आह्मास ही नोटीस देणें भाग पडलें. येणारे जाणारे सर्व साधु लोकांस खरचाची अती तंगी आहे याजकरितां सदरील लिहिले प्रमाणें आमचा काय तो निकाल सदर्हू मुदतींत करावा. असें झालें नाहीं तर रीती प्रमाणें काम चालवून त्याचा निकाल होई पर्यंत जो खर्च वगैरे होईल तो सर्व भरून घेतला जाईल. अह्मी हे आपणास अगोदर कळविलें आहे तर याजबदल जे कांहीं आपले सांगणें वगैरे असेल तें सर्व लेखी द्यावें. तोंडी सांगण्यावर कांहीं भरंवसा राहिला नाहीं ह्मणून दिली नोटीस सही तारीख २ माहे डिसेंबर सन १८९३ इसवी.

(सही) गणेशदास गुरू रामचरण दासजी महंत संवस्थान श्रीबालाजी खामगांव तर्फे मुखत्यार सुंदर लाल मनुलाल मुनसी दस्तूर खुद्द.

श्री दत्तप्रसन्न.

खाली सही करणार याजकडून जाहिरात देण्यांत येतें कीं आमची हल्लीं सालांत पेठ खामगांव येथें नवीन अडतीचें दुकान स्थापन झालें आहे त्या दुकानावर आमचे जे इसम आहेत त्यांनीं फक्त रुईबाजार व धान्य बाजार आणि आठवडे बाजार या बाजारांत जो परगांवचा माल अडतीत विकण्यास येईल तो विकून रक्कम आणून माल ज्याचा असेल त्यास देण्यास आमची परवानगी आहे. शिवाय पेठेंत दुसरे काम हुंडी आंकडा व सव्याचा सवदा वगैरे करण्यास आमची मनाई आहे. कोणी त्यांच्याशी कोणतेच प्रकारे वर लिहिलेले व्यवहारा पैकीं आमचे सहीचे पत्र असल्या शिवाय व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. कळावें मिती कार्तिक वद्य ७ संवत १९५० ता० ३०।११।९३ इ० दस्तूर केशव गणेश कुळकर्णी गु०

सही.

खुशाल नारायण रावणकार शिराळेकर दु० खामगांव मालक.

सखाराम खुशालजी रावणकार राहणार शिराळे व खामगांव

## जाहिरात.


हे पाक पद्य व शिवाय ता. २६।१२।९२ इ. चे वैद्यभांत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

ह्या हेमंत ऋतुंत हिवाळ्यांत खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसें होतात. बाळंतीणीत व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. बाहेरच्या त्यांनीं मागविल्यास आह्मी व्ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

| | |
|---|---|
| १ सालममिश्रीपाक दर शेरास (८० तोळ्यास) | किंमत ३ रु |
| २ बदाम पाक | २॥ रु. |
| ३ सालममिश्री व बदाम प्रत २ | २ रु. |
| ४ सौभाग्यसुंठ | २ रु. |
| ५ कुष्मांड पाक | १ रु. |
| ६ गोखरु पाक | ७ रु. |

७ प्रवाळ, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.


## वर्तमानसार

### गोवध प्रतिबंधाबद्दल शाहाआलम बादशाहाचा "फर्माना."

फर्माना इ. स. १८१२ हिजरी सन १२३० ह्या सालांत प्रसिद्ध झालेला आहे. त्याचा इंग्लिश तरजुमा लखनौ येथील आडव्होकेट पत्रांत प्रसिद्ध झाला आहे हा फर्माना आजच्या प्रसंगीं फारच महत्वाचा असल्यामुळें तो आम्हीं येथें घेतों:—

"आमच्या राज्यांतील प्रवर्तक अधिकारी गव्हरनर, अमीर उमराव वगैरे ह्यांस कळावें कीं (ह्या देशांतील सरकारचें परमेश्वर निरंतर रक्षण करो) न्यायानें व तारतम्य दृष्ट्या चाललेल्या ह्या कारकीर्दीत असें फर्माविण्यांत येत आहे कीं, मुसल्मान व हिंदू जातींतील गाई व बैल ह्यांच्या पासून पुष्कळच फायदे होतात ज्या अर्थी नुष्य जीवन फलाहार व शाकाहार यांजवर अवलंबून असतें, व जमिनीची लागवड केल्याशिवाय ती मिळत नाहींत आणि ती लागवड गाई बैल यांजवरच अवलंबून असते, त्या अर्थी ह्या उपयुक्त प्राण्यांचा वध करणें हें ह्या अफाट राष्ट्रांतील लोकांहीत रक्षणासाठीं आम्ही तिरस्कृत करितों. सबब ह्या हुकुमानें गोवधाची चाल आमच्या राष्ट्रामध्यें अगदीं बंद करण्यांत येत आहे. आणि जर एखादानें ह्या हुकुमाचें उल्लंघन केलें तर सरकारकडी त्याजवर इतराजी होऊन त्यास शिक्षा केली जाईल"

दुरभंग्याचें महाराजांचे सब् म्यानेजर किंग नांवाचे साहेब आहेत. त्यांनीं पोष्टाच्या एका रनराला तो डांक घेऊन जात असतां आपल्या शिपाया कडून बंगल्यांत बोलाऊन आणून त्यास इतका चोप दिला कीं त्या डांकवाल्याची जागच्या जागीं गठडी बनली! त्याला जाग्या वरून हालतां येईना. अशा स्थितींत एका मनुष्यानें त्याला साहेबांच्या बंगल्यापुढें एका झाडाखालीं नेऊन ठेवलें व सारीरात्रभर तो तेथें कण्हत पडला होता दुसऱ्या दिवशीं पोष्टाकडील ओव्हरसियरास ही बातमी समजतांच तो तेथें आला व पडलेल्या डांकेचा माल दुसऱ्या रनराबरोबर पाठवून देऊन साहेबांनीं केलेल्या कृत्या बद्दल त्यानें तेथील पोलिस आफिसरांकडे फिर्याद दिली; परंतु त्यांणीं ती घेतली नाहीं. असें करण्याचें कारण काहींही असो; परंतु त्या दिवशीं सदहू किंग साहेबांकडे एक बडे अमलदार आले होते; त्यांच्या सूचनेवरून पोलिस अमलदारांनीं फिर्याद घेतली नाहीं, असें म्हणणें आहे. पोलिसा कडून कांहीं होत नाहीं असें दिसल्यावर सदहू ओव्हरसियरनें दरभंगा येथील माजिस्त्रेटांपुढें जाऊन फिर्याद दिली व त्यावरून चौकशी सुरू होऊन खटला मधुबनी येथील सब् डिव्हिजनल माजिस्त्रेटापुढें चालला. त्यांत किंगसाहेबांनीं पोष्टाच्या रनरास बोलावून आणून बंगल्यांत चोप दिला असें करण्यांस त्यांस कारण होतें, असें ठरवून माजिस्त्रेटांनीं किंग साहेबां वरील आरोप दूर करून त्यांस धुतल्या तांदु ळां प्रमाणें निर्दोष करून सोडून दिलें!! मार खालेला रनर सारी रात्रभर झाडा खालीं कुथंत पडलेला होता, वो साहेबांवर भयंकर आरोप यावा ह्या साठीं मुद्दाम पडला होता, असें कल्पनेचे तारे सदहू माजिस्त्रेट साहेबांनीं आपल्या फाईंडिंगांत तोडले आहेत म्हणतात!!! हे न्यायाचे प्रकार ऐकून आपण सुधारलेल्या १९ व्या शकांत आहो कीं जुन्या काळांत सांपडलेले आहोंत, अशी कोणाला शंका आली तर ती येणें चुकीचेंच होणार नाहीं. हिंदुस्थानांतील न्याय पद्धत बिघडत चालल्यामुळें ती सुधारण्याचे उपायास लागण्याची वेळ येऊन बेतली आहे, तिची उपेक्षा करून उपयोग नाहीं, असें जें लोकमत झालेलें आहे, त्याकडे सरकारचें लक्ष कधीं जाईल तें जावो!!

एका हिंदु दवतेचा छळ व दैविक चमत्कार—जि० रत्नागिरी असें समजतें कीं देवगड तालुक्यांतील कळमठ या गांवचे कांहीं मुसलमान थोड्या दिवसा पूर्वी काहीं कामानें आचरें येथें गेले होते; ते तेथून परत येत असतां वाटेत श्रावण गांवीं सडके नजीक तलाव आहे, त्याचे कांठीं श्रीगणपतीची मूर्ति आहे; त्या ठिकाणीं तलावा नजीक भाकरी खाण्यास उतरले होते. त्या वेळीं मंगल मूर्तीकडे दृष्टी जाऊन त्या पैकीं एकानें तोडांतील चूळ त्या मोरयावर टाकणें; त्याचे हातांत मासोळी देणें, मुखावर पादरक्षांचा प्रहार करणें इत्यादि अतिनीच व निंद्यक्रिया केल्या. व गावीं परत आला. घरीं येतांच हा पाद रक्षांचा प्रहार करणारा बेमार होऊन पडला, व दुसऱ्या दिवशीं त्याचा पाय सुजून लठ्ठ झाला व आठ दाहा दिवस यातना भोगून शेवटीं त्यांतच त्याचा देहांत झाला!! ही हकीकत फारच आश्चर्याची असून या कलियुगांतील दैविक चमत्कार असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. देवतांनीं असे आपले प्रखर तेज त्याचा छळ करणारांस दाखविल्यावर मग त्यांच्या भक्तांस माजिस्त्रेटांकडे फिर्याद घेऊन रडत जाण्याचें कारणच राहाणार नाहीं!!! स० शो०

इचलकरंजीचे चीफ श्री. बाबासाहेब आपल्या शहरातील वस्त्रें विणणार मागवाले यांस चांगल्या तऱ्हेनें साह्याय्य व उत्तेजन देत आहेत, त्यामुळें तेथें शहापुरी, नारायण पेठी, वगैरे प्रसिद्ध लुगड्यांपेक्षां सरस लुगडीं व येवल्या सारखे पितांबर निघूं लागले आहेत. शिवाय श्रीमंतांनीं या कोष्टयांकरितां इमारतीही बांधल्या आहेत व ते तेथें निघणाऱ्या सुतास रंग देण्याकरितां रंगशाला ही करण्याच्या विचारांत आहेत.

मुंबई येथील कार्पोरेशननें धान्यावरील जकांत ४ आणे होती ती २ आणे केली व लांकडावरील ९ आणे होती ती १ आणा केली.

दिव्याकरितां निरनिराळीं द्रव्यें काढून व दिव्यांच्या निरनिराळ्या रचना योजून दिव्याचा प्रकाश जास्त जास्त वाढविण्याची उत्तरोत्तर अगदीं चढाओढ चाललेली दिसते. शिकागोच्या प्रदर्शनांत एक फारच मोठा दिवा ठेविला होता. राकेलच्या दिव्याच्या मागें जी एक कांचेची किंवा जरताची तबकडी असते त्या प्रमाणेंच ह्यालाही एक तबकडी जोडलेली होती. नुसत्या ज्योतीचा प्रकाश १ लक्ष मेणबत्त्यांच्या प्रकाशाइतका होता व मागील तबकडीच्या योगानें २७१२८ लक्ष मेणबत्त्यांच्या प्रकाश एवढा त्याचा प्रकाश पडत असे. हा दिवा अवश्य तितक्या उंचीवर ठेवितां आले तर त्याच्या प्रकाशानें १०, मैलांवरून वाचता येईल!

गोमांस खाण्यापासून लष्करी शिपायांस चांगलें वाटत नाहीं असें सरकारास वाटावयास लागलें आहे. व या प्रमाणें बंगाल्यांत दिनपूर येथें गोमांस आठवड्यांतून तीन दिवस बंद ठेवण्याचें सरकारानें ठरविलें आहे.

श्री शृंगेरीचे जगद्गुरु कोईमतुर प्रांतीं गेल्या वेळीं त्यांस तेथील शिष्यवृंदाकडून सुमारें ९६ हजार रुपये मिळाले. हा घाऊक रक्कम पाहून तेथील कलेक्टरांनीं त्यांजकडून प्राप्तीवरील कर वसूल करविला. सदहू रक्कम धर्मकृत्याकडे आहे, असे कलेक्टराला पुष्कळ सांगितलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. श्री. जगद्गुरूंनीं वरील अन्याय पाहून सरकारास याबद्दल अर्ज पाठविला होता. त्याचा योग्य विचार करून धर्माचे कामीं जाणाऱ्या रकमेवर कर वसूल करण्याचें सरकारानें बंद केलें, व श्री. स्वामींकडून घेतलेली रक्कम त्यांची त्यांस परत देण्याविषयीं हुकूम फर्माविला असें कळतें. क. त.

(भरभराटीस कसें यावें.)

रोख जिन्नस घ्या.
व्यवहारांत थट्टा करूं नका.
ज्यावर त्यावर रागें भरूं नका,
स्वताच्या विचारानें चाला.
वेळापूर्वीं तयार व्हा; उशीर करूं नका.
कामाच्या वेळेस दुसऱ्या गोष्टीं काढूं नका.
अनुक्रमानें, रीतीनें, नियमानें, व वेळच्या वेळीं काम करा.
दुसऱ्याच्या कारभारांत व जें कळत नाहीं त्यांत हात घालूं नका.
दुसऱ्यावर अवलंबून राहूं नका.
वचनाचें थड रहा.
इकडे तिकडे बसून वेळ घालवूं नका.
सहाय करा पण लोकांनीं बरें ह्मणण्या करिता शक्तीपलीकडे करूं नका.
नाहीं ह्मणण्यास भीड धरूं नका.
न्यायानें वागा, दया व प्रीती करा आणि आपल्या देवाजवळ नम्रतेनें वर्ता.

निजण्याचा परिपाठ—एका वैद्यकी पत्रांत एक डाक्टर लिहितात कीं, निजून उठल्यावर जें तोंड कडू वाईट होतें याचें कारण बहूतेक मनुष्यें डाव्या कुशीस निजतात. उ. कु. परिपाठ ठेवावा.

इंग्रजी राज्याची स्थापना इंग्लंडांत झाल्यापासून इंग्लंडाच्या गादीवर जे इंग्रज राजे बसले त्यांच्या कारकीर्दीची सरासरी काढल्यास प्रत्येक इंग्रजी राजानें साडेतेवीस वर्षें राज्य केलें असें ठरतें. ह्यांत हल्लींची लांबलचक कारकिर्द मिळविल्यास ही सरासरी आणखी बरीच वाढेल. न्या. सिं.

खानदेश—द्रव्या करितां—प्राण—हानि—भडगांवास फारच भयंकर रीतीनें भंडारी जातीच्या सावकाराचे मुलाचा खून झाला. मुलाच्या आंगावर सोन्यानाण्याचे काहीं मौल्यवान डागिणे नेहमीं असत. त्या डागिण्यांच्या लोभाकरितां तेथील एका पाटलानें आपल्यास—असोदें—गांवचा—एक दुसरा सायीदार इसम जोडीदार केला. आणि त्या दोघानीं त्या सावकार पुत्रास फुसलावून जंगलांत नेलें आणि तेथें त्याच्या अंगावरील डागडागिणे काढून घेऊन त्यास जिवें मारून टाकिलें. हरहर केवढें हें दुष्ट कृत्य!!! मुलगा कोठें गेला, तो कां आला नाहीं. याचा शोध जेव्हा सावकारानें केला तेव्हां कोठें तप सावपासीनें हें कृत्य उघडकीस आलें. पाटील तर तेव्हांच कबूल झाला, व त्याच्याच कबुलीवरून असोद्याचा इसम, राजरोष रीतीनें आपल्या आंगावर डागडागिणे घालून जळगांवच्या बाजारांत फिरत असतांनाच पकडला गेला. हे दोन्ही आरोपी अटकेंत असून त्यांची प्रथम चौकशी मे० चिटगुपी सा० ब० फ० क्ला० मा० यांचे समोर चालू आहे.

माझ्या गाई व बैल वगैरे विकावयाचे आहेत तर कोणी गिऱ्हाईक असल्यास आपण पहावे आपण हिंदु आहा तेव्हां आपल्यास माहिती असण्याचा संभव आहे. हिंदु खेरीज ती गुरें दुसऱ्या कोणास विकावयाचीं नाहींत असा माझा हेतु आहे. असें एका युरोपियानानें हिंदु राजकीय पत्रास विचारिलें आहे. खा. चि.

---

### नोटीस

परशा वल्लद पायरु महार राहणार हिवरखेड व पायरु महार राहणार हिवरखेड तालुके अकोट या उभयतांस नोटीस देणार मिरी मर्द परशा महार हल्लीं राहणार पंचगव्हाण तालुकें अकोट. उभयतांस नोटिसीनें असें कळविते कीं मी सहा वर्षांची झाली त्या वेळीं माझें लग्न तुजबरोबर झालें. पायरु हा माझा सासरा आहे व लग्न झाल्यावर अदमासे वर्ष सहा महिने होतात न होतात तों परशा परागंदा झाला त्यास अदमासें आज १४ वर्षे होतात. ह्या वेळांत त्याचा मजला व माझा सासरा पायरु यांस कोठेंही पत्ता नाहीं. अदमासें माझा बाप माझें लग्न झाल्यावर दोन वर्षांनीं मेला. त्या वेळेपासून मी माझे चुलत्याचे जवळ आहे. माझा चुलता नामें रामु व मी असे मिळून तुझे घरीं आलों व तुझे बापास विचारलें कीं माझी अन्नवस्त्राची व सासरी राहून संसार करण्याची कोणती तजवीज आहे त्या वेळीं तुझे बापानें सांगितलें कीं माझा मुलगा परशा हा कोणीकडे गेला याचा पत्ता नाहीं. मी काय सांगू. या गोष्टीस आज सुमारें १४ वर्षे झालीं. मी शहाणी होऊन अदमासें तीन वर्षें झालीं. मी व माझे चुलत्यानें परशाचा तपास आज पावेतों बहुत केला परंतु कोठेंच त्याचा पत्ता नाहीं. याजकरितां नोटिशीनें त्यास व त्याचे बापास असें कळविते कीं नोटीस पावल्या पासून १ महिन्यांत मजला घेऊन जावें असें झालें नाहीं तर जातीरीती प्रमाणें मी माझा दुसरा घरठाव करून माझे जन्माचें सार्थक करीन. मग नवरेपणाचा परशाचा व सासरेपणाचा पायरुचा हक्क मजवर कोणतेही प्रकारचा नाहीं. मी नवऱ्याचा पत्ता लागत नाहीं व माझा सर्व जन्म व्यर्थ जातो याज करितां नाइलाज होऊन दुसरा घरठाव करित आहे. ह्मणून दिली नोटिस. तारीख २७ माहे नोव्हेंबर सन १८९३ इसवी.

(सही)
सहीची निशाणी बांगडी
मिरी मर्द परशा हिच्या
हातची असे.

---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर " ७ " ८
किरकोळ अंकास ........................८

नोटीसीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Six monthly............3 8 as.
Single copy........................ 4 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3a

VOL XXVII AKOLA MONDAY 11 DECEMBER 1893 NO 48

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख ११ माहे डिसेंबर सन १८९३ इ० अंक ४८

नोटीस

नानु वल्द कचरु महार पारसकर राहणार अकोलें. यांस नोटीस देण्यांत येते कीं तुमचे कडेस आमचे दुकानचे रुपये घेणें आहेत त्या करितां तुह्मास बहुत वेळां मागणें केलें असतां त्याचा तुह्मी कांहींच निकाल करीत नाहीं. मिती कार्तिक शुद्ध १ संमत १९५० पावेतों तुमचे कडेस एकंदर व्याजा सुद्धां वसूल वजा जातां ८।२०।= घेणें निघतात. शिवाय कार्तिक शुद्ध १ संवत १९५० पासून व्याज घेणें आहे त्याचा निकाल नोटीस पावल्या पासून दहा दिवसांचे आंत करावा. तसें न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टांत नोटिशीचे खर्चा सुद्धां फिर्याद केली जाईल. कळावें तारीख ५ माहे दिसेंबर सन १८९३ इ०

( सही )
गुलाबराव गोविंदराव दुकान
आकोलें दस्तुर पंढरंग
रामचंद्र मुरुम्पार.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ३ शक १८१५

## वऱ्हाड म्युनिसिपल कमिटयांचा वार्षिक रिपोर्ट

वऱ्हाडांतील म्युनिसिपल कमेट्यांचा वार्षिक रिपोर्ट सन १८९२–९३ सालाकरितां प्रसिद्ध झाला असून त्याची एक प्रत आमचे कडेस आली तिचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करून थोडक्यांत सारांश देतों. एकंदर प्रांतांत म्यु. कमेट्यांची संख्या ८ आहे. उमरावती शहर, उमरावती क्यांप, अकोला, खामगांव, शेगांव, अकोट, एलिचपूर व वाशीम. या पैकीं प्रत्येक म्यु. कमेटीचे हद्दींतील लोकवस्तीचें मान अनुक्रमें सरासरी २८ हजार, ४ हजार, २१ हजार, १९ हजार, ११ हजार, २६ हजार व १२ हजार आहे म्यु. कमेटींत साधारणतः $\frac{3}{4}$ मेंबर, लोकांनीं निवडलेले व बाकीचे $\frac{1}{4}$ सरकारानीं नेमलेले आहेत. निवडलेल्या मेंबरांची संख्या एकंदर ९० आहे. उमरावती क्यांप म्युनिसिपालिटींत निवडलेले लोक मुळींच नाहींत. सरकारानें नेमलेल्या मेंबरांची संख्या ३९ आहे. त्यांत ९ मेंबर उमरावती क्यां. म्यु. त आहेत. एकंदर १२९ मेंबरांपैकीं ३५ सरकारी कामगार असून ९४ स्वतंत्र धंद्याचे आहेत. युरोपियन १९ असून नेटिव्ह ११० आहेत. सन १८९२ मार्च पासून ९३ मार्च अखेर ७ म्यु. कमिटी मिळून निवडलेल्या लोकांच्या १० जागा रिकाम्या झाल्या त्या करितां एकंदर ७२ उमेदवार होते. मत देण्याचा अधिकार ज्यांना आहे व ज्यांनीं मत दिलें या दोहींचें प्रमाण शेंकडा २८ आहे. गत वर्षांच्या मानानें चालूं सालीं निवडणुकीचे वेळीं अकोला व एलिचपूर या ठिकाणीं जास्त चळवळ दिसून आली. एकंदर ८ म्यु. कमिटींचें उत्पन्न २०७९९७ रु. खालीं दिल्या प्रमाणें आहे. उमरावती शहर म्यु. ५१८२५ उ. क्यां म्यु. १३८०१, अकोला ५४९२३, खामगांव ३९०२१, अकोट ११११९, शेगांव ८३९३, एलिचपूर २०६९३, वाशीम ८६८८; उत्पन्नाच्या बाबी सहा आहेत कर व पट्टी ११०३११, स्पेशल आक्टान्वयें वसुलाची रकम २१३८७, करा खेरीज जागाभाडे व दंडापासून उत्पन्न ७३७११, देणग्या व मदत या पासून २९७, किरकोळ २१९९६, आणि कर्ज वगैरे १३१.

घरें व जमिनीवरील करांचें उत्पन्न फक्त उमरावती क्यां. चें आहे. व्यापार व धंदे या वरील करांचें उत्पन्न उमरावती क्यां० म्यु. खेरीज करून सर्वांस आहे. अकोला उमरावती शहर, खामगांव व वाशीम या ठिकाणीं हा कर ज्यांचें वार्षिक उत्पन्न १०० रुपयांहून जास्त आहे अशा कडूनच घेतला जातो शेगांव, अकोट व इलिचपूर या ठिकाणीं वरील कर २०० रुपयांहून जास्त उत्पन्नावर आहे. रस्त्या संबंधानें कर इलिचपूर आणि उमरावती शहर या ठिकाणीं असून नळाचे पाण्याचें उत्पन्न उमरावती शहर व खामगांव या कमिटींना आहे. भंगीपट्टीचें उत्पन्न उमरावती क्यांप म्यु. व शेगांव म्यु यांनां मुळींच नाहीं. सत्याचे करांचें उत्पन्न आकोला व खामगांव येथील कापिटीस असून लागलें पट्टींचें उत्पन्न फक्त शेगांवासच आहे.

१८९२ एप्रिल १ ह्या तारखेस मागील सालाबद्दल वसूल करण्याची रक्कम एकंदर ३५४०१ राहिली. त्यांत शेंकडां ६४ उमरावती शहर म्यु. ला वसूल करणें होती तेथील डेपुटी क. यांना बरेच वेळां रक्कम वसूल करण्याचे बाबतींत सूचना झाल्या. मिस्तर हशमत अली अब्बासी यांना कमिटीला मदत करण्याचें सांगितल्या वरून बरीच रक्कम वसूल झाली. या सालच्या एकंदर सर्व कमिटी मिळून वसुलाची रक्कम २१०९१२ आहे. या पैकीं १९०२४४ ह्मणजे शेंकडा ९० वसूल झाली. २०४९२ वसूल करणें राहिली. या बाकींत उमरावती शहर म्यु. ला वसूल करावयाचे रकमेचें प्रमाण शेंकडा ६३ आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं उमरावती शहर म्यु. ची वसूल करण्याची पद्धत कांहीं अंशीं चुकीची असावी व या संबंधानें डेपुटी कमिशनर वेळींच सावध होणार नाहींत तर सरकारला योग्य उपाय योजावे लागतील असें कमिशनर साहेबांचें ह्मणणें आहे.

खर्च— एकंदर चालू सालचा खर्च १९४७८७ झाला. हा मागील वर्षाच्या खर्चाचे मानानें पाहतां ४४५११ नें कमी आहे या पैकीं प्रत्येक म्यु. कडून झालेला खर्च खालीं दिलेल्या प्रमाणें आहे. उमरावती शहर ५७२३७, उ–क्यांप १४९८८, आकोला ४०९९६, खामगांव ३८०५१, शेगांव ९९७८, आकोट७३८५ इलिचपूर १८९४७ व वाशीम ७२११. किरकोळ व ठोक खर्चाचे बाबतींत कमिशनर साहेबांचे अभिप्राय खालीं नमुद केले आहेत. उमरावती शहर म्यु चें आफिस एस्टाब्लिशमेंट अतिशय खर्चाचें आहे. त्या प्रमाणेंच वसूल करण्याचे कामीं बराच खर्च होतो.

पेन्शन व ग्रचुइटी संबंधीं भरणा फक्त खामगांव म्यु. करते. आग विझविण्याचे बंब खामगांव व उमरावती या ठिकाणींच आहेत. इलिचपूर शहरांत कंदील नाहींत. पाण्याचे पुरवठ्याचे बाबतींत शेगांव व अकोट या म्यु. कडून कांहीं खर्च होत नाहीं व इलिचपूर व वाशीम या ठिकाणीं या खर्चाचें मान फार थोडें आहे. गटारांतून मोऱ्यांचें पाणी काढण्याची सोय जशी असावी तशी नाहीं. शेगांव खेरीज करून बाकीच्या म्यु. चें शहर सफाईकडे लक्ष बरेंच आहे. दवाखान्याला सर्वांत जास्त मदत खामगांव म्यु. कडून होते. उमरावती शहर, आकोला व खामगांव येथील बाजार व वधशाळा यांकडे बराच खर्च होतो. इमारतीकडे उमरावती शहर म्यु. नें ५००० वर खर्च केला. शेगांव म्यु. चें रस्त्याकडे फार दुर्लक्ष आहे. एकंदर खर्चा पैकीं शेकडां १४ खामगांव म्यु. कडून शिक्षणाकडे खर्च होतो तेंच मान शेगांव आणि वाशीम या ठिकाणीं अतिशय कमी आहे ह्मणजे अनुक्रमें शेंकडां ४ व १ आहे खामगांव आणि उमरावती क्यांप खेरीज करून बाकीच्या म्यु कडून लायब्ररींना मदत होते. किरकोळ खर्च एकंदरीनें आकोला व खामगांव येथें विशेष आहे.

म्यु. कायद्याविरुद्ध गुन्ह्यांची संख्या ३२७ नें वाढली आहे. उमरावती शहर आणि क्यांप यांत ही संख्या बरीच वाढली आहे. या बाबतींत आकोल्याचे आंकडे शहर सफाई संबंधानें म्युनिसिपाल कामगारांची कमी दक्षता दर्शवीत नाहींत असें कमिशनर साहेबांस वाटतें खामगांव आणि अकोट येथेंही गुन्ह्याचें मान कमी आहे व तें शेगांव व वाशीम येथें वाढत आहे. एलिचपूर येथील आकड्या वरून पाहतां तेथें अशा प्रकारच्या गुन्ह्यांकडे यत्किंचितही दुर्लक्ष केलें जात नाहीं. रेसिडेंट साहेब सदहू रिपोर्टावर खालीं लिहिल्या प्रमाणें अभिप्राय प्रदर्शित करितात. उमरावती एस्टाब्लिशमेंटचा खर्च अतिशय आहे. एलिचपुरास कंदील लावले नाहींत. शेगांवास रस्त्याची सुधारणा अवश्य आहे. उमरावती शहर म्यु. संबंधानें कमिशनर साहेबांनीं केलेली टीका योग्य आहे अकोलें शहराला पाण्याचा पुरवठा लवकरच होईल व मोऱ्यांचें पाणी गटर मधून सोडून देण्याची वाटाघाट चालू आहे. ही समाधानाची गोष्ट आहे. खामगांव म्यु० कमिशनर आणि स्यानिटरी क. यांनीं केलेल्या स्तुतीस पात्र आहे. आकोट येथील मेंबरांस आपलें कर्तव्य जबाबदारीचें आहे हें कळणें अवश्य आहे. शेगांवास पाण्याचे पुरवठ्या संबंधानें प्रश्न निघाला होता परंतु पैशाचे अडचणी मुळें तो लांबणीवर टाकणें भाग झालें. तथापि तेथील चेअरमन मि. रीच व मारुती पाटील फार मेहनत घेतात म्हणून रेसिडेंट साहेबांना आनंद वाटतो. एलिचपुर येथें गटर संबंधानें कांहीं सुधारणा झाली परंतु या बाबींत हातांशी बराच पैसा राहिल्या नंतर पुष्कळ सुधारणा करतां येईल. वाशिम म्यु० कडून पैशाच्या अडचणी मुळें कांहीं विशेष झालें नाहीं. शहरांचें उत्पन्न खर्चाचे मानानें कमी पडत असेल तर नवे कर बसविण्या संबंधानें विचार होऊन मंजुरी करितां सरकाराकडेस लिहून गेल्यास विचार होईल.

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आतां शेवटला मुद्दा. तो फारच महत्वाचा आहे. तर त्या संबंधानें विचार करूं. तो मुद्दा किंवा तो प्रश्न हा. प्रजेच्या शिक्षणाकडे द्यावा तितका पैसा सरकारला देतां येत नाहीं याला कांहीं कारणें आहेत काय? कारण तर असलेंच पाहिजे. कारण, कार्य हें कारणांवाचून होणें नाहीं. आतां तीं कारणें कोणचीं हें आपण पाहूं. एकतर सरकारच्या मनांतूनच प्रजेच्या शिक्षणाकडे खर्च जितका कमी होईल तितका करावा असें असेल. अथवा सरकाराच्यानें शिक्षणाकडे खर्च करण्याची ऐपत नसेल. या दोन कारणांशिवाय तिसरें कारण आह्माला तर दिसत नाहीं. आतां ओळीओळीनें या दोन कारणांचा विचार करूं. पहिल्या कारणा संबंधानें पहातां सरकारच्या मनांतच प्रजेच्या शिक्षणाकडे ह्मणजे आमच्याच शिक्षणाकडे जितका खर्च कमी करवेल तितका करावा असें आहे. असें ह्मणणे ह्मणजे मोठेंच धाडसाचें व साहसाचें काम आह्मी करीत आहों असें ह्मणावें लागतें इतकेंच नव्हे तर आमचेवर राजद्रोहीपणाचाही दोष येण्याचा संभव आहे. खरेंच, सरकारच्या मनांत असें येईल तरी कसें! आजपर्यंत आह्मी जो पाश्चिमात्य

शिक्षणरसाचा आस्वाद घेत आहों त्या वरून आह्मांला असें असेक असें वाटत नाहीं. ज्या राज्यकर्त्यांनीं १८७७ सालीं प्रजेच्या कल्याणाकडे आह्मी विशेष लक्ष पुरवूं ह्मणून हजारो जाहीरनामे लाविले, ज्यांनीं आह्माला पाश्चिमात्य शिक्षणामृत पाजून बहुश्रुताध्यायी बनाविलें; नीति ह्मणजे काय, तिचें स्वरूप काय हें ज्यांनीं आपल्याच उदाहरणांनीं व्यक्त करून दाखविलें, आमची दुःस्थिति पाहून व ह्मणून आमची कींव करून म्यॉनूचेस्टर व लिवरपूल येथें ज्यांनीं आह्माला कपडा जरी फुकट नाहीं तरी विकत मिळावा ह्मणून मोठ्या उदार मनानें मोठाल्या गिरण्या उभारल्या; आह्माला उच्च प्रतीचें शिक्षण देण्यासाठीं यांहीं बहुत कालेजेंही स्थापन केलीं! फार कशाला सर्वतोपरीं तुह्मा आमचेच आहांत, तुह्मा आह्मा मध्यें आपपर भेद मुळींच नाहीं, आपण सर्व एकाच आकाशांतील बापाचीं लेंकरें आहोंत, हीं फार महत्वाचीं तत्वें आह्माला पढविण्या करितां येशू पुत्राना आमच्या साठीं इकडे पाठवून दिलें आहे! इत्यादि प्रजेच्या कल्याणाच्या गोष्टी करण्या मध्यें सरकार नेहेमीं दक्ष असतांना मग आह्मी "सरकारच्या मनातूनच पैसा खर्च करावयाचा नसतो" असें काय म्हणतों! हा! आम्ही यांत मोठीच चूक करीत आहों. सरकाराकडे कांहीं दोष नाहीं! कारण सरकार आपल्या देशांतून आमच्या कळण्यासाठी उत्तम उत्तम मुत्सद्दी पाठवून देते! पण ते मुत्सद्दी इकडे आले म्हणजे त्यांना या देशांतील हवा मानत नसेल व म्हणून प्रकृतीला कदाचित् विकृति होत असेल! मग सरकाराकडे तो काय दोष राहिला! पण वाचक हो हें मुत्सद्दी म्हणजेच सरकार व हें सरकार म्हणजेच हे मुत्सद्दी इतकें सांगितलें म्हणजे बस आहे! नाहीं बरें?

आतां आमच्या दयाळु सरकारामध्यें आमच्या शिक्षणा प्रीत्यर्थ बराच खर्च करण्या इतकी ऐपत आहे किंवा नाहीं. हें पाहू. आमच्या सरकाराला अशी ऐपत नाहीं असें म्हणणें हें किती असंभवनीय दिसतें. ज्या आमच्या सार्वभौम व बलाढ्य राज्यकर्त्यांची व्यापारा संबंधानें सर्व पृथ्वीवर विशाळ कीर्ति पसरली आहे त्या राज्य कर्त्यांनां ऐपत नाहीं असें प्रतिपादन करणें म्हणजे किती विसंगत दिसतें! ज्या आमच्या राज्य कर्त्यांना फार प्राचीन काळा पासून नावाजलेली ही भरतखंडा सारखी सुवर्ण भूमि मिळाली आहे व तिच्या जीवावरच जे आज एवढ्या भरभराटीस व उदयास आलेले आहेत त्या आमच्या पोशिंद्यानां ऐपत नाहीं असें सांगणें म्हणजे केवळ सत्यता देवीची अवहेलना करणें नव्हे काय! ज्या आमच्या राज्य कर्त्यांना आमची चोपदरी धरण्याची वेळ आली आहे तरी आमच्या मधुकरींतीलच अर्धा हिस्सा कढून आम्हीं करभार रूपानें देत आहोत व त्या करभाराच्या सहाय्यानें ज्यांना नव्वद कोटींचे साळीना उत्पन्न करून ठेविलें आहे त्यातून एक चतुर्थांश निदान एक पचमांश आमच्या शिक्षणासाठीं देण्या पुरती आमच्या मायबाप सरकारामध्यें ताकद नाहीं असें बरळत सुटणें म्हणजे खुळेंपणा नव्हे काय! तिऱ्हाईत राष्ट्रांतील लोकांनां तरी हें खरें वाटेल काय? त्यानां खरें वाटो अगर न वाटो! आम्हाला असें कांहीं तरी वाटतें खरें! कदाचित् तें खोटें ही असेल!

( पुढें चालेल )

---

डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या हातून गेल्या पहिले तारखेस मुंबईच्या सेंट झेव्हिअर कालेजचा बक्षीससमारंभ झाला. त्यावेळीं अध्यक्ष या नात्यानें बोलतांना त्यांनीं अलिकडील विद्यादाना संबंधानें कांहीं दोष दाखविले. ते ह्मणाले कीं विद्येनें मनुष्य फुगतो असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. सांप्रत शाळांतून विद्या शिकवितात पण तिच्या समागमें नेमस्तपणा, सद्वर्तन, नीतिमत्ता, टापटीप, वगैरे गुणांचें यथास्थित बीजारोपण होत नाहीं तसेंच प्राचीन काळीं गुरुगृहीं वास करून विद्यार्जन करीत असत त्या वेळची आदरबुद्धि, व नम्रपणा हे गूण हल्लीं लोपले आहेत.

डाक्टर भांडारकरांनीं हा दाखविलेला दोष दूर करण्यास उपाय आम्हास एकच दिसतो. गुण कोठें ही असो त्याला पूजास्थान सर्वत्र मिळतें. शिक्षकवर्गानें आपल्या स्वतांच्या सद्गुणांनीं व दुसऱ्यांतील सद्गुणांच्या अभिनंदनानें सद्गुणा विषयीं अनुकरणबुद्धि छात्रसमूहांत प्रेरित केली पाहिजे. सद्गुणांची आवड निवड ज्यांच्यापाशीं आहे त्यांची विद्या विनयानें अलंकृत असते. आणि मग अशा कोणत्या विद्यासंपन्न नराला जयश्री माळ घालणार नाहीं.! सारांश, डाक्टर भांडारकरा सारखे परमपूज्य गुरु विद्यार्थिगणा मध्यें आदरबुद्धि व विनय नाहीं म्हणतात तर त्याचा निम्मा तरी दोष ते आपल्या माथीं घेऊं पहात नाहींत काय? 'वृद्धास्ते न विचारणीय पुरुषाः' या तत्वावर दृष्टी देऊन मौन धरलें पाहिजे.

---

# The Berar Samachar

**MONDAY DECEMBER, 11, 1893**

As Milton is more praised than read Mr. Hume is more hailed with delight than really understood. What Mr. Hume has done for India is more in the nature of a trust than as a legacy pure and simple in the form of the magnificent National Congress. Mr. Kashinath Govind Natu, Pleader Poona gave a vivid sketch of Mr. Hume's work when be welcomed this Father of the Congress the other day at Poona His speech bristled with a good deal of instructive matter and invited men to learn of Mr. Hume and his doings with a heart full of awe and reverence. At our request Mr. Gopal Kashinath Natu B. A. reproduced his father's speech and we thank fully offer it to the public for what it is worth in the general estimation. We do it with a view to send its reader to the fountain head:—Let him see Mr. Hume in the Congress at Lahore, read and learn what he has said and done and limitate him if possible in his sacred walk of life.

"Friends, fellow countrymen and fellow townsmen. we meet here this evening to welcome Mr. Hume and Mr. Hume meets us here to bid us farewell. Perhaps you wonder when I use that name without an attribute. When ordinary names that pass muster in the columns of a newspaper often have a train of adjectives, you will naturally ask me why I have not had the common courtesey of saying at least the good Mr. Hume and the benevolent Mr. Hume. Your charge is just and you will hear my justification. When I was revolving in my mind how I should best describe him, what epithets I should use to paint him in his natural colours, words fell very short of the reality and I thought I should be doing injustice to him by an unsuccessful attempt at giving you a life—size portrait which eventually threatened to be a very defective miniature. I therefore, resolved and you will consider very wisely that as the name Mr. Hume itself carries with it a world of meaning which a quarter educated man like myself can but ill express, it is better to set him before you as he is. He is a diamond of the first water and your sincere hearts will be the finest setting for it. View him so set and he surpasses all description.

You must have heard that in the enemy's camp we have often been taken to task for saying well of Mr. Hume. We have been styled as simpletons, dupes, as men misguided and mislead and if Mr. Maclean had the sovereign power in his hand, he would have shot Mr. Hume as a traitor. Not only are there men in Mr. Hume's race who thus consider him a traitor. There are some even among the natives of the country who to our great shame are fellow brothren and who may well suit as excellent recruits to grace Mr. Maclean's stand. But such men fortunatelly for ourselves are but men of little power and can never execute their airy purposes or works of enmity fulfil. They are more conspicuous by the perverseness of their reasoning. Hate Mr. Hume say they why because he has called into existence his awful monster of a National Congress, hate him because he has made the Indians meet and think for themselves, hate him because after years of good service, when he should have gone to some watering place or to the groves of Italy where eutrurian shades high over arched imbower he is spending the wretched remnant of his life in the amelioration of his benighted fellowmen and shows them the way to go to their benevolent sovereign for redress of wrongs under which they had been groaning and which the whip of power had been making worse and worse every day, hate him because he has been bringing rulers and the ruled nearer every day. For these and many such diabolical reasons, say they, hate Mr. Hume, nay shoot him if you can. Let them howl as long as they please. My dear fellow men, do I not speak the voice of your innermost hearts when I say that if twenty such Pioneers were to gather together and preach to us this nefarious gospel of ingratitude our hearts yet possess in them seeds of gratefulness which will defy such babling and in spite of these preachings will rise and say to this image of kindness:—Thou Father of the National Congress, in thee, this nation shall be blessed and for thee we have a heart that still thanks thee and places thee within its sacredest sanctuary. India shall feel for thee and as long as we are true born sons of our fathers our homage of gratitude to thee shall continue to be paid without ceasing and if India under our gracious Empress becomes what thou wishest her to be she will carry thy sweet name to our own posterity as one of her richest treasuries for which she will always have reason to be proud.

This is Mr. Hume's last visit to India. He proposes to visit all the principal churches of his political gospel. Such a visit is essential. It is now several years since he first conceived the idea of a National Congress. He had been long in government service. He knew what India really wanted. He was confident of the broad hearted ness of his own countrymen. But he at the same time knew that India's cries were too feebly heard in England. But that if India's wrongs were to be redressed, the shout must be universal. It must be rough and tough so as to grate a little upon the English ear. He was sure that if the English public once heard that voice, they would never turn a deaf ear to India's wants.

(to be continued)

---

## AMRAOTI—MUNICIPALITY.

To,

The Editor,

Berar Samachar

Sir,

Every one, at least every one who has received some education, professes highest regard for Local Self Government; but if a thing is to be judged by its consequences I think that the experiment is a complete failure.

The Municipality, here, as every one knows, is reported to be one of the best Municipalities in Berar; but it is, as the Marathi phrase goes, "Very well on paper but nothing in fact." If I were to detail all the grievances that we, of Amraoti, are labouring under volumes will have to be written. But I have neither time, nor will, nor power to describe them adequately. But generally the present always occupies our mind and we have at present a very serious grievance to complain of.

The attention of the Municipal Members is, I think, nowadays engaged in inventing the surest means for speedy collection of the Latrine Cess; and they have indeed made a Devil's invention—that of stopping the services of the privy-sweepers for the houses of those who have not paid the Cess. It is an unfailing remedy no doubt. Let us weigh its good and bad effects. It is the surest and the easiest way for speedy collection of the Cess. But if you look to the evil it produces you will think with me that Devil himself could not have invented a surer means for destruction of man.

Every one knows how filthy large cities generally are, without any of these adventitious causes of filth. They are, so to say, abodes of filth and consequently of contagious diseases. How much more will they be so when such extraneous causes add fuel to the fire? But what do the honorable (?) Members care if the Rayat dies an untimely death so long as they have their taxes regularly paid —taxes for which the Rayat many a time receives no advantage in return.

But setting aside every other consideration—I will show you how injustice is done. When in a large house some 5 or 6 families reside and use a common privy and when four or five of them have paid the tax is it not unjust that all should suffer for the default of one wholely independent of them? But it is done. Besides the evil does not stop here. When a person, who has paid all taxes is obliged to pass days, nay weeks together, in a filthy atmosphere benefit from the Municipality must be but a name; and

to say such a Municipality is good, the very idea of goodness must be perverted. Let us go a little farther. A friend comes to pass some days with his friend at Amraoti, inhales the noxious air, catches the contagion, falls sick, and goes to his native village to spread the contagion there. Do not think that this is a chimera of a heated fancy. If you pass by certain lanes and byelanes here you will think that life would be insufferable in such a state. But poor Rayat patiently puts up with this; because it has yet to learn to go against these brags of big men and assert its rights.

But do the ward commissioners do their duty under ordinary circumstances? No! Ten thousand times No!! They are never out, unless on very special occasions, to inspect the parts wherein their electors reside. They culpably neglect their duties. As for their attendance to meetings even the Deputy Commissioner here had once to complain of their apathy and irregularity. When time for election comes these men are ever ready to hold out promises which they never intend to keep.

The thing which exasperated me most is the culpable neglect as regards the accounts of the Municipality. Many a time it so happens that a poor and ignorant man is obliged to pay the tax twice, while his rich neighbour, himself exempted on account of neglect, laughs at him. I know of a case in which a poor grocer was similarly cheated of his money. He paid the Latrine Cess for 1893 94 so far back as June or July and during the last week the services of the sweeper for his house were stopped on the ground of non-payment. The poor fellow was therefore forced to pay the tax again for the same time.

Under such circumstances, when we show by our actions that we cannot manage even these petty things properly how can we demand a better Government from our Rulers? They will say what the G. O. M. of India said "Every nation generally has a Government which it deserves." Let the members of Amraoti Town Municipality show that they can forget the self and work not for selfish gain but for public good.

Let them not take insult at the plain spoken words of a sincere friend but think upon it and see what they should do to avoid such remarks in future. I think they will shake off their apathy, forget their self and work for public benefit and more than all bear in mind that sanskrit saying

'हितं मनोहारिच दुर्लभं वचः'

If with all this they cannot rouse themselves to a sense of their self imposed, and honorary but responsible duty why do they not shake off their meretricious greed for a nominal importance and leave such duties to more energetic and earnest men? To be out of an institution to which we cannot do the justice expected of us is no dishonor but a sure index of real Magnanimity and generosity. A friend of mine has just sent in his complaint to the Secretary in regard to the filthy, infectious, and contagious atmosphere. He invokes the Secretary and through him the General Committee to enlighten the public as to what power the Municipality has to allow such voluntary accumulation of filth so pernicious to individual and public health. If law permits or sanctions such a nasty procedure, it does not posses the sanctity of law and deserves therefore total extinction.

With this I think I may bid you a temporary adieu.

'M'

## वऱ्हाड.

मि बी. भूकन ए. अ. कॉन्सरव्हेटर आफ् फारेस्ट बुल्ढाणा यांची बदली इलिचपूर फारेस्ट डिव्हिजन कडे केली व त्यांचे जागीं मि. बिरुसरसिंग फॉ. रेंजर यांस कांहीं दिवस करितां नेमिलें आहे.

मि. जे सी. जेरंड यांस वऱ्हाडा करितां इन्स्पेक्टर ऑफ स्टीम बायलर्स नेमिलें

मि. इ. स्केफर ट्रेझरी आफिसर हैदराबाद हे मेल्यामुळें त्यांचें जागीं मि. सी. डी. एल. प्रआरो हेड क्लार्क रेसिडेन्सी आफिस यांची नेमणूक करण्यांत आली.

यंदा मुंबई युनिव्हरसिटीच्या फर्स्ट एल. एल. बी. परीक्षेंत १०३ उमेदवार पसार झाले त्यांत वऱ्हाडांतील रा. रा. दामोदर गणेश पाध्ये एम. ए हे पहिले वर्गांत पसार झाले.

मि. प्रिडो असि. कमिशनर बुल्ढाणा यांचे कोर्टास स्माल काज कोडताचे १०० रुपया पर्यंतचे दावे चालविण्याचा अधिकार दिला.

यंदा एम. ए. च्या परीक्षेंत वऱ्हाडांतील गृहस्थ रा रा. मोगे केशव दामले हे पसार झाले. परिक्षेच्या निकाला पूर्वीच त्यांची नेमणूक प्रोफेसरच्या जागीं उज्जनी कडे झाली आहे हें कळविण्यास आम्हास मोठा संतोष वाटतो.

रा. रा. विष्णु हरी जोशी तहशीलदार इलिचपूर हे रजा संपल्यामुळें आपल्या कामीं रुजूं झाले.

कर्नल मेकंझी कमिशनर यांची स्वारी काल रोजीं वाशिमास होती. त्यापुढें मोर्चा कोणीकडे फिरणार हें कळत नाहीं.

उमरावती जवळील नांदगाव पेठ येथील एका पेनशनदार रजपुताचा खून केल्याच्या आरोपा वरून पांच इसमांची गेल्या सेशनांत चौकशी झाली. पांचही इसमांस फांशीची शिक्षा निकालांत लिहिली होती. पण त्या निकालावर मे. आबर्ड साहेब यांनीं आरोपीच्या वकिलाचा पुन्हा सल्ला विचारला तेव्हां पुढील वादविवादांत मे. आबर्ड साहेबांचें मत फिरलें आणि त्यांनीं एकास फांशी व तिघांस काळेपाणी अशा शिक्षा देऊन पांचव्यास निर्दोषी ठरविलें.

आम्हास कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं रा. रा. चिंतामण मोरेश्वर आपटे इनस्पेक्टर रजिस्ट्रेशन खातें यांस गेल्या शनिवारीं देवाज्ञा झाली. मरण फार स्वल्प वेळांत व बोलता चालतां अवचित आलें. हे गृहस्थ चांगल्या स्वभावाचे असून मित्र मंडळींचे यांस फार आगत्य असे. हे नुकतेच अलिकडे ग्रंथकार म्हणून प्रसिद्धीस येत चाललें होते. यांची ग्रंथरचना सरळ, सुबोध, व मनोरंजक असे. हाता खालील लोक यांस फार चहात असत आणि वरिष्ठांच्या ही हे मर्जींतले अधिकारी असत. घरचा कर्ता पुरुष निवर्तला म्हणजे तें घर किती दीन होतें हें कल्पनेनेंच चांगलें कळेल. ईश्वरी नेमानेमा पुढें मनुष्याचे सर्व उपाय हरतात!

लाहोरच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीला या जिल्ह्या तर्फे मुखत्यार धाडण्या साठीं काल सायंकाळीं येथील धर्मशाळेंत जंगी जाहिर सभा भरली होती

रा. रा. वमन नारायण गपट यांनीं उमरावती शहर म्युनिसिपालिटींतील आपल्या मेंबरच्या जागेचा राजिनामा दिल्यामुळें त्यांचे जागीं मि. सोराबजी होरमासजी यांस नेमिलें.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे ऑ. ए. अ. क यांस येथील स्मालकाज कोर्टाचे जज्जाचे अधिकार मिळाले.

### नोटीस.

रा. रा. बापू बाळाजी साबने दुकान खामगांव यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस दिली जाते अशी कीं आमचे आपसांतील तंट्यामुळें मी तुह्मांस तारीख १९ सप्टेंबर सन १८८९ इसवीचे माझे स्वतांचे नांवाचे रुपये २९९५ चे व तारीख ३१ आगष्ट सन १८८९ इसवी रोजीं माझी भावजय जुमली हिचा मुखत्यार या नात्यानें ९९९ चे लिहून दिले ते व त्या खेरीज तारीख २३।७।८९ इसवी रोजीं माझा भाचा नांवे बाब्या वल्लद चुडामण यांजकडून तुमचे नांवें करून दिलेले खरेदीखत येणें प्रमाणें तिन्ही दस्तैवज माझें बिरादर लोकांचे तंटयामुळें छपावणी करितां लिहून दिले होते. आमचे आपसांतील तंटा अखेर कोर्टांत जाऊन पंचाकडे निकाला करितां गेला होता त्यांत पंचासमोर तुह्मी कबूल केलें कीं वरील तिन्ही दस्तैवज पोकळ आहेत. अखेरीस आमचा आपसांत निकाल झाल्यानंतर मी तुह्मांस वरील दस्तैवज मागितले असतां तुह्मी दिले नाहींत. तुमचे मनांत माझ्याशीं बेमानी करणें आहे असें समजतें, ह्मणून तुम्हास ही नोटीस दिली आहे कीं वरील दस्तैवज पोकळ असल्यामुळें तुह्मी इमानदारीनें वर्तन करून माझे दस्तैवज मजला एक महिन्याचे आत परत द्यावेत. दुसरें मी तुह्मापाशीं वरील तंटयामुळें सोन्याचे दागिने दंडवाळी जोड एक वजन तोळे अदमासें ४७, कडे सोन्याचें जोड एक वजन तोळे अदमासें ४०, हसळ सोन्याची एक वजन तोळे १० येणें प्रमाणें दागिने ३ तुह्मांजवळ अनामत ठेविलें होते. ते परत मागितले असतां आपण अभिलाष बुद्धीनें मला परत दिले नाहीं व देतही नाहीं. तेही वरील मुदतींत माझे मजला परत द्यावेत. तिसरें— वरील पोकळ गहाण खतावरून तुमचे ताब्यांत दिलेल्या शेताचे मालाचा हिशोब मागितला असतां तोही तुह्मी समजून देत नाहीं. या सर्व गोष्टीवरून आपल्या मनांत आह्मांस सफई बुडविण्याचें आहे हें उघड दिसते. आह्मी सदरील व्यवहारावरून आपलेवर कोणचे प्रकारचा भरंवसा ठेविला होता हें आबाल वृद्धाचें ध्यानीं येईल. अशा भरंवशाचा मोबदला आह्मांस आपण ज्या रीतीनें देत आहा ती रीत आपणांस अगदीं शोभत नाहीं. असो आतां ही नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत सदरील तिन्ही दस्तैवज व अनामत ठेविलेले दागिने व शेतीचे मालाचा हिशोब समजावून देऊन सर्व निकाल करावा. असें झालें नाहीं तर अखेर निकाल होईपर्यंत कोर्टखर्च या नोटिशीचा खर्च व इतर या संबंधानें जें नुकसान होईल तें सर्व भरून घेतलें जाईल. कळावें, तारीख ७।१२।९३ इसवी.

( सही ) चंदुलाल देवलाल कोळी
राहणार खामगांव दस्तुर खुद.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करिता येण्या साठी सरटी फिकीट मिळावे म्हणुन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७
कलम ६ प्रमाणें
दि. कि. क्का. १५ मिसल नंबर ९/१८९३

विद्यमान सिविल जज्ज साहेब जिल्हे आकोलें यांचे कोर्टात.

नाव— गणेशदास
बापाचे नाव भवाणीराम मारवाडी
राहणार कुरणखेड तालुके अकोला
जिल्हा आकोला यांस मयत

भवाणी बापाचें नांव गंगाराम राहणार. कुरणखेड तालुके अकोला. जिल्हा अकोला याचे कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटी फिकीट मिळावें म्हणून सदर्हु अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याज करिता सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वार मिळण्यात येत आहे कीं त्याणी तारीख १६ माहे डिसेंबर सन १८९३ इ० रोजी सदर्हु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ९ माहे डिसेंबर सन १८९३ इ०

V. N. Dandeker
सिविल जज्ज.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८९३ चा अक्ट ७
कलम ६ प्रमाणें.
दि. क्का. १५ मि. नंबर १०/१८९३

वि० सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टात.

नांव— तुळसी
मर्द संपतसींग रजपुत
राहणार जलम ता० खामगांव
जिल्हा आकोला यांस मयत

संपतसींग बापाचें नांव दौलतसींग राहणार जलम ता० खामगांव जिल्हा आकोला यांचे कर्ज वसूल येण्यासाठीं सर्टीफिकेट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारे कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० २० माहे डिसेंबर सन १८९३ इ० रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टात हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता० ८ माहे डिसेंबर सन १८९३ इ०

V. N. Dandeker.
सिव्हिल जडज्य

## वर्तमानसार

कोयनेलचा बाळंतपणीं उपयोग:— मूल उपजल्या बरोबर दहा ग्रेन कोयनेल लागलीच दिल्यानें गर्भाशयाचें संकोचन होऊन आंतील सांकळलेलें रक्त बाहेर निघण्यास व त्यास मोकळा वाहण्यास मोठी मदत होते. पहिल्या दिवसापासून रोज सकाळीं संध्याकाळीं पांच ग्रेनपर्यंत कोयनेल देत गेल्यास बहुतकरून तिसरे दिवशीं भरणारा दुधाचा ज्वर येत नाहीं पुढेंही कोयनेल थोडे दिवस या प्रमाणें दिल्यास त्याचा पौष्टिकसारखा उपयोग होतो व क्षुधा प्रदीप्त होते. सारांश, हें औषध बाळंतपणाच्या दहा दिवसांत देण्यास मोठें प्रशस्त आहे.

सृष्टिवैचित्र्य अथवा खरा अरधनार:— एक पुरुष ३१ वर्षांचे वयाचा होता. त्याविषयीं चौकशी करितां, त्यास त्याच्या २१ व्या वर्षापासून स्त्रियांप्रमाणें महिन्याचें महिन्यास विटाळ जात आहे असें समजलें. विटाळ पाळीनंतर बरेच दिवस मूत्रद्वारांतून वाहत असे त्याचा चेहरा स्त्री प्रमाणें दिसे, परंतु त्याचीं बाहेरचीं इंद्रियें पुरुषाप्रमाणें होतीं. स्त्री संभोगापासून रेतस्खलन होत असे, व त्याला एक मूलही झालें. त्याच्या उजवीकडे अंतःफल ( ओव्हरी ) होती, व त्यामुळेंच विटाळ येत असे. भिषग्विलास.

नागसर्पाच्या विषावर उपाय—मद्रास इलाख्यांत हसन ह्मणून एक शहर आहे. तेथल्या एका मुसलमानास नागसर्पानें दंश केल्यावर बऱ्याच वेळानें तो अगदीं मरणोन्मुख झाला. तेव्हां त्याच्या आप्तांनीं त्यास तेथील इस्पितळांत नेलें. तेथल्या डाक्तरानें दंश झालेल्या मनुष्याच्या आंगांत कुचल्याचा अर्क पिचकारीनें घातला. थोड्या थोड्या अवकाशानें हा प्रयोग चार वेळ केल्यावर सुमारें १ तासांनीं तो मनुष्य बरा झाला, मेलबोर्नचे डाक्तर ए. न्यूई लिपर यांचा हा उपाय होय.

देशी वस्तु—सरकारी आफिसांत खर्चास लागणाऱ्या वस्तु घेतल्यामुळें सन १८९२—९३ सालीं मुंबई सरकारास ६३४१३ रुपये फायदा झाला. मागल्या सालाशीं ताडून पहातां ३६१२८ रुपये कमी फायदा झाला असें समजतें याचें कारण सरकारास पाहिजेत तशा वस्तु हिंदुस्थानांत मिळाल्या नाहींत त्यामुळें विलायती वस्तु घेऊन गुजारा करावा लागला. शु० सु०

बडोदे येथें वॉटरप्रुफच्या छत्र्या करण्याचा कारखाना एका गृहस्थानें काढिला आहे.

बाबू इश्वरचंद्र मुझुमदार नांवाच्या बंगाली गृहस्थानें कलकत्यास हातानें 'काड्यांच्या पेट्या' करण्याचा कारखाना १०० रुपये भांडवलांत सुरू केला आहे. त्या पेट्या एक पैशाला ६ किंवा ८ विकत मिळण्याचा संभव आहे असें ह्मणतात. क० त०

एक नवीन पर्णभक्षक किडा जावा बेटांत उत्पन्न झाला आहे. तो एकटा दोन दिवसांत ४०० एकर काफीचीं पानें खाऊन फस्त करितो! न्या. सु.

हैदराबादचे खटल्यांत प्रसिद्धीस आलेले नबाब मह्दीहुसेन यांना भोपाळच्या बेगम साहेब आपले दिवाण करणार आहेत असा बुट बाहेर निघाला आहे. स.शो.

इंदूरच्या होळकर महाराजांनीं आपले दिवाण मि. बेदूरकर, नायब. दिवाण मि. नानकचंद, मि. गुप्ते व मि. वागळें यांचे एक कौंसल नेमले असून त्या कौंसलास महाराजांनीं आपले कांहीं अधिकार अर्पिले वगैरे तपासण्याकरतां दिले आहेत.

बंगाल्यातल्या पूर्णानंद चतरजी नांवाच्या गृहस्थास विलायतच्या एडिंबरो यूनिवर्सिटीकडून डाक्टर आफ सायन्स अशी पदवी मिळाली.

कलकत्ता शहरांतील विश्वपोषितांचीं दुकान बंद करण्या बद्दल तेथील लोकांची गेल्या आठवड्यांत एक मोठी सभा झाली.

सर डुरंड यांणीं काबुलास जाऊन फत्ते केली हें ऐकून, रशियन सरकारास आनंद झाला आहे व आतां इंग्लंड व रशिया यांच्या दरम्यान पामीरची हद्द कायम करण्यास चांगले साधन होईल अशी रशियास आशा आहे असें सांगतात.

भयंकर धरणीकंप— खोरासन प्रांतात एक भयंकर धरणीकंप होऊन १२,००० माणसें मेलीं व ५०,००० गुरें मेलीं धरणीकंपाचे धक्के पुढें चालूच होते.

फरकाबाद जिल्ह्यांत कांहीं दरोडेखोरांशी सरकारी पोलिसाचा एक सामना होऊन त्यांत एक शिपायी ठार होऊन एक नाईक व दोन शिपायी घायाळ झाले.

लाहोरच्या हद्दीत एक आई आपल्या एक वर्षांच्या मुलास कुशींत घेऊन रात्रीं निजली असतां एक मोठा साप येऊन तो त्या मुलास पायांकडून गिळूं लागला. मूल ओरडून आई जागी झाल्यावर लोक जमा होऊन मुलाची सुटका केली. साप मुलास चावला नसून नुसता गिळीत होता. या सापास तिकडे काळ्या ह्मणतात व इकडे अजगर किंवा आर असें ह्मणतात.

अफुकमिशनापुढें नेटीव डाक्टर व हकीम यांच्याही कित्येक जबान्या झाल्या व अफु औषधास उपयोगी असून दोन हजार वर्षांपासून तिचा उपयोग करण्यांत येत आहे असें त्यांणीं सांगितलें.

आपलें अरमार चांगलें सज्ज ठेवणें जरूर आहेच व फार घाईनें नवें अरमार तयार करण्याचा विचार आहे असें येत्या बजेटाच्या वेळीं सर्वांस कळेल असें इंग्लंडचे प्रधान मि. ग्लाडस्टन सांगतात.

अमेरिकेंत जो नुकताच जगाचा बाजार झाला त्यापासून जें उत्पन्न झालें त्यांतून त्याबद्दलचा सर्व खर्च भागून निव्वळ २९,००,००० डालर शिलक राहिले. एकंदर उत्पन्न १,४०,००,००० डालर झालें.

स्पेन व मोरोको यांच्यांतील लढ्याचा निकाल करण्याचा यत्न फुकट जाऊन पुन्हा लढाईवर आले व स्पेनचा कमांडर वीस हजार फौजेच्या दोन तुकड्या करून लढाई करण्यास गेला.

परकीय राष्ट्राची चळवळ कांहीं वेगळी दिसत असल्यामुळें आपलें अरमार जास्त मजबूत करणें अवश्य आहे असें इंग्रजांच्या माजी प्रधानांचें ह्मणणें आहे.

विलायतेस हल्लीं जो हिंदुस्थानचा स्टेट सेक्रेटरी आहे त्याच्या बदला पुढें एशियाचा स्टेट सेक्रेटरी करण्याचा विचार चालू आहे.

चिंगलपेट पासून कडलोर पर्यंत पाऊस फार पडून चहूंकडे पाणीच पाणी झालें व शेतकीस फार हानी झाली असें सांगतात.

रशिया आपलें आरमार भूमध्यसमुद्रांत ठेवीत आहे या ह्मणण्यास कांहीं चांगलासा आधार नाहीं. आणि त्यांत आपलें आरमार ठेवण्यास रशियास जर टर्कीनें परवानगी दिली तर आपण आपलें आरमारही त्यांत ठेवूं असें इंग्रज प्रधानांचें ह्मणणें आहे. ठा.

जलोदरावर औषधें— ह्यान्सेंठ नामक पत्रापध्यें जलोदरावर असा एक उपाय दिला आहे कीं, मोठ्या बेडकाचे कांतडी पासून हा रोग शमतो हा उपाचार कसा करावयाचा हें समजत नाहीं. परंतु आमच्या कडील वैद्यक ग्रंथांतून जलोदर झालेल्या लोकांनीं बेडकांस हातांळींत अमावें असें आहे. त्याची थट्टा होत असे. परंतु ह्यान्सेटकर्ते लिहितात कीं, बेडकाच्या कातडीमध्यें एक प्रकारचें विष आहे तें जलोदरावर लागूं पडण्यासारखें आहे. कोणच्या वस्तूमध्यें परमेश्वरानें काय गुण ठेविला आहे, हें कळून आलें ह्मणजे परमेश्वराचें मोठें कौतुक वाटतें.

चिनांत एक जातीचा नाग आढळतो ज्याच्या तोंडांतून तो एक मणी बाहेर काढतो व वाटेल तेव्हां पुनः गिळून टाकतो. या नागापुढें चिनी लोक जाण्यास भितात. असल्या जातीचा एक नाग त्या देशांत नुकताच निघाला होता. तो डोंगराचा कडा फोडून बाहेर आला! यानें तो कडा फोडला त्यावेळीं खडकाचे दोन मोठाले दगड खालीं पायथ्याशीं असलेलीं सहा घरें जमीन दोस्त झालीं व २० मनुष्येंही ठार मेलीं! हा सर्प विशेष मोठा होता असेंही नाहीं. हल्लीं जो सर्प निघाला होता त्याची लांबी फक्त १ फुट असून घेर ८ इंचाचा होता. या वरून कालिया वगैरे भयंकर सर्पांचें जें वर्णण पुराणांतरीं आढळतें तें खोटें असेल असें ह्मणवणार नाहीं. सु. प.

विद्युद्यंत्राच्या साह्यानें पाहिजे तितके लांब राहून, टाईप जोडणें किंवा वाजा वाजवितां येईल असा एक नवा शोध, अमेरिकेंतील डानहड मेरे नावाच्या एका शोधकानें लावला असून, त्या यंत्राचें पेटेंट तो मिळविणार आहे.

चीन व जपानमध्यें हिंदुस्थानचें कापड स्वस्थ विकतां येण्यास आगबोटीचें भाडें कमी पडलें पाहिजे ही खबर, जपानच्या आगबोटीवाल्यांनीं केली आहे. त्या मुळें हिंदुस्थानांतील गिरण्यांत होणाऱ्या कापडाच्या व्यापारास तेजी येईल असा संभव दिसतो.

माणसांस जशी भाषा आहे तशी जनावर वगैरे प्राण्यास तर आहेच, परंतु झाडांसही तशी भाषा आहे असें एक कोलंबोचा तत्वज्ञानी सांगतो.

मतस्वातंत्र्य—ज. रानडे व ज. कपांडी यांजपुढें एक अपील आलें होतें. त्यांत ज. कपांडी यांनीं तें नामंजूर करून सही केली व ज. रानडे यांजकडे दिलें. परंतु तें मंजूर करतां येतें असें आपलें स्पष्ट मत ज. रानडे यांनीं दिलें.

ब्रह्मदेशांत हिऱ्याच्या खाणी आहेत ह्मणून विलायती कंपन्यांनीं हजारों रुपये घालून मेहनत केली. परंतु त्यांच्या खर्चाची देखील बरोबर भागाभागी होत नाहीं अशी स्थिति झाली आहे. हल्लीं आतां तेथें सोन्याच्या खाणी चालण्यासारखी जमीन आहे ह्मणून वाटाघाट चालू असून, त्याचा अनुभवही घेण्याचा विचार आहे. श्री. स.

नोटीस.

रा. रा. विठोबा बा॥ रामजी राहणार खेकडी ता० आकोले यास नोटीस देण्यांत येते कीं तुमची नोटीस पावली. मौजे नवथळ ता० आकोले येथील सर्वे नंबर ७ यांत कदीम पासून तीन हिस्से होते त्यांत एक हिस्सा आमचा, दुसरा आप्पाजी गुरव राहणार आकोले यांचा व तिसरा तुमचा बाप रामजी याचा याप्रमाणें हिस्से होते आप्पाजी गुरव याचा $\frac{1}{3}$ व तुमचे बापाचा $\frac{1}{3}$ असे दोन हिस्से आह्मी विकत घेतले आहेत हे तुह्मास माहित आहे सबब आता साबीत शेत आमचे मालकीचे आहे त्यांत तुमचा कोणतेही प्रकारचा संबंध नाहीं फक्त शेताचे खाते तुमचे बापाचे नावे असल्यामुळें तो मयत जाल्या नंतर तुमचे नांवें लागलें आहे तें आमचे नांवें करून देण्या विषयीं तुह्मास पुष्कळ वेळां ह्मटलें असतां तुह्मी करून देत नाहीं, करितां नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत शेताचें खातें आमचे नांवें करून द्यावें तसें न केल्यास तुमचेवर दिवाणी कोर्टांत खाते नांवें करून घेण्या बद्दल या नोटिसीचे खर्चासह दावा करण्यांत येईल कळावें ता० ९।१२।९२ इ०

सही.

हरदयाळ गोविंदराम दुकान

सांगवी तर्फे मु०

पांडुरंग रामचंद्र

दस्तूर खुद.


## जाहिरात.

हे पाक पथ्य व शिवाय ता. २६।१२।९१ इ. चे वैदर्भीत व शुद्धवऱ्हाडी पत्रांत छापलेल्या औषधी हमेशा मिळतील.

या हेमंत ऋतूंत हिवाळ्यात खाण्यानें पौष्टिक, शक्तिस्फूर्ति व स्मरण शक्ति, मिळेल; व हस्तपाद, कंबर सांधे, ठणका आणि सर्व वातविकार खात्रीनें नाहींसे होतात. बाळंतिणीस व सर्व स्त्रियांस शक्ती देणारी सौभाग्यसुंठ व सर्व पाक विक्रीस तयार आहेत. वाटेल त्यांनीं मागविल्यास आह्मी व्हाल्युपेबलनेंही पाठवूं. पोष्टखर्च निराळा पडेल. त्वरा करा, गेली वेळा पुन्हा येत नाहीं.

१ सालममिश्रीपाक दर वोरास ( ८० तोळ्यास ) } किंमत ३ रु

२ बदाम पाक.......................२॥ रु.

३ सालममिश्री व बदाम प्रत २........ ३ रु.

४ सौभाग्यसुंठ ............................ २ रु.

५ कुष्मांड पाक ............................. १ रु.

६ गोखरू पाक .............................. ७ रु.

७ प्रवाल, वंग वगैरे भस्में व औषधी तयार आहेत.

पत्ता — शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर दवाखाना.

आकोला — वऱ्हाड.


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Single copy..............................4 as

सालअखेर " " १८

किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines.. 2 Rs
per line over10 .. 4 as
Repetition per line 3 as

VOL XXVII AKOLA MONDAY 18 DECEMBER 1893 NO 49

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख १८ माहे डिसेंबर सन १८९३ इ० अंक ४९

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकेट मिळावें म्हणुन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७
६ प्रमाणें.

दि. कि. क्ला. १५ मि. नंबर १९/१८९३
वर्ग १५

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नाव— शामराव
बापाचें नाव कृष्णाजी आ. पा. सदाशी व ही मुकाजी राहणार घानोर ता० बैतुल जि० बैतुल यांस मयत.

कृष्णाजी बापाचें नाव — राहणार घानोरें तालुके बैतुल जिल्हा बैतुल याचे कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक आहे म्हणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारे मिळण्यात येत आहे कीं त्याणीं तारीख ६ माहे जानेवारी सन १८९४ इ० रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हका विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ५ माहे १२ सन १८९३ इ०

W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpoor District
जज्ज.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकट मिळावें ह्मणुन त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७
कलम ६ प्रमाणें.

दि. क्ला. १५ मि. नंबर ११/१८९३

वि० सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा आकोला यांचे कोर्टांत.

नांव— बालुबाई जवजे रामकृष्ण देशपांडे तर्फे मुखत्यार गणेशभाईजी राहणार जळगांव ता० जळगांव जिल्हा आकोला यांस मयत रामकृष्ण बापाचें नांव गंगाराम राहणार जळगांव ता० जळगांव जिल्हा आकोला यांचे कर्ज वसूल येण्यासाठीं सर्टीफिकाट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकारितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांनीं ता० ६ माहे जानेवारी सन १८९४ इ० रोजी सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हकाविषयीं लेखी हकिकत दाखल करावी. ता० ११ माहे डिसेंबर सन १८९३ इ०

V. N. Dandeker.
सिव्हिल जडज्य

## विजया दशमीचें सोनें.

THE LOST LOVE

She dwelt among the untrodden ways
Beside the springs of Dove;
A maid whom there were none to praise,
And very few to love.
A violet by a mossy stone
Half-hidden from the eye!
—Fair as a star, when only one
Is shining in the sky.
She lived unknown, and few could know
When Lucy ceased to be;
But she is in the grave, and O!
The difference to me!

W. Wordsworth

प्रहर्षिणी

गोदेच्या तरुवृत या तटोपकंठीं
राहे ही वनिं असहाय कंबुकंठी ॥
सौंदर्या निरखुनि लुब्ध वा तयेच्या
प्रेमानें हत, नर ( सय ) तेथ केचा॥१॥
पंकानें सरसिज लिप्त गूढकांति
ईषल्लोचनपथगामि तें वनांति॥
वाटे हा वातनु नवि-अद्वितीया
आकाशीं नवरुचि तारका—मना या ॥२॥
अज्ञातीं बहुदिन कंठिले सखीनें
कोणी ही 'स्मृतिलव शेष ती' न जाणे
भू गर्भीं वसत असे सखी सुखाची
या चित्ता द्विगुणित हा विशेष जाची॥३॥

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १० शके १८१५

## राजा प्रजा आणि तिचें शिक्षण.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

बरें आमच्या उदार सरकारच्या अंगांत जर ताकद आहे असें जर म्हणावें तर मग आमच्या शिक्षणा करितां वास्तवीक जितका पैसा लागतो तितका खर्च करण्या संबंधानें आमचें सरकार इतके बेपर्वा—निदान इतके उदासीन तरी कां बरें आहे? असा उदासीनपणा दाखविण्याचें कारण एक आहे असें सरकार आह्मास सांगतें. तें कारण कोणतें ह्मणाल तर "कर्ज! कर्ज"! आमच्या श्रीमंत सरकारला कर्ज झालें आहे! आह्माला अतीशय कर्ज झालें आहे असें आह्माला आमचें सरकार सांगत असतें। व जमाखर्चा-च्या खर्ड्यामध्येंही ही कर्जाची रक्कम दाखविली आहे. ती बघितली ह्मणजे आमचा ऊर दडपून जातो! जमाखर्चाच्या तक्त्यामध्यें नमूद केलेला जो कर्जाचा आंकडा आहे तो फारच मोठा आहे. आमच्या सरकारला एक अब्ज त्रेचाळीस कोट रुपयांचें कर्ज झालें आहे! हें कर्ज आमच्या सरकारच्या हातून फिटणार केव्हां? याची आह्माला फार काळजी लागली आहे. पण आधीं हें कर्ज उद्भवलें तरी कसें? हिंदुस्थाना पासून नव्वद कोटींचें दरसाल उत्पन्न होत असतांनां मग हें एवढें राक्षसी कर्ज झालें तरी कसें! याच्या पायीं आमच्यावर—आज काय उत्पन्नावर कर—उद्यां काय इमल्यावर कर—परवां काय मीठावर कर—तेरवा काय शरीरावर कर— पुढें काय जिवण्यावर कर— असे हजारों कर लादले गेले आहेत. त्या मुळें आह्मी अन्नाला महाग झालों आहों. आमच्या शरीराची माती व्हावयाला लागली! त्यांतून दुष्काळा सारखीं महा संकटें आमच्यावर गुदरताहेतच! असा सर्वतोपरी आमचा नयनाट व्हावयास लागला आहे! पुन्हां आह्माला शिक्षण जितके स्वल्प तऱ्हेनें मिळावें तितक्या स्वल्प तऱ्हेनें मिळत नाहीं तें नाहींच! हें कोणीही कबूल करील! पहा सैन्याकडे सरकार अतोनात पैसा खर्च करित आहे! आणि दरसाल तो खर्च वाढतच चालला आहे पण शिक्षणाच्या संबंधानें याच्या अगदीं उलट प्रकार आहे! आमचे कनवाळू सरकार लोकांना शिक्षण देण्याच्या कामांतून अगदीं अंग काढून घेत आहे तें कां बरें? . सैन्य वाढविण्यासाठीं सरकारला फुरसद सापडते. परंतु शाळांची व पाठशाळांची संख्या वाढविण्या साठीं आमच्या दयार्द्र सरकारला फुरसद सांपडत नाहीं काय? सैन्याचा प्रचंड खर्च चालविण्याची ताकद आमच्या देशाधिपतीच्या अंगांत असावी. परंतु आपल्याच प्रजेच्या शिक्षणा संबंधीं योग्य खर्च करण्याचा मगदूर त्यांच्यांत नसावा काय? इंग्लंडचे लोक येथें आणून त्यांनां मनमुराद पगाराची चंदी देण्याचे वेळेस मात्र सरकारची तिजोरी भरलेली असते. आणि प्रजेचें कल्याण करणारें जें शिक्षण त्या बद्दलचें चिक आलें ह्मणजे मात्र खजिना अगदीं रिकामा होतो काय? वाचक हो येथेंच एक गोष्ट सांगितल्या वाचून रहावत नाहीं. कर्नल ट्राटर नामक एका तरवार बहादर सद्गृहस्थानें "हिंदुस्थानचे प्रथम गव्हर्नर जनरल जें वारन् हेस्टिंग्स त्यांचें एक लहानसें चरित्र लिहिलें आहे." त्यांत त्या पहिल्या भागांत त्यानें "इस्ट इंडिया कंपनीच्या नौकरांच्या एकंदर स्थितीचें वर्णन दिलें आहे." तें फार मजेचें आहे. हें वर्णन कारकून लोकांविषयीं आहे.. "कर्नल ट्राटर असें लिहितात कीं ज्यावेळेस इंग्रज लोक हे इस्ट इंडिया कंपनी" हें नांव घेऊन व्यापार करण्यासाठीं हिंदुस्थानांत आले त्या वेळेस त्यानांहल्लीं सारखें थाटानें, डामडौलानें रहातां येत नसे. कारण अगदीं खालच्या प्रतीचा जो कारकून असे त्याला सालीना पांच पौंड मिळत असत. हे पौंड त्या वेळचे ह्मणजे सालीना पन्नास रुपये पगार मिळत असे. पेन्शन कांहीं नसे. रात्रीं तेल जाळण्याची पंचाईत. कारण पैशाची टंचाई, सबब दिवसा उजेडींच संध्याकाळच्या खाण्याची व्यवस्था ठेवीत, चांदण्या रात्रीं मात्र दिव्याची जरूरी मुळींच लागत नसे रहाण्याचा बंगला ह्मणजे कोळ्याचें खोपटें, पावसाळ्यांत दशा दशा उडावयाची. व याच मानानें सर्व नौकरांची, स्थिति होती." पण आतांचा प्रकार किती बदलला आहे. आतां जेवढ्या शेलक्या व उत्तम वस्तू असतात त्या शिवाय हल्लीं साहेब लोकांचें भागत नाहीं. रहाण्यासाठीं निदान २५।३० हजारांचा ऐटदार बंगला पाहिजेच पाहिजे. घोड्याच्या गाडी शिवाय निभावयाचेंच नाहीं. पट्टेवाले, बबर्जी हे हरहमेषा पाहिजेत. पण हा सर्व खर्च प्रत्यक्ष रीतीनें ह्मणा अगर अप्रत्यक्ष रीतीनें ह्मणा "दुर्दैवानें पोळलेल्या" हिंदुस्थान देशांतील अनाथ प्रजेला द्यावा लागत आहे. आमच्या सरकारच्या देशामध्यें ह्मणजे इंग्लंडमध्यें "इंडिया आफिस" ह्मणून हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहण्याकरितां एक संस्था आहे. तिच्यामध्यें जे अगदी हलक्या प्रतीचे कारकून आहेत त्यांनां प्रत्येकीं निदान सालीना शंभर पौंड पगार असतो व तितकेंच पेन्शन मिळतें! हल्लींच्या मानानें प्रत्येक कारकुनाला कमींत कमी वर्षाकाठीं दीड हजार रुपयांचें हयाती पर्यंत उत्पन्न असतें! व असे कारकुनच किती आहेत त्याचा पत्ता नाहीं. बरोबर आहे, इस्ट इंडिया कंपनीला पदरचा पैका द्यावा लागत असे; हल्लीं आमच्या सरकारची स्थिति तशी नाहीं. कारण "अपापाचा माल गपापा." हिंदुस्थान सारखी कामधेनु व हिंदुस्थान देशांतील लोकांसारखे तिचें दूध काढून देणारे आमच्या सरकारला सांपडले आहेत मग चंगळ ती, तें कां ह्मणून उडविणार नाहींत! हा मानवी स्वभावच आहे. "हलवायाचें चांगलेंसें दुकान सांपडलें ह्मणजे त्यावर ब्रह्मार्पण करावेंसें वाटणारच. यांत नवल तें काय! हिंदुस्थानच्या संरक्षणा करितां, परचक्राच्या तडाक्यांतून सुटण्यासाठीं हिंदुस्थानांत अतोनात फौज

हिंदुस्थानच्या संरक्षणा करितां परचक्राच्या तडाक्यांतून सुटण्यासाठीं हिंदुस्थानांत अतोनात फौज काळी व गोरी ठेविलेली आहे व तिचा खर्च आमच्याकडे लागला! पण इंग्लंडांत जी आहे तिला जो खर्च लागतो त्याचा तिसरा हिस्सा सरकार आमच्या पासून कोणत्या तत्त्वावर घेतात! हा रिकामा खर्च आमच्या डोक्यावर कां! तोही लहान सहान नाहीं! तोहा दोन कोटी ऐशी लक्ष पौंडाचा बोजा आहे. ह्मणजे २८ कोटी रुपयांचा चुराडा दर वर्षी, याला "होम चार्जेस" असें ह्मणतात. त्या फौजेचा तिसरा भाग आमच्या संरक्षणा करता राखून ठेविलेला आहे कीं काय; पण असें आहे ह्मणतात. परंतु तें काय ह्मणून? आमच्या देशांतच सैन्यांत ठेवण्या लायख लोक नाहींत कीं काय; आह्मी "व्हालंटीयर कोर" द्यावे ह्मणून सरकारची किती वर्षे आह्मी एक सारखी विनवणी करतों आहो. पण ती आमची विनवणी सरकारच्या कानीं पडत परंतु तिचा आवाजच कर्णेंद्रियांत पुरता जात नाहीं! जात असेल तर काय झालें! पण हो "व्हालंटीअर कोअरची परवानगी जर दिली तर हें शिकलेले व त्यांतून हे ब्राह्मण त्यांतून कोंकणस्थ ब्राह्मण काय करतील कोण जाणें असें आमच्या सरकारला वाटत आहे! पण "अविश्वास! अविश्वास"! आपण कसले लुच्चे, राजद्रोही अशा खात्री झालेल्या!

( पुढें चालू )

---

गेल्या आगष्ट अखेरीस मुंबईस जो हृदयद्रावक दंगा झाला तो डोळ्यासमोर वहात आहे हें पाहून कित्येकांच्या कविताशक्तीस स्फुरण चढलें असेल यांत संदेह नाहीं. कवींचीं मनें अद्भुत, करुण, वीर, भयानक इत्यादि रसांनीं तत्काल प्रफुल्लित होतात. एकाएकीं मुंबईस अठरापगड जातीचे लक्षावधि लोक भयानें चकित व स्तब्ध झाले, मुसलमानांचा बंडावा माजला, त्यांनीं नानाविध चाण्डालकृत्यें आरंभलीं, त्वेषानें कामाठी व घाटी लोक शिरकमल हातांत घेऊन दंगेखोरांशीं निकरानें लढले आणि लष्करी अमल कडक व जोरदार होई पर्यंत सर्वत्र एकच दाणादाण उडाली या व अशा गोष्टी पाहून शेट कानजी धर्मसी या नांवाच्या एका गृहस्थानें कांहीं पद्यें गुजराथी भाषेंत रचिलीं व तीं तावडतोब चोंहीकडे प्रसिद्ध झालीं. कवि अगोदर निरंकुश असतात आणि त्यांच्या देखत ज्या गोष्टी घडतात त्यांचें चित्र ते सहजी मनोवेधक व हुबेहुब उठवितात. मद्दत दंगा चालला असताना हें रचिलेलें गुजराथी त्रोटक काव्य वस्तुस्थितीचें दर्शक असून त्यांत कामाठी व घाटी लोकांनीं जो पराक्रम केला त्याचें यथार्थ वर्णन आहे. उत्साहोत्तेजक जे अनेक उद्गार आहेत, त्यांत निकरानें लढा असा हिंदूंना उपदेश आहे आणि त्या योगानें मुसलमान लोक बिथले इतकेंच नाहीं तर बंडावा उद्भवण्यासाठीं या काव्यकर्त्यानें बुद्धिपुरस्सर व दुष्ट हेतूनें काव्यरूपानें यत्न केला म्हणून राजश्री कानजी यांजवर पोलिसानीं फौजदारी रचिली. माजिस्ट्रेटनें तीन महिन्याची सक्त कैद व २०१ रुपये दंड ठोकून दिला. त्यावर नामदार जार्डीन व रानडे यांच्या कडे अपील होऊन त्यांत आरोपी निर्दोषी ठरला आणि त्याच्या काव्याची योग्य प्रशंसा झाली. इतिहासांतले जुने अनेक दाखले देऊन उभयतां न्यायाधीशांनीं निर्णय केला कीं सर्व काव्याचा अर्थ एकत्रपणानें घेतला म्हणजे ग्रंथाचा उद्देश गैर दिसत नाहीं आणि त्यांत धामधूम मांडण्याचें विषयीं उत्तेजन आहे. काव्य गुजराथींत असल्या मुळें त्यांतील दंगेखोरांस कळलें देखील नसेल शिवाय त्याच्या मुळें दंगा कांहीं वाढला असा हो पुरावा नाहीं आणि कांहीं शब्द अपवादक असले तरी तात्पर्यदृष्टीनें अशा गुणवर्णनपर व चित्तवेधक काव्या पासून कांहीं भलतीच काल्पनिक भिती बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. सारांश, हा निकाल सर्वांस आवडला, तसा यापासून वृथा कांहीं तरी खोटा आरोप प्रत्येक लेखावर लादणाऱ्या पोलीसास थोडाबहुत उमज पडेल तर बरें!

---

विलायतेस ब्रिटीश कांग्रेस कमिटी आहे ती भावी व्हाइसराय लार्ड एलजिन यांची मुलाखत घेऊन इकडील राजकीय चळवळीचें स्वरूप लाट साहेबांस कळविणार आहे आणि त्या पूर्वींच वृद्ध पितामह दादाभाई नवरोजी यांनीं त्यांच्यापाशीं कांहीं गोष्टी काढलेल्या आहेतच. हें पाहून आंग्लो-इंडियन लोक भलतेच कुतर्क काढूं लागले आहेत कीं, लार्ड एल्जिन ह्मणजे लार्ड रिपनची दुसरी प्रतिमा आहे. ईश्वर करो आणि हा कुतर्क खरा ठरो!

---

हल्लीं इंडियांत दोन मोठीं कमिशनें बसलीं आहेत. एक अफू कमिशन व दुसरें गांजा कमिशन. या दोन मंडळ्यांनीं स्थळोस्थळींचे चार अनुभवी लोक अफू व गांजा या बद्दल काय बोलतात त्यांचें टिप्पण करून नंतर आपला या दोन अमली पदार्थांसंबंधानें अभिप्राय ठाम करावा आणि त्या अभिप्रायाला शिरोलेख समजून सरकारनें या निशा आणणाऱ्या पदार्थां विषयीं निरनिराळे नियम करावे असा मूळ विचार आहे. आज पर्यंत अफू कमिशना पुढें ज्यांच्या साक्षी झाल्या त्या पैकीं बहुतेकांनीं असें स्पष्ट कळविलें आहे कीं, अफू ही मोठी गुणकारी औषधी आहे, तिचें मित सेवन सुग्रास अन्न पचवितें आणि शरीरास पुष्टी देतें. दारु पेक्षां अफूचा अंमल निरुपद्रवी, व कमी घातुक आहे. आणि हे गुण इतके चांगले आहेत कीं, ज्या ठिकाणीं दारू पितात तेथें दारूच्या ऐवजी निर्धास्तपणानें अफूचें व्यसन जडू दिलें तरी देखील मोठा फायदा होईल. अफूचें सेवन बुद्धीचा विकास करितें, काम करण्याला तरतरी आणितें व अपराध करण्याकडे प्रवृत्ति व विषा सारखा तिचा अंमल नसतो. अफू संबंधानें जसें अनुकूळ मत पडलें तसेंच भांग व गांजा यांच्या संबंधानें लोकांचे विचार बाहेर येत आहेत. सर्वच निशा आणणारे पदार्थ अति सेवनानें अपाय करितात तेव्हां अति तेथें माती असें होऊं न दिलें तर त्या पासून थोडाबहुत तरी गुणच होतो. इंग्रजी बरोबर जी नाटकी आपल्या देशांत आली आहे ती आपल्या देशी अंमली पदार्थांची थोरली बहीण आहे. त्या आकाबाईची चिकाटी मोठी कठीण व बळकट आहे हे वरील कमिशनवाले तिला हृदपार करितील तर बरें!

---

गोरे सिव्हिलियन तरुण बांड असतांनाच विलायतेहून सुटतात आणि या देशांत जिल्ह्या जिल्ह्याचे अधिपती बनतात. अगोदर अनुभवशून्य असतात, माजिस्ट्रेटी अधिकार हातांत असतो, मनोवृत्ति फार चंचल व अमर्याद असतात, आणि पगार थैल्याच्या थैल्या मिळाल्यानें अंगांत बेपरवाईची मोठी रग असते या सर्व गोष्टी जेथें जुळतात तेथें काय शक्य नाहीं. एक तत्ववेत्ता ह्मणतो कीं मनुष्य हा संधी मिळेल तेव्हां पशूहून पशू बनेल. हें तत्व गोरे तरुणांच्या ठिकाणीं चांगलें फळास येतें. हारिसन ह्मणून एक डेपुटी कमिशनर पंजाबांत मांटगोमेरी जिल्ह्यांत होते. त्यांनीं एका हाताखालच्या मनुष्याची बळजोरीनें दाढी उपटून काढिली. आणि किटाळ अंगावर येतें असें पाहून विलायतेस रजेवर गेले. या प्राणि कोटींतील नराला तीन वर्षे नुकतीं झालीं होतीं लाहोरच्या 'ट्रिब्युन' पत्रानें हा ओरड लेफटेनंट गव्हरनर कडे केली तेव्हां त्या स्थानिक सरकारच्या सूचनेवरून स्टेट सेक्रेटरींनीं हारिसन यांस बरतर्फ केलें. आतां हा देहधारी नर आपलें गोरमुख निजधामीं कृष्ण करितें ही आनंदाची गोष्ट होय. हारिसनला हुसाबणला नको. त्याच्या सारखे कित्येक जण प्रतिप्रांत आहेत एका पक्षीं टावळ व डोकेफोड आराव करणारा हारिसन बरा पण कांहीं त्याचे जातभाई नेटिवांच्या हकपावर जोडा उडविण्यांत, त्यांस बुटांनीं लाथळण्यांत व तऱ्हेतऱ्हेचा उद्दामपणा करण्यांत कुशल असून कायद्याच्या कक्षांत सांपडत नाहींत त्यांचा समाचार कोण घेईल बरें? मेसर्स फिलिप्स व राडीस हे साहेब गुण उधळून उघडकीस बंगाल्याकडे मार्गेच आले आहेत. पण त्यांची नोकरी अद्याप बहाल आहे. या प्रांतांत असलीं गावील रत्नें नसतील असें नाहीं परंतु आह्मी उमेद बाळगतों कीं निदान तीं वरील उदाहरणानीं छिन्न व भिन्न होऊन एखाद्या चांगल्या जंत्रींत गोंवलीं जातील.

---

येथील माजी प्रसिद्ध वकील रा. रा. अमृतराव आबाजी कार्णिक यांचा व रावसाहेब देवराव विनायक यांचे कनिष्ठ बंधु बळवंत विनायक पेंढीवाले यांचा एका जमिनी संबंधानें मोठा तंटा पडला होता. उभय पक्षकार समजूतदार व सुज्ञ असल्यामुळे त्यांनीं आपला वाद निवाडा पंचाकडे नेला पण तेथें निकाल न लागल्यामुळें उभयतांनीं आपली पंचाईत रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांजकडे सोपविली. राजश्री खापर्डे यांनीं गेल्या फेब्रुअरी पासून सर्व प्रकर्ण चालवून गेल्या १९ व्या तारखेस निकाल सांगितला. पेंढीवाले बळवंतराव हे धनको असून त्यांची सरासरी ८ हजार बाकी ऋणको अमृतराव यांजकडे वहिखात्या वरून निघत होती परंतु निकाला अंतीं हुकूमनाम्यात न्यायाधीश पंचांनीं धनकोचें देणें कांहींच नाहीं. पण उलटें सव्वा सहा हजार रुपये धनकोनें ऋणकोचे निघतात असें ठरविलें. या प्रकरणा विषयीं कांहीं माहिती कळवून त्यांतील कांहीं बावपर गोष्टी वेच्या सारख्या आहेत त्या सवडी प्रमाणें पुढें प्रसिद्ध करावया असा आमचा विचार आहे. असो पंचांनें शेवट गोड झाला हें पाहून आनंद वाटतो.

---

बेटीश संस्थानांत मुख्य पहिल्या प्रतीचें संस्थान निजाम सरकारचें. ही प्रतवारी राज्यविस्तारा संबंधानें झाली परंतु राज्यकारभारा संबंधानें या संस्थानचा नंबर फार खालीं लागेल. हैदराबाद दरबारची अंधेर नगरी प्रसिद्ध आहे. थोरले सर सालरजंग होते तेव्हां सर्व कारभार मोठा सुरळीत व बिनबोभाट चालला होता. परंतु त्यांच्या पश्चात् हा काल पावेतो राज्यांतील कारस्थानें प्रचलित आहेत. हीं कारस्थानें ह्मणजे एका प्रकारची आपसांतली यादवी होय. कोणी कोणाचा उत्कर्ष होऊं देऊं नये हें त्यांतलें मूळ तत्व. आपसांत दुही, फाटाफूट व वैमनस्यें हीं सदा सर्वकाळ कारभार चालवित असतात. राज्यांतील अधिकाऱ्यांस आपल्या जागेचा स्थिरस्थायीपणा भासत नसतो. स्वसंरक्षण व स्वतःचें वैभव या पुढें कोणाचें लक्ष जात नाहीं तेव्हां अशा स्थितींत राज्यकारभार कसा चालत अहे हें कल्पनेनें चांगलें कळेल. रेसिडेंट शांत स्वभावाचा, निरपेक्ष बुद्धीचा, व ढवळाढवळ न करणारा असा असला तर बरें; नाहीं तर 'दे माय धरणी ठाय' असें होत असतें सांप्रतचे रेसिडेंट मि. प्लौडन हे विद्वान, नीतिनिपुण व धुरंधर आहेत पण त्यांच्या स्वभावाला चूक, दोष, व अपवादक गोष्टी सहन होत नाहींत. ते लागलींच दुरुस्ती करितां वाटेल त्या हरतऱ्हा करण्यास तयार असतात. म्हणून त्यांच्या हातुन तिऱ्हाइत पणाची देखरेख ठेवितां येत नाहीं. वास्तव त्यांच्या पासून त्या संस्थानला लाभ होण्याचा संभव आहे तितकी भितीही आहे. सर अस्मान जहा यांची दिवाणगिरी संपून आतां नवाब विकार उल्मुल्क हे दिवाण आहेत. राज्यकारभार कौंसिला मार्फत चालला पाहिजे. राज्य हांकणें हें कांहीं व्यक्तिमात्राचें काम नाहीं. तें कौंसिलाच्या हातुन चालविलें तर हल्लींच्या काळांत निभाव लागण्याचा संभव आहे. लोकांचा देवाजवळ अर्ज आहे कीं हे दिवाण यशस्वी होऊन निजाम सरकारचें राज्य निर्विघ्नपणें सुयंत्र चालो!

---

The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 18, 1893

## MR. HUME'S GLORY.

[Continued from the last issue]

If Mr. Hume had not this confidence in him; if he were of opinion that the English heart was made of stone and not of flesh and that when India asked for bread, his countrymen would give her stones, he would never have taken the trouble of organizing the National Congress He would have quietly contentend himself with his pension and spent the remainder of his life in surveying the falls of the Naigara, or the ruins of Babylon. But fraught with this conviction and believing that India needed a political as well as a religious or social reform, he resolved to inculcate the grand doctrine of his political faith in every right thinking native and soon there was a consensus of opinion regarding the necessity of such a body as the Indian National Congress. The call was responded to from every nook and cor-

ner of the country and the first fruit of his labour saw the light of day in the Island of Bombay in the year 1885. That was the 1st. formation of his political church. Since then it has had 8 sittings in different parts of the country. But in the meanwhile, in some places opposite gale has been blowing and there have been anti Congresswallas seeking to throw blight and vermin in the midst of his crops and it is necessary that our weak brothren should be strengthened. In the early days of christianity Paul the apostle of the Gentiles, after he had established churches in various places had to repeat his visits to those places in order to encourage those who had newly become converts to the christian faith and to enlist the sympathies of those who seemed angry with the christian world. Similarly, Mr. Hume being the father of this new Political creed, his visits to the different centres will be looked upon as reassurances of his faith in the doctrime and his confirmed love for those who have accepted this noble cause for the improvement of their country by such constitutional measures as would ensure greater love for Britain and more perfect loyalty to their beloved sovereign. When he thus surveys his work, may we give him reasons to declare "I have seen and find all is good."

I am sure you all love Mr. Hume for what he has done for us in India But mark what he has done for us in England. He knew that a Congress gathering held only once a year would be too inperfect a method to rouse British sympathy and that Indian voice passed through English organs would be more effectual and telling upon the English mind. With this view he with the assistance of his English friends established a British Committee of the National Congress. This Committee does not merely reverberate the piteous cries of India into the English ears but adds to them the cogency of arguments and the weight of its social position thus imprinting our feeble utterances in indelible characters.

You have heard, my friends, of great statuaries. They flourished in the days of old. They certainly produced very extraordinary figures. But did you ever see a satuary making an Indian body crowned with an English head? Well if you have not seen such a one, I tell you Mr. Hume is that statuary upon the shoulders of the National Congress, he has set the British Committee and thus made a colossal figure. It speaks and lo! out comes the enlargement of the legislative Councils. Yea, it is pregnant with many more blessings yet to come. If you then love the artistic hand of the sculptor who carves a dumb statue out of a marble slab and becomes the object of astonishment and admiration by how much more ought you to love and admire him who out of such raw materials as he could find on the Indian soil has raised this Congress pillar with an English head to the gaze and admiration of the whole world and I may add to the annoyance of not a few to whom the sight of it bites shrewdly. What a powerful chemist that must be who by a judicious arrangement has produced such a cohesive power on the country that once a year at least, all the intelligent paticles of the educated mass should unite and deliberate on matters of the gravest importance and disperse to be only reunited again.

Men of valor have achieved conquests and sometimes cut up whole armies in bloody battles. But what man has there been either of antic or modern renown that has made India's sons meet in perfect loyalty to their sovereign to hold deliberations over their sinking fortunes and adopt constitutional measures for her political reform and progress! See all this in Mr. Hume and I assure you your love and regard for him would be infinitely greater and more durable.

My friends religion and virtue are often very enjoyable when they go in silver slippers and every one would wish to appear religious and virtuous as long as his path lies through smiling meadows and green pastures But virtue is never so tried as when it has to pass through the crucibles of trials and tribulations. You have heard the names of Harichandra and Hajarat Hoosen whose patience and endurance are almost unparalleled.

It is only such men who live to the glory of their Maker and leave behind a name, not simply to point a moral or adorn a tale but as foot prints on the sands of time which some forlorn and shipwrecked brother, sailing over life's solemn main, seeing may take heart again. If Mr. Hume's efforts were merely a matter of recreation after a heavy meal, he would have given them up as soon as the shoe had begun to pinch. But mark what struggles he had to encounter. As an Englishman, he was mocked, and jeered by his own countrymen. After one's retirement, what can be more desirable for one than to win the approbation of his own people! Who would choose to face the storm when his good service has earned for him a happy repose in the evening of his life— You have seen men who live upon popular applause. The least thing said against them drives them to make atonements and penances and fall back into the current of popular opinion. When moral courage is such a rare commodity amongst men, does he not deserve our highest esteem and respect who in spite of the bitterest denunciation of his own countrymen, has unflinchingly kept on to the path of duty and considered that alone to be the way to glory. Add to his the infirmities of old age and the sudden and sad bereavements which make life a continued scene of sorrow and misery and see whether any worldly allurements can attract a man to the calls of virtue. Then again the worry and expense of travelling over thousands of miles of sea and land every year is not to be lost sight of. If Mr. Hume has had to bear all this and more, does he not deserve our praises infinite times more than those who have only inspected schools and visited libraries in the course of their official tour and who on that account, at parting are loaded with double garlands and nose gays as tall as to reach the ear.

But how are you going to honor this visit of Mr. Hume's! You reply we have assembled here in hundreds. We have here lights enough to illumine this vast area. Here you say, you have the elite of Poona; there we have garlands and flowers enough to decorate and perfume this place. We will smile and repeat acclaimations of Hurras and cheers. Thus shall we receive him and thus shall we celebrate his advent. All this is good in its own way. But Mr. Hume never considered this to be the crown of his glory. Mere shows have no charms for him. I will tell you what he will like most and what he will consider as his hearty reception. This coming Congress has an unprecedented feature. We have a member of Partiament to preside and we have also Mr. Hume by his side. In the Congress of 1889, Mr. Bradlaugh did accompany Mr. Wederburn to India. But Mr. Bradlaugh did not preside and Mr. Wederburn was not then a member of Parliament. But it is not simply a member of Parliament that is to preside but it is *the* member of India who is to preside. He is an Indian, though zorastrian by race. By his unexampled perseverance and honesty of purpose, he has set himself in the estimation of the English public and as a mark of their approbation, the electors of Finsbury have chosen him as their representative in preference to other English candidates. Thus you see in him are British and Indian interests wedded together and I have no doubt you will take that wedding to be the grandest that was ever celebrated between any two Nations on the globe! He has fought for India. Th gh he has resided in England for may years, Indian interests have been the dream of his life. India has always b en the burthen of his song. Practically he is our member for India. Such a man as this in spite of his old age, at a considerable cost of money of which I am afraid he he has not had plenty, comes to assist us at our National deliberations. Oh! can you have such other perseverances' self and India's glory to preside If to witness this happy scene and take part in the proceedings, delegates from the Deccan Circle go by hundreds to the capital of the Seiks and show their appreciations of this grand and solemn occasion, Mr. Hume will consider his visit to Poona as amply returned and a most cordial reception accorded to him and of which the present occasion is only an earnest of what he may expect at Lahore. I trust many many of you will go to honor the man in whom India is so greatly honored. (to be continued)

---

Our correspoundent 'M' in the last issue referring to the Amraoti Municipality will be glad to learn that he has at his service in our office an *indirect* reply to his letter as embodied in the resolution of the Special General meeting held on Tuesday last in connection with the applications of two gentlemen in the same matter viz, stoppage of latrine—clearance. We have styled it an indirect reply because the resolution is personal & refers to individual complaints. Let however the public know the general grounds upon which the Municipality refuses to clear private latrines:—

(1) The Latrine cess is really no tax but payment for service rendered.

(2) People were all along warned by all available means to take out licenses under penalty of the loss of the services of the Municipal sweepers. And

(3) the Resolution No. 13 of 10th September 1891 authories the Municipal officers to stop the services of sweepers to privies owned or used by persons who have not taken licenses.

---

## वऱ्हाड.

हवामान—थंडी विशेष पडूं लागली आहे. आकाश निरभ्र असतें. पिकें चांगलीं जोरांत आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

कर्नल गनथार्प हे बुलढाण्याच्या डेपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज देऊन फर्लो रजेवर जाण पूर्वी उमरावतीस गेले होते. गेल्या १० वे तारखेस उमरावतीच्या लायब्ररीमध्यें नागरिक लोकांनीं साहेब बहादुरास पान सुपारी दिली आणि रात्रीं रा. रा. [illegible] श्री कृष्ण खापर्डे यांच्या वरीं साहेब कलाहारास आले होते. युरोपियन व नेटीव मुख्य मुख्य गृहस्थ बहुतेक जमले होते. कर्नल गनथार्प साहेब आपल्या गोड व प्रेमळ स्वभावानें व नेटीवां विषयींच्या कळकळीनें सर्वांस प्रिय झाले होते. कर्नल साहेबांचा कारकीर्द रयतेला फार सुखावह झाली आहे म्हणूनच लोकांच्या प्रेम पूर्वक सन्मानास ते पात्र आहेत. साहेब बहादुर गेल्या सोमवारीं विलायतेस जाण्या साठीं मुंबईस रवाना झाले.

उमरावती शहरचा दगडी कोट पाडून त्याचा मालमसाला शहरास मोऱ्या बांधण्या कडे करावा अशा बद्दल वाटत आहे प्रमोद सिंधु कर्ते या व्यवस्थे विषयीं आपला अभि प्राय अनुकूल असा दर्शवितात.

वऱ्हाड सार्वजनिक सभे मार्फत नऊ प्रतिनिधी राष्ट्रीय सभेसाठीं निवडण्यांत आले. हे बहुतेक ठळक ठळक गृहस्थच आहेत तेव्हां निवड उत्तम झाली हें निराळें सांगणें नको.

अकोला व उमरावती येथील हायस्कुलाखेरीज बाहेरगांवच्या कांहीं शाळांतून आठव्या व नवव्या इयत्तांच्या परीक्षा साठीं जे उमेदवार आले त्या पैकीं स्कूलवाराने पास झालेल्यांची संख्या येणे प्रमाणें:—

नववी इयत्ता.

| शाळा | उमेदवार | पसार |
|---|---|---|
| मलकापूर | ६ | ६ |
| जळगांव | ७ | ३ |

आठवी इयत्ता

| शाळा | उमेदवार | पसार |
|---|---|---|
| परतवाडा | ११ | ९ |
| वाशीम | ६ | ४ |
| अकोट | ६ | ५ |
| मेहकर | ९ | ६ |

गेल्या १० वे तारखेस या जिल्ह्या तर्फे २३ प्रतिनिधी येत्या राष्ट्रीय सभेसाठीं निवडण्यांत आले. या निमित्त दोन हजारावर लोकांची जंगी जाहिरसभा 'बहिमनजी धर्म शाळेंत' भरल्याचे गेल्या सोमवारीं कळविलेंच आहे. या सभेतील सर्व भाषणें मोठीं जोरदार असून चालू विषयांवर समर्पक विवेचना दाखल होतीं. अध्यक्ष रा. रा. पांडुरंग गाविंद, व रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत, व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर, पांडुरंग बापूजी गजंदेकर, अबदुल कादर, मिरझा आबासेवग, शंकर गोविंद, रामराव गोपाळ देशपांडे व रावसाहेब देवराव विनायक इत्यादि गृहस्थांनीं या सभेंत व्याख्यानें देऊन राष्ट्रीय सभेच्या उपयुक्तते विषयीं, व नामदार दादाभाई, ह्यूम, वेडरबर्न इत्यादि गृहस्थांच्या अश्रांत परिश्रमा विषयीं श्रोतृ समूहाची पूर्ण खात्री करून दिली.

यंदा मुंबई युनव्हरसिटीच्या प्रिव्हीयस परीक्षेला ९९७ उमेदवार बसले होते. त्या पैकी ३८३ पसार झाले असून त्यांत वऱ्हाडांतील खालील विद्यार्थी पसार आहेत:—

दिगंबर कृष्ण कोल्हटकर—वर्ग १; शंकर पांडुरंग करकरे वर्ग २; आणि अबदुल कादर आगरकर; रामचंद्र पांडुरंग बेंद्रे. गोविंद गोपाळ बक्षी, बा. वं. चौबळ, वामन गणेश काडखेडकर, श्रीपाद बळवंत तांबे, आणि म. ब. गणोरकर— वर्ग ३

---

## वर्तमानसार

हिंदुस्थानांत गेल्या एप्रिलच्या अलिकडे १० नवी तार आफिसें झालीं. तार खात्याचें गेल्या सहा माहीचें उत्पन्न मागल्या सहा माही पेक्षां चार लाख जास्त झालें.

अफुची लागवड चांगल्या कसदार शेतांतच होते व ती लागवड बंद केल्यास त्यांत कापूस किंवा तंबाखु होणार नाहीं. या करितां अफूची लागवड बंद केल्यास लोकांचें फार नुकसान होईल असें सर बक नांवाच्या साहेबांनी अफुकमिशनास सांगितलें.

कलकत्याची तार सांगते कीं, ताग भरलेल्या एका बोटीस ता. ६ रोजी आग लागली. खलाशांनीं नदींत उड्या टाकल्या आणि क्यापृनानें आपल्या बायकोस खालीं लोटून दिलें व आपणही उडी टाकून तिला घेऊन कडेस गेला.

विलायतेंतल्या लोकांस दारूच्या बदल अफूचें व्यसन लावावें हें चांगलें असें मि. मुकरजी यांनीं अफुकमिशनास सांगितलें.

हिंदुस्थानांत रेल्वेची समृद्धी होण्याकरितां रेल्वे कंपन्यांस सरकारानें ज्या सवलती देवूं केल्या आहेत त्याची एक मत प्रश्न विचारल्या वरून सभेपुढें ठेवण्यांत आली.

बिहारच्या हद्दींत वार्षिक सर्वे करण्याच्या संबंधानें हिंदुस्थान सरकारें ह्मणणें स्टेट सेक्रेटरी कडे आलें काय? व त्या ह्मणण्याच्या विरुद्ध लोकांचे जे अर्ज तयार झाल्याचें प्रसिद्ध झालें आहे ते अर्ज येण्यापूर्वीं त्या प्रकरणाचा निकाल करणार कीं काय असें लार्ड कावरन यांनीं विचारल्या वरून अंडर सेक्रेटरी ह्मणाले कीं, नाहीं. हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें अजून आलें नाहीं. व तें आल्यानंतर त्याचा निकाल करण्यापूर्वीं त्या वर लोकांचें काय ह्मणणें आहे हें समजून घेण्या करितां योग्य मुदतपर्यंत वाट पाहण्यांत येईल.

चित्रा येथें एक नवा किल्ला बांधण्यांत येत असून तेथील लढाईंत मरण पावलेल्या डानियल साहेबांचें त्या किल्यास नांव देणार आहेत.

खिला येथें न्यायपाचें सामान सुमान येत्या वर्षापासून बाबुसर खिंडीच्या वाटेनें नेण्याची सुरवात होणार आहे.

ता. ३ रोजीं अपर मिक्स मधील बायकांच्या डब्यांत एकटीच बाई आपल्या तान्ह्या मुलासह असतां एकजण आंत गेला व कांहीं चघळपणा करूं लागल्या वरून तुमची माझी ओळख नसतां इतकी चवकशी कां करितां इत्यादि बोलून बाईनें त्याच्या एक तोंडांत भडकावली, तरी तो आंत शिरणारा सावध न होतां तिच्या तोंडावरून हात फिरवूं लागला, तेव्हा ती मोठ्यानें ओरडून रडूं लागली, त्या वरून टिकीट कलेक्टर, नाईट स्टेशन मास्तर, फौजदार, हेड स्टेशन मास्तर वगैरेही जमले. बाईनें तेथें उतरण्याचें नाकारलें तेव्हा तिचा पत्ता वगैरे टिपून घेतला, पुढें काय होतें पहावें. असें इगतपुरचा एक गृहस्थ लिहितो.

रशियन राजधानीच्या ता. १ च्या तारे वरून समजतें कीं, इंग्रज व अफगाण अमीर यांच्यात जें सख्य झालें त्याचा अर्थ तें रशियाच्या विरुद्ध झाले असा असून; सर डूरंडच्या रवानगीच्या वेळीं दरबारी अमिरानें जें बोलून दाखविलें त्यावरून व नवे येणारे हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लार्ड एलजिन व लार्ड रोजबरी यांणी नार्थब्रुक क्लबांत जें बोलून दाखविलें तें मध्य एशियांतील रशियन महमदन लोकांच्या हितास धमकी आहे असें होतें असें नावो रम्या नांवाच्या रशियन पत्राचें ह्मणणें आहे अमीर व लार्ड एलजिन यांच्या शद्बांवरून रशियास आपल्या हिताकरितां स्वतंत्र रीतीनें पाहिजे तसा उद्योग करण्याची आतां मोकळीक झाली असें होतें असेंही त्याच पत्राचें ह्मणणें आहे.

मुईकोट किल्याच्या भिंतीच्या मध्यें शत्रूचा गोळा आल्यास त्यास थंड करण्याकरतां जसा चिखल रेचलेला असतो त्याच प्रमाणें फ्रान्स व इंग्लंड यांच्या हद्दीच्या दरम्यान सायामचें राज्य असावें असें त्या उभयसरकारांच्या दरम्यान ठरलें आहे व आतां त्या दोन्ही सरकारांचे कामदार लवकरच तिकडे हद्दी कायम करण्याकरतां जाणार आहेत. किल्याच्या भिंतीमधल्या चिखलास नेहमी ओलावा असावा ह्मणून जसा शेजारच्या खाडीच्या पाण्याचा पुरवठा केलेला असतो त्याचप्रमाणें या उभय सरकारांच्या दरम्यानचें हें राज्य चीन सरकाच्या ताब्यांत राहील असें ठरविण्यांत आलें आहे. इंग्लंड व फ्रान्स या दोन तटांच्या दरम्यान तिकडे जसा सायाम हा चिखलाचा गोळा केला आहे त्याचप्रमाणें इंग्लंड व रशिया यांच्या दरम्यान इकडे अफगाणिस्थान आहे. ठा. अ.

निजाम सरकारानें जहागीरदारांच्या मुलांना सक्तीचें शिक्षण देण्याच्या कामीं चौकशी करण्याकरितां एक कमिटी नेमली आहे. दी. बं.

सेक्रेटरी ऑफ स्टेट यानां हिंदुस्थाना संबंधानें जास्त कर्ज काढतां येण्या करितां पार्लमेंटांत एक कायदा लवकरच दाखल होणार आहे.

निझाम हैद्राबादच्या व्यवस्थेबद्दल फार ओरड होत आहे या संस्थानांत अति अंधादुंधी चालत असल्यामुळें संस्थान बुडण्याची भीती आहे.

सियामांत सैन्य फार मोठ्या झपाट्यानें वाढविण्यांत येत आहे.

मि. प्रमोद बानर्जी यानां अलाहाबाद हायकोर्टाचे जज्ज नेमिलें. सु. प.

श्री सयाजीराव गायकवाड हे पुनः युरोपांत जाणार ह्मणतात. यांना खूळ लागलें किंवा दुसरी कांहीं अंतस्थ भानगड आहे कळत नाहीं.

येत्या वर्षीं पुनः शिकागोचें प्रदर्शन सुरू करण्याचा विचार आहे असें ह्मणतात.

चिमण्या शेतांत फार उपद्रव देतात त्यावर अमेरिकेंत एकानें उपाय शोधून काढला आहे. तो असा कीं, शेतांत दारूंत भिजविलेले गहूं फेकावे ह्मणजे ते खाण्याकरितां चिमण्यांच्या झुंडीच्या झुंडी येतात व त्या गहूं आनंदानें खाऊं लागतात. थोड्या वेळांत त्या गुंगून पडतात, मग खुशाल त्यांना धरावें. तिकडील शेतकरी लोक त्यांना मारून खातात. ह्मणजे खाणेंचें खाणें होऊन शेताचा उपद्रव कमी होतो.

प्रिन्सेस ऑफ् वेल्स ह्या हिंदुस्थान पहावयास येणार असल्याची वंदता आहे, क. त.

इंग्रज बायांची मिजास—लंडन शहरांतील लोकांची व विशेष करून तेथल्या स्त्री समाजाची मिजास किती वाढली आहे ह्याचा थोडाशी तरी कल्पना पुढील बातमी वरून होईल. ज्यांची मिळकत ह्मणण्यासारखी नाहीं अशा पुरुषांच्या प्रत्येक बायकोस दरसाल वेणीफणीच्या खर्चासाठी ह्मणून ६०० पौंड ह्मणजे रुप्याच्या उतरलेल्या हल्लींच्या भावानें ९६०० रु० खर्च लागतो. पण ज्या बाया बाहेर पुष्कळ हिंडतात त्या प्रत्येकीस निदान १००० पौंड तरी खर्च वेणीफणीसाठी होतो. आणि प्रत्येक नाचास फुलां प्रीत्यर्थ २००० पौंड खर्च येतो असें एका बड्या पदवीच्या इंग्रज बाईनें प्रसिद्ध केलें आहे. ह्या वरून लंडन शहर म्हणजे प्रतिलंका झाली आहे असें कोण म्हणार नाहीं?

दुधांत पाणी घातल्या बद्दल शिक्षा—कलकत्ता येथील मेडिकल कालेजांतील रोग्यासाठीं गवळ्यानें जें दूध घातलें त्यांत पाण्याचें मिश्रण केलें होतें. ह्या बदल त्याजवर खटला होऊन दुधांत पाणी घातल्याची शाबिती झाल्या वरून मा० नें त्यास तीन आठवड्यांची कैद व ९० रुपये दंड अशी शिक्षा दिली. दुधांत पाणी घालण्याचा प्रघात इतका माजला आहे कीं अशीं सक्त शासनें झाल्या शिवाय तो बंद होण्याची आशाच नाहीं. शु० सू०

बैरागी लोकांस शिक्षा.—अमदाबादेस नीलकंठ महादेवाचा अखाडा ह्मणून एक बैराग्यांच्या वस्तीचें स्थान आहे. त्या आखाड्याचे आसपास असणाऱ्या मोरांची शिकार करण्या साठीं कांहीं सोल्जर गेले होते. त्यांस सदरील अखाड्यांतील बैरागी मंडळीनें हरकत केली व त्या कामांत सोल्जर लोकांची व बैराग्यांची मारामारीही झाली. त्याव रून कित्येक बैराग्यांवर खटले होऊन गेल्या महिन्यांतल्या सेशनमध्यें अमदाबादचे जज्ज मि. म्याकार्क यांनीं १६ बैराग्यांस ३।३ महिन्यांची सक्त मजुरीची कैद व ५।५ शें रुपये दंड, आणि दुसऱ्या बैराग्यास १००।१०० रुपये दंड अशा शिक्षा दिल्या.

राणीसरकारचा हिंदुस्थानी शिक्षक व चिटणीस मुन्शी अबदुल करीम हा इकडे आला होता तो नुक्ताच आपले बायकोस व मुलीस घेऊन परत इंग्लंडाला ता० ४ नोव्हेंबर रोजीं जाऊन दाखल झाला, त्याच्या बायकोच्या व मुलीच्या तोंडावर इकडील मुसलमानी रिवाजा प्रमाणें बुर्खा होता. व हा बुर्खा त्यांचे तोंडावर नेहमीं राहणार. त्यांचे करितां राणीसाहेबांनीं फ्रागमोर येथें स्वतंत्र व त्यांचे गोषास हरकत येणार नाहीं अशा प्रकारचा बंगला बांधून दिला आहे. मुन्सीच्या बायकोच्या तोंडावर पिवळा बुर्खा व मुलीच्या तोंडावर काळसर रंगाचा बुर्खा असतो. ज्ञा० च०

खिशांतील घड्याळ, खिशांतील डायरी अगर डिक्शनरी हीं सर्व श्रुत आहेत परंतु एकानें खिशांतील छत्री शोधून काढिली आहे तिची घडी करून खिशांत ठेवतां येते. खरें का?

एशिआटिक क्वार्टरली रिव्ह्यूमध्यें विद्याखात्याचे डायरेक्टर अशा सहीनें एक पत्रव्यवहार आला आहे. हे गृहस्थ ह्मणतात कीं शाळाखातें हें मजला बुडविणारें खातें आहे. हे कोणते डायरेक्टर?

एका स्वीडिश मनुष्यानें १४ दिवस १७ तास २० मिनिटें इतक्या वेळांत १४ शें मैल प्रवास व यासकाळें केला.

हिंदुस्थानांत लवकरच कोठें तरी पाश्चर इन्स्टिट्यूट स्थापन होणार आहे यांत कुत्रें चावलेल्या मनुष्यांस औषध देण्याची व्यवस्था होणार आहे.

अमेरिकेमध्यें रस्त्यावर एखादा मनुष्य दुखावला अगर आजारी झाला तर इस्पितळांत ही बातमी समजतांच एक गाडी, आंत चांगला मऊ बिछाना व दोन डाक्टर शुश्रूषेकरितां, येऊन त्यास इस्पितळांत घेऊन जाते. न्या० सु०

## नोटीस.

बिदाई मर्द भानाजी काटोले वस्ती परंड ता० व जि० आकोले ईस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुझा नवरा जिवंत असतांना मी त्यास कांहीं रुपये दिलेले आहेत व कांहीं रुपये त्यानें सावकारी काढलेले आहेत त्यास मी जामीन आहे. एकूण देणें सरासरी हजार रुपये आहे. भोनाजी पाटील मयत झाल्यामुळें यांचे कर्जाची फेड त्याचे इस्टेटीवर व वारसा कडून होणें कायदेशीर आहे. ह्मणून तुजला असें कळवितो कीं आमचे येणें रुपये (१०००) ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत आणून देऊन निकाल करावा. तो पर्यंत तूं स्थावर व जंगम इस्टेटीची कोणत्याही प्रकारची आफरातफर करूं नये केल्यास त्याबद्दलची सर्व प्रकारची नुकसान वगैरे सर्व तुमचे पासून ह्या नोटीसीच्या खर्चासह भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही ता० १३।१२।९३ इ०

(सही)

रामजी वा॥ भिवसन पाटील वस्ती महागांव ता० जि० आकोले निशाणी खुद्द हातचा वखर.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून जाहिर केलें जातें कीं मोनाजी वा॥ गणाजी पाटील राहणार परंड ता० व जि० आकोले यांची स्थावर जंगम वगैरे इस्टेट कोणी गाहाण, बक्षीस, किंवा खरेदी, अगर कर्ज देऊन घेऊं नये घेतल्यास त्याबद्दलची सर्व प्रकारची जबाबदारी ज्याची त्याच्यावर आहे कारण सदर्हू पाटील याजकडे आमचे कर्ज येणें आहे याजकरितां आमच्या संमती शिवाय कांहीं करूं नये ह्मणून दिली जाहिरात सही ता० १३।१२।९३ इ०

(सही)

रामजी वा॥ भिवसन पाटील वस्ती महागांव ता० व जि० आकोले निशाणी खुद्द हातचा वखर

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साडेसहा महिने " ७ " १८
किरकोळ अंकास ..................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ......०१

Six monthly............3 " 8 as.
Single copy..............................4 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR.

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3as

VOL XXVII AKOLA MONDAY 25 DECEMBER 1893 NO 50

वर्ष २७ आकोला सोमवार तारीख २५ माहे डिसेंबर सन १८९३ इ० अंक ५०

### नोटिस

रा. रा. जगन्नाथ शंकरदास व रामदयाल व रामचंद व लछमी नारायण अज्ञान पालन करणार जगन्नाथ मारवाडी रहाणार मौजे देवठा व कोलखेडें तालुके अकोलें जिल्हे मजकूर, यास खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी जो तारीख १९ माहे जानेवारी सन १८८४ इसवी रोजीं सालंगदीचा दस्तैवज रुपये १३०० चा लालचंद रामदेव मारवाडी दुकान बोरगांव मंजु तालुके अकोलें यास लिहून दिला तो दस्तैवज व त्याज वरील सर्व हक्क आज रोजीं सदहू लालचंद रामचंद यांनीं श्री राजेश्वर महाराज संस्थान अकोला यांस दान केला आहे. सदहु, दस्तैवजावर लालचंद यांचा कोणचेही प्रकारची मालकी व हक्क राहिला नाहीं. सबब तुम्हांस या नोटिशीनें कळविलें जातें कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत आमचे कडे येऊन दस्तैवजाचा हिशेब करून जो काय बाकी निघेल ती देण्याचे संबंधानें योग्य तजवीज तुमचे आमचे सल्यानें करू. सदहू लिहिलेल्या मुदतींत तुम्ही येऊन निकाल न केल्यास रीतीं प्रमाणें दस्तैवजाचे शर्ती प्रमाणें कोर्ट मार्फत निकाल करून घेतां येईल. या नोटिशीचा व पुढें होणारे खर्च अखेर निकाल होईपावेतो जो होईल तो तुह्मांस द्यावा लागेल. परंतु तुह्मी विनाकारण देवाचे कामगारास त्रास देऊन कोर्टांत जाण्यास सांगाल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण देवाचे कामास कोणीही हरकत करणार नाहीं, तसेंच तुह्मीही पण करणार नाहीं असें आम्हांस वाटतें. इतक्या उपर आपली मर्जी. कळावें तारीख २०।१२।९३ इ०

(सही.)
शिताराम सखाराम चौधरी
सेक्रेटरी संस्थान श्री राजेश्वर आकोले.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ३ शके १८१५

## ( गर्भस्थ अर्भक )

( ता० २७ माहे नोवेंबरच्या अंकावरून समाप्त. )

आह्मी एकंदर उत्पन्न होणाऱ्या मुलांच्या शारीरिक व मानसिक रचनेचे पांच नियम दिले. पहिला, मूल बापा प्रमाणें असतें. दुसरा, मूल निव्वळ आई प्रमाणें असतें. तिसरा, मूल उभयतां प्रमाणें असतें. वरील अंकीं आह्मी प्रत्येक मुलाच्या शारीरिक व मानसिक रचनें मध्यें कोणते पांच विविक्षित फेरबदल होतात. ज्या संबंधानें (यांज विषय उदाहरणा सह दिलेच आहेत) तेच आज येथें पुन्हा देऊन तसें फेरबदल कां होतात यांचीं कारणें देण्याचा आज आमचा विचार आहे.

पहिला नियम असा आहे कीं मूल उभय मातापित्रां प्रमाणें असतें. दुसरा असा आहे कीं तें आई प्रमाणें अगर बापा प्रमाणेंच असतें. तिसरा असा आहे कीं तें अगदीं तिऱ्हाईता प्रमाणें असतें. चवथा असा आहे कीं तें कधीं कधीं स्त्री पुनरुद्वाहीत असल्यास तिच्या मृत पती प्रमाणें असतें. पांचवा असा आहे कीं स्त्री गरोदर असतां जीं असाधारण कारणें घडून येतात त्या कारणांवरून तद्रूप होतात. या नियमांच्या समर्थना ऐवजीं आह्मीं उदाहरणें दिलींच आहेत.

आतां असे परिणाम कां घडतात याचीं कारणें देण्यापूर्वीं एका मोठ्या तत्वाची वाचकांपुढें मांडणी केली पाहिजे. मनुष्याची शारीरिक रचना इतकी सूक्ष्म व चमत्कारिक आहे कीं ज्या गोष्टीचें आह्मी प्रतिपादन करणार आहों ती गोष्ट प्रथम दर्शनीं बरीच गूढ व असंबद्ध वाटेल. परंतु योग्य विचारान्तीं आमचेंच मत खरें आहे असा प्रत्येकाचा समज होईल.

प्रत्येक अशिक्षित मनुष्यास इतकें माहित आहे कीं, आपणास शिरा, रक्तवाहिन्या, धमन्या आणि मेंदू इतकीं ईश्वरानें दिलेलीं आहेत. परंतु मेंदूच्या अचाट शक्तीची व त्याच्या सर्व विशिष्ट गुणांची कोणास कल्पनाही नाहीं. मेंदू ह्मणजे सर्व रक्तवाहिनी शिरांच्या प्रत्येक चलनाचा व हालचालीचा मौलीभूत सूत्रधार आहे. मुंबईहून हिंदुस्थानच्या प्रत्येक भागांवर विद्युत संदेशाच्या तारा फडकत आहेत व ज्या प्रमाणें त्या तारा इकडील संदेश तिकडे फेंकतात त्या प्रमाणेंच या शिरा शरीराच्या कोणत्याही भागावरील होणारे विकार आपल्या मेंदूस विद्युत्वेगाहूनही अधिक वेगानें कळवितात. फारतर काय परंतु हवेमध्यें होणाऱ्या प्रातेक्षणीं विकारांचें देखील त्या आपल्या शारीरिक सूत्रधारास क्षणोक्षणी ज्ञान करून देतात. याचें उदाहरण फार जवळ आहे. उन्हाळ्यांतील अगर हिवाळ्यांतील उष्ण आणि शीत पवन स्पर्शाचें ज्ञान मेंदूस कोणाचे द्वारें होतें बरें? शोधक वैद्यांच्या अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे कीं, कोणतेही चर्मसंलग्न स्नायु मेंदूस एका पळांत एकशें पंचाणऊ फुटाच्या वेगानें बातमी पोंहोचवितात. पाचनक्रिया मेंदू पासून स्नायूंच्या द्वारानें जें विद्युद्द्रव्य कोठ्यास मिळतें त्याच्या योगानें होतें. एका वैद्यानें एकाच अन्नानें पोसलेले जाणारे दोन तितीर कांहीं दिवस आपले जवळ ठेविले; एकाची पाचन क्रिये करितां विद्युद्द्रव्य आणून देणारा व कोठ्यास आणि मेंदूस जोडणारा स्नायु तोडून टाकिला. त्याचा परिणाम असा झाला कीं, तो तितिर पक्षी लवकरच मेला. त्यास कापून पाहतां असें दिसून आलें कीं, त्याच्या पोटांतील भक्ष्य तसेंच्या तसेंच राहिलें होतें. मग लागलीच दुसरा मारून त्याच्या कोठ्यांतील भक्ष्य पूर्ण पचन झालेलें दिसलें. अशा प्रकारचीं उदाहरणें देऊन हा लेख वाढविण्याचा आमचा इरादा नाहीं. सूक्ष्म दृष्टीनें आणि शोधकपणानें वाचणाऱ्यांस एक उदाहरण पुरें आहे. मेंदूस आह्मी सूत्रधार तर ह्मटलेंच आहे व तो स्नायुगत विद्युद्द्रव्याचा विस्तृत खजिना आहे.

सर्व स्नायूं जवळून तें द्रव्य घेऊन प्रत्येकास त्याच्या कामा पुरतें वाटून देतो. हें काम फारच महत्वाचें आहे. सर्व स्नायूंचा मज्जातंतूशीं निकट संबंध असतो व मेंदूचें आणि मज्जातंतूचें एक सारखें दळणवळण चालूं असतें. कोणतीही हालचाल करावयाची असली ह्मणजे मेंदू मज्जातंतूस हुकूम करितो आणि मज्जातंतु इतर स्नायूंस हुकूम फर्मावितो व त्या वरून आपले हातून हालचाल होते. सर्व ज्ञानाचा संस्कारही मेंदुवरच होतो. कित्येकांचा मेंदू संस्कारास फारच जड असतो. अनेक रोगांचें बीजही मेंदूवरच अवलंबून असतें. सर्व शरीरांतील रक्त, स्नायुंची जंत्री, व मेंदू हीं साफ असतील तर रोग कधींही उद्भवणारच नाहींत हें अनुभवावरून प्रत्येक डाक्टरानें कबूल केलेलें आहे. जो संबंध स्नायूंचा आणि मेंदूचा आहे, तोच संबंध रक्ताचा आणि मेंदूचाही आहे. पाठशक्तीनें अगर स्मरण शक्तीनें व दुसऱ्या सहाय्यांनीं तरी आपण जे अनेक उपयुक्त संस्कार करून घेतो तेही सर्व मेंदूवरच घडवून घेतों.

वरील प्रस्तावनारूपीं जो उपोद्घात केला आहे तो वाचक जितका समजून व ताडून पहातील तितका जीं कारणें आह्मी देणार आहों त्यांस सुबोधच होणार आहे. हें खरें आहे कीं, आज ज्या विषयाचें आह्मी प्रतिपादन करित आहों तो व त्या सारखे अन्य विषय वर्तमानपत्राचे नसून ते मासिक पुस्तकाचे अगर दुसऱ्या एखाद्या निबंधरूपी ग्रंथाचे आहेत. परंतु असे विषय लोकांपुढें मांडून त्यांवर चर्चा सुरू होण्याचा काल आतां आहे. सबब असे विषय क्वचित् कालीं वर्तमान पत्रांत आले असतां त्या पासून लाभच आहे. आतां वर दिलेले पांच विशिष्ट फरक कां होतात हें दाखविणें फार सुलभ आणि थोडकें आहे.

मूल जन्मास येण्यास पुरुषशुक्रगत जीवतंतु आणि स्त्रीगर्भाशयाच्या सन्निधचें अंडाशयांतील अंडें यांचा ओहोटींत संयोग होणें अत्यावश्य आहे. हे जीवतंतु इतके सूक्ष्म असतात कीं एका मोहरी एवढ्या प्रमाणांत हे शेंकडोंशे राहू शकतील! जर हे इतके सूक्ष्म आहेत तर भावी मुलावर शारीरिक व मानसिक पूर्णता व अंमल बसाविण्यास यांच्यांत पूर्ण शक्ति कोठून असणार! ज्या जातीचा आंबा आपणास पाहिजे असेल त्याच आम्रफलाची कोय लावल्यानें तेंच फळ आपणास कधीं ही मिळत नाहीं. जमीन, पाणी, हवा, वगैरे अनेक अन्य पदार्थांचे परिणाम त्या फळावर आणि वृक्षावर घडतात. जो भूमिका या फळांस जन्म देते तीवर हीं विशेष अवलंबून असतात. लोखंडा वर आणि पोलादावर इतर धातू पेक्षां लोहचुंबकाचे फार जलद व कायमचे परिणाम घडतात.

याच प्रकारचे पुरुषेंद्रियाचे स्त्रींद्रियावर परिणाम घडतात. प्रत्येक पुरुषाचीं विद्युत्द्रव्यें भिन्न प्रकारचीं असतात. व त्याच प्रमाणें स्त्रियांचा मेंदू, गर्भाशय, इत्यादि अवयवही भिन्न प्रकारचें असतात. पुरुषाच्या जननेंद्रियाच्या योगानें स्त्रियांचा गर्भाशय जर कायमचा मोहून टाकला तर सर्व मुलें त्या पुरुषाच्या प्रमाणें शारीरिक आणि मानसिक रचनेनें परिपक्व दशेस आलेलीं आढळतात.

कित्येक स्त्रिया विलक्षण क्रूर, अभिमानी, विषयी पण पतीस शहाणपणांत, चातुर्यांत, आणि इतर गुणांत तुच्छ मानणाऱ्या असतात. अशांना संभोगेच्छा कितीही असली तरी त्यांच्या अवयवांवर पतिगुणाकर्षणाचें कांहींच परिणाम होत नाहींत. शिवाय कांहीं विशेष पदार्थच विशेष आकर्षणांस पात्र असतात. धनबीज आणि ऋणबीज या उभया बिजांचा संयोग कांहीं पदार्थांसच विशेष हितावह असतो. त्याच प्रमाणें कांहीं स्त्रियांचे अवयव अशा आकर्षणास फारच योग्य असतात आणि कांहीं वर तें मुळींच घडत नाहीं. कांहीं वर कायमचें घडतें व कांहीं वर नियमित काळा पुरतें घडतें. स्त्रियांचे हे जे तीन प्रकार सांगितले यांवर पुढील मुलांची मानसिक रचना बरीच अवलंबून असते.

याच तीन प्रकारच्या स्त्री वर्गावरून कांहीं मुलें हुबेहुब बापा प्रमाणें, कांहीं (ज्या स्त्रियांचा गर्भकोश आकर्षणास बिलकूल अयोग्य असतो अशांचीं) हुबेहुब आईप्रमाणें व कांहीं उभयतां प्रमाणें असतात.

आतां तिसऱ्या नियमा प्रमाणें कांहीं मुलें अगदीं तिऱ्हाईता प्रमाणें निपजतात. या नियमाचें कारण देतांना वर जो आह्मी मेंदू संबंधानें विस्तार पूर्वक विचार केला आहे त्यावर वाचकांचें फिरून एकवार लक्ष ओढलें पाहिजे. मेंदूवर एखाद्या व्यक्तीबद्दल अगर पराक्रमी वगैरे पुरुषाबद्दल वारंवार त्याचें वर्णन ऐकल्यामुळें एक कायमचा संस्कार होतो आणि त्या द्वारानें गर्भकोशादि अवय-

वांवर संस्कार झालेला असतो. या कारणामुळें नऊ महिने जेथें गर्भवास्तव्य करीत असतो तेथें त्याच्या शरीरावर आणि मनावर मूळव्यक्तीच्या रुपाचें आणि गुणांचे प्रतिबिंब उठतें. याच कारणामुळें मुलें हुबेहुब आपणा प्रमाणें व्हावीं अगर आपण मनांत आणूं त्या पुरुषाप्रमाणें व्हावीं अशी इच्छा असल्यास स्त्रियांना पूर्णपणें आपल्या मनाच्या काबूंत आणिलें पाहिजे हें उघड आहे.

त्याच प्रमाणें दुसरीं अनेक कारणें आहेत. त्यांच्या योगानें स्त्रीच्या मेंदूवर आणि मेंदूच्या द्वारें गर्भकोशावर आपणास लागतील ते संस्कार कृत्रिम रितीनें उठवून देता येतात. याच कारणामुळें अनेक प्रसंगीं वेडगळ माता पितरास सदृढ आणि बुद्धिमान संतति झालेली पहाण्यांत येते. घरांत व कुटुंबांत नेहेमी एखाद्या मृत मनुष्याच्या गुणादिकांचें वर्णन हरहमेषा चालत असतें. त्याचा परिणाम जर एखादे स्त्रीवर श्रवणा श्रवणानें घडला तर तोच परिणाम मेंदूच्या द्वारानें गर्भ कोशावर घडुन तिचीं मुलें त्या मृतमाणसा प्रमाणें होतात. तेव्हां तिसऱ्या वर्गाखालीं येणारीं सर्व मुलें या कारणावरून झालेलीं असतात. स्त्रीवर चांगले संस्कार होऊं देणें हें आपलें कर्तव्य आहे. व वैद्यशास्त्र दृष्ट्याही भावी प्रजेच्या मानसिक आणि शारीरिक मनवृत्ती करितां स्त्रीशिक्षण अत्यावश्य आहे. या नियमानें जर एखादें मूल मृत मनुष्या प्रमाणें हूबेहुब झालें असेल तर त्याच्या शरीरांतील व्याधिही या मुलास जडल्या पाहिजेत. व वास्तविक जर स्त्रीस त्याची पूर्ण माहिती असेल आणि सतत मननानें तिचा गर्भकोश त्या प्रकारें आकर्षित झाला असेल तर तसें होण्यास ही हरकत नाहीं. परंतु नेहेमीं अशा प्रसंगीं ज्या बीज तंतू वरून पुढे मूल जन्मास येतें त्या जीवतंतूच्या ही गुणांवर व शरीररचनेवर मुलाची सशक्तता, व्याधिमुक्तता इत्यादि अवलंबून असतात. सदृढ मुलाचा कोंडमारा केला असतां, त्यास पाण्यांत बुडविलें असतां अगर अग्नींत टाकिलें असतां त्याच्या मृत्यूचा जितका संभव आहे तितकाच वर दिलेल्या कारणांवरून त्याची शारीरिक आणि मानसिक रचना व वाढ होण्याचा संभव आहे. तरी मूळ बीजाचें सर्वच स्वरूप नष्ट होण्याचा संभव नाहीं.

वरील तीन नियमांच्या कारणांवरून चवथे आणि पांचवे नियमांचीं कारणें काढितां येतील. तरी ता आह्मी थोडक्यांत देतों. कांहीं स्त्रियांचा गर्भकोश फार नाजूक आणि आकर्षणास व आकर्षणजन्य परिणामांस फारच योग्य असतो. अशांवर बलात्कार झाला असतां अगर अशांचें पुनरुद्वाहन झालें असतां अगोदरच गर्भकोश आकर्षित झालेला असल्यामुळें संतती पूर्व पती प्रमाणें अगर पूर्व निंद्य तारुण्यचोरा प्रमाणें होते.

पांचव्या नियमाचें कारण फार थोडें आहे. गर्भारपणीं विलक्षण दोहदानें, अगर देखाव्यानें, अगर एखाद्या अद्भुत संस्कारानें प्रथमतः मेंदूवर परिणाम घडतात. आणि त्या द्वारानें गर्भकोशावर संस्कार घडून भावी मुलें तद्वत बनतात.

या प्रमाणें वरील पांच नियमांचीं पांच कारणें दिलीं आहेत. यांवरून अनेक प्रसंगीं मुलांच्या आकृती वरून स्त्रियांच्या पातिव्रत्याचा निर्णय करणें किती चुकीचें आहे व "बीज तैसीं फळें" असा सिद्धांत ठोकणें किती चुकीचें आहे हें मार्मिक वाचकांच्या सहज लक्षांत येणारें आहे.

---

नामदार दादाभाई नवरोजी एम. पी. हे मुंबई बंदरांत उतरल्या पासून त्यांच्या सन्मानार्थ पुण्या मुंबईकडे अपूर्व, रमणीय आणि टोलेजंग समारंभ होत आहेत. सर्वत्र त्या वृद्ध राजर्षीचा नामघोष ऐकूं येतो. त्या महापुरुषाचा धन्यवाद व जयजयकार करण्यांत सर्व महाराष्ट्रजन तल्लीन आहे. विजयशाली मुत्सद्दी दादाभाई यांच्याच संबंधाच्या गोष्टी सर्वतो मुखी व वर्तमानपत्रांतून कळतात. नामदार दादाभाई यांच्या शिवाय लोकांस अन्य विषय नाहीं. तिकडील समारंभ, सभा, अमृतमय वक्तृत्वें, जयघोष, आनंदोद्गार इत्यादि ज्यांस पाहण्यास व ऐकण्यास मिळतात ते खरोखरी धन्य व कृतकृत्य मानले पाहिजेत. 'दादाभाई' चार अक्षरी शब्द कानीं पडतांच एकदम एक निराळीच कल्पनासृष्टी डोळ्यासमोर उभी राहते. पुराणान्तरींचीं वर्णनें ऐकून जें चित्र आह्मी मनानें काढतो तसेंच चित्रकाराचें काम आह्मा सारख्या दूरच्या प्रांतस्थ लोकांस करावें लागतें तथापि 'दादाभाई' हा नाममंत्र चित्रांतल्या पेक्षांही नवीन प्रेरणा आमच्या मनांत करितो. या प्रेरणा राजकीय विचार आमच्या मनांत जागृत करितात आणि त्या त्या विचाराच्या स्वीकरणानें तद्वत, कृती करून दाखविण्याचा आमच्या मनानें पक्का संकल्प होतो.

---

नामदार दादाभाई स्वतां एका समारंभाच्या वेळीं ह्मणाले कीं माझ्या स्वप्नांतल्या मनोराज्यांतही हा सन्मान व आदरसत्कार लोकांनीं केला नसतां; तो अपूर्व कल्पनेच्या बाहेरचा चमत्कार मी आज डोळ्यांनीं पाहत आहे. खरोखरच राज्यकर्त्यांचा व राजपुत्रांचाही मानपान लोकदृष्टीनें आज पर्यंत एवढा मोठा झाला नाहीं. वैभवदर्शक अनेक समारंभ झाले असतील परंतु लोकप्रेमसूचक असे समारंभ हेच. आनंदाच्या लहरी मध्यें व जनसमूहाच्या प्रेमामध्यें दादाभाईचें मन आंदोलना प्रमाणें मागें पुढें होऊं लागलें तेव्हां ते आनंदाश्रु ढाळीत जमलेल्या लोकांस म्हणाले कीं मला आपलेपणा सोडून आपल्यांत मिसळूं द्या, एका इंडियनास पार्लमेंटांत सभासद निवडून इंग्लिश लोकांनीं—फिन्सबरीच्या लोकांनीं—जी उदारबुद्धी दाखविली त्या बद्दल आपण त्यांचे आभार मानूं आणि ब्रिटिश न्यायबुद्धि, समतोल स्वभाव आणि समसमान प्रजाधिकारदान या गोष्टी लक्ष्यांत आणून आपण त्या राजकर्त्यां पाशीं स्वदेशोन्नती साठीं एकदिलानें अर्ज करूं. शेट दादाभाई असें ही बोलले कीं पार्लमेंटात एक नेटीव सभासद निवडला गेला हीच मोठी गोष्ट आपल्या आनंदास कारण आहे. डेप्टफर्ड व हाल्बर्न या दोन भागांतील लिबरल पक्षाच्या लोकांनीं माझी व माझे मित्र लाल मोहन घोस यांची निवडणुकीच्या वेळीं मोठी तरफदारी केली, आमच्या साठीं पुरुषच काय पण मृत्युंगत इव्हान्स बेल सारख्या स्त्रियाही आमच्या वतीनें निकरानें भांडल्या हें विसरता कामा नये. कैलासवासी ब्राईट, फासेट, ब्राडला आदिकरून कांहीं जणांनीं इंडिया साठीं तुमूल युद्ध केलें आणि पार्लमेंटचे दरवाजे मजसारख्या इंडियना साठीं खुले केले हें सर्व जन स्मरतच आहेत. त्यांच्या त्या अश्रांत, दीर्घकालीन, व जीवापाड खटपटी शिवाय पार्लमेंटांत इंडियनाचा शिरकाव होणें स्वप्नवतच होतें. इंडियाचें पाऊल राजकीय प्रकरणांत पुढें पडलें हें वास्तविक ब्रिटन देशासच भूषण आहे. इंडियन लोक राजकार्यक्षम आहेत हा तरी ब्रिटिश राज्याचाच प्रभाव होय. ब्रिटिश सरकारचा कीर्तिध्वज फडकत आहे म्हणूनच या देशाचा ज्ञानसूर्य उदयाचलावर नुकताच येत चालला आहे. सारांश ब्रिटिश राज्यानेंच या देशावर सोन्याचा दिवस उगवेल अशी बळकट आशा होती आणि तीच आशा सफळ होत चालली आहे.

---

नामदर दादाभाई यांचें बहुगुणाचें दिग्दर्शन करिते वेळीं ना. दोराबजी पदमजी पुण्याचे जाहिरसभेंत बोलले कीं दादाभाई युनिव्हरसिटीच्या परीक्षा देऊन विद्यासंपन्न झाले तेव्हां त्यांच्या अदृष्टपूर्व विद्वत्तें वरूनच त्यांस पाठशाळेमध्यें प्रोफेसर सरकारनें नेमिलें होतें. व्यापाराकडे त्यांचें लक्ष्य वेंधलें तेव्हां पासून व्यापारीमंडळांमध्यें सचोटी विषयीं त्यांचा अगोदर भरंवसा पटत असतो. सामाजिक सुधारणे मध्येंही दादाभाई अग्रेसर आहेत. त्यांनीं एक समाजिक विषयांवर व्याख्यानमाला काढिली होती आणि त्या मालेपासून अनेक हितकर गोष्टी घडल्या आहेत. राजकीय विषयांत तर ते विजयाच्या शिखरावर चढले आहेत. तेच सर्वांचे मुख्य गुरु अगर कुलदैवत बनले आहेत. प्रो. गोपाळ कृष्ण गोखले हे दादाभाईचे चारित्राची गुरुकिल्ली दाखविते वेळीं ह्मणाले कीं मनुष्यानें आपलें कर्तव्य बजवावें ह्मणजे तो यशस्वी होतो. सुमारें चाळीस वर्षां पूर्वीं दादाभाई हे विलायतेस गेले तेव्हां त्यांचा विचार सिव्हील सर्व्हिस परीक्षा इंग्लंड प्रमाणें इंडियांत होत जावी असा होता आणि तोच विचार त्यांच्या भगिरथ प्रयत्नां मुळें पार्लमेंटांतील ठरावाच्या रूपानें चाळीस वर्षां नंतर जगा समोर आला आहे. दादाभाईची कार्यनिष्ठा एकाग्रतेची, त्यांची वागणूक फार सरळ, आणि त्यांची नीति विमल व पापाशुद्ध अशी आहे. त्यांचें आयुष्य त्यांनीं देशकल्याणार्थ वेंचिलें आहे. त्याचा स्वदेशाभिमान, स्वार्थत्याग, व उज्वल कीर्ति हीं चिरकाल लोकांच्या दृष्टी समोर साक्षात उभीं राहतील आणि याच योगानें, इंडियन लोक आपला देश सर्वमान्य, व वैभवशाली करितील.

---

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 25, 1893

---

## 'IS LATRINE CESS A CONTRACT'?

Last week we published an abstract of the resolution passed by the Municipality at Amraoti, without expressing a word on it. This time, we first of all, want to discuss one main point involved in the resolution which appears in full in the Pramod Sindhu of Amraoti and the Vaidarbha of our town.

If Messrs Kholkute and Ghate wrote informal letters to the Committee, the Committee retaliated on them by treating them with marked contempt. The Vaidarbha however seems to think that it has a brief from the members or some of the members, and in an article looking like an inspired one, while preaching a sermon that abusing was bad indulged in abusing the two gentlemen in measured and unmeasured words. But this is their own business and they may take care of themselves. But the resolution itself when sent to us for publication demands our opinion and we propose giving it.

What looks strange to a stranger however is that neither the Committee, nor the Vaidarbha thought it proper to prove, that, the stopping of clearing the latrines by a stroke of pen, in the face of the sure effect of such a measure, viz unbearable accumulation of filth in the town and the consequent danger to the health of its inhabitants, is a rational measure to adopt. The Committee has based its authority on one resolution passed by itself and the Vaidarbha says that that has been the practice even here for several years. The real question at issue is not "What is" but whether "what is" is right.

The Committee begins its resolution by remarking:—"It is to be noted that the latrine cess is really not a tax but a payment for services rendered." That distinction seems to have come out of some legal heads and there are not a few of them on the Committee. The Committee appears to ignore a Statutary responsibility totally and reduces it only to a question of contract pure and simple of service and payment.

Now the question is if the idea of a contract is tenable on principle. We wish to examine this idea of contract on principles. The Municipality is a Corporation of the representatives of the peop'e and it is difficult for us to understand its entering into contracts with its electors. Is this possible? Can this be a legal idea?

Who makes the proposal and who accepts it? At what point does it become a contract? What are the terms of its performance? What are the ways of compelling performance?

In the resolution, the Committee has said that it issued notices "enjoining all persons &c." Now is this a proposal? Has anybody ever heard of a proposal in which the propposer enjoins something to the would-be acceptor?

Is the license granted, the document which contains the terms of the contract? If not what is it?

If it is a contract for service how does the Municipal Committee recover the arrears? The only way open to it is to file so many civil suits. Has the Municipality ever and always done so? If the Municipality tries to recover the arrears in any other way it will be simply a trespasser and liable as such On the the Committee's own showing any latrine owner may try the experiment.

If it is a Contract, it is a contract with each family and what authority the Committee has to withhold performance of service on [illegible] plea that one family using the privy has not entered into a contract with the Municipality? Has the Municipality not broken its contract with those with whom it has entered

into it? Can a party now to the so-called contract not sue the Municipality for breach of contract and ask for damages?

All this will prove to a demonstration that the idea of a Contract is in our opinion quite untenable. It is a purely statutary liability and the latrine cess is a tax and the way of recovering it is not stopping the clearance of latrines. The Municipality has failed to do its duty and an action in torts would be very interesting. One cannot persuade himself to believe that what the Committee has done has been done with the sanction or knowledge of it authorities who know the duties and liabilities of Municipalities too well and can well teach what they are to those that do not know them. From the very resolution before us, it seems, the affairs would have assumed a very serious aspect. It is but natural that they would have been so. It seems the Municipality is persisting in not clearing the latrines in the town and and there are people who are not paying yet. Filth must be accumulated in masses. There is already fever, we hear in that town and a bad type of fever too. If the type grows more serious or if cholera visits the town who will be responsible, the Committee, or its President, or the Commissioner, or the Resident?

We have shown that the idea of a contract is in our opinion untenable. It is now for the President and the higher authorities to see that the Municipality is brought to its sense of responsibility and taught to perform its duty more properly and not to be led away by wrong theories.

## MR. HUME'S GLORY.

[ Concluded from the last issue ]

Mr. Hume has now come to bid us good bye which means he will no more visit India. He is going to leave his young child which will have completed his 9th year next December to the kind care of his successor Mr. Brown. We have no doubt it is in safe hands. But the maxim Heaven helps those who help them selves must not be forgotten. Mr. Hume has done for us all he could. But there is a great deal more that has to be done by ourselves. Our national character is yet to be formed. That resoluteness of mind, that undaunted moral courage, that laborious perseverance which characterise the English nation are yet to be learnt. There are yet millions of people that scarcely know the legitimate end and aim of the Congress. Bands of pioneers are yet to be formed whose avowed object ought to be to teach true loyalty and patriotism and a spirit of enterprize is yet one of the great national wants. All this work has to be done by ourselves Mr. hume has given us the initiative and we must complete the rest Dear friends, you are all aware 'In memoriams" is the order of the day. Men who have done ordinary things in their consideration of their fat salaries or in consideration of profits alleged to be legimately deserved have been exalted to the ranks of Raosahebs and Raotahadoors. Men who have perhaps done an infintisimal of good service, have had monuments raised to their memory. Need I say then that you will not deny this ordinary hand to Mr. Hume who for you has suffered the venomous arrows of slander, who for you has stretched his means to the utmost, who for you has subordinated all sorrows and affliction to the path of virtue and benevolence, who for you has fought through thick and thin for the regeneration of your country, who took you by the hand and led you to the threshhold of your gracious sovereign that she might pity your woes and alleviate your miseries!

But this alone my friends, would be no sufficient recognition of his valuable services and if this were the only final reward of his labour, I assure you he will go ill satisfied with it. A monument is not always the surest indication of a man's goodness. It not unfrequently is suggestive of his terrific power. In India especially one need not boast of a statue being raised to his memory. While we have built temples to enshrine Ram and Krishna, we have also temples dedicated to Cholera and the Small pox though we shun the latter and love the former Statues wear away by time. The record of official service is perforated through and through by worms and the so-called monuments are, strange to say, forgotten by the succeeding generation. Mr. Hume will not be content even if you honor him with a golden statue and rest there. I tell you what will delight him most. If you be faithful followers of what he has taught you, if he finds a counter part of his own self in every Indian mind, even if he finds one hundred men out of a population of 28 crores who are ready to work even with half the self sacrifice that he has himself undergone, if the Congress grows into a compact National Assembly whose deliberations will be help meet to our rulers towards a successful and peaceful administration of our country he will consider his labours amply requited, he will consider that to be a permanent monument raised to his memory: He will then have the contentment of having lived in the service of mankind and to the glory of his Maker.

Now you say Mr. Hume you are going. Well you may, but India will not go from you. Your heart will always be in our midst. Your body we may not see, but your spirit will always be with us. You see our hearts rising to their brims send forth tears of love and gratitude. We love you mightily. Long may be your life! Great be your peace and comfort! And India and England knit togther in love and harmony be the Psalm of your afterlife!

With these few words I resume my seat. I earnestly pray to you that some one of you mightier than myself in the power of speech and expression should rise and shake his thoughts of love and gratitude with such power and force as would make these trees and walls give evidence of the fulness of our hearts and if my wishes are not fulfilled though none should use to make up this defect of mine I should ask Mr. Hume by his intellectual penetration to probe into our hearts and test, our sincerity. Thrice welcome you are Mr. Hume to the heart of our hearts and your memory will always run parallel to the rise and prosperity of this nation.

## वऱ्हाड.

अलिशान रेसिडेंट साहेब बाहादूर हैद्राबाद यांची स्वारी ता. १० जानेवारी सन १८९४ रोजी आकोळे येथें दाखल होईल. त्यांचे स्वागता करितां जिल्हा बोर्डाचे व म्युनासिपाल कमेटीचे सर्व मेंबरांस पाचारण करण्यांत आलें आहे. दरबार व मानपत्र वगैरेचे समारंभ न करण्याविषयीं मे. क्रौडन साहेब यांणीं अगाऊ सुचविलें आहे.

क्लार्क आफ् कोर्ट व दि० क्लार्क आफ कोर्टच्या महकम्यांत बरेच फेरफार होऊन खालीं लिहिल्या प्रमाणे कांहीं नवीनही जागा झाल्या आहेत:—

कमिशनर व जुडिशियल कमिशनर यांचे क्लार्क आफ् कोर्टच्या जागा रुपये २००; सेशन जडज्य व उमरावती व आकोला डिपुटी कमि. यांचे क्लार्क आफ कोर्ट १५०; वाशीम, इलिचपूर, यवतमाळ व बुलढाणा येथील क्लार्कांच्या जागा दरमहा १२५; व डे० क्लार्क आफ् कोर्टच्या ९ जागा प्रत्येक ७० रुपयाची. व उमरावती, बडनेरा, आकोला, खामगांव व तेल्हारे स्मालकाज कोर्टाच्या क्लार्क आफ् कोर्टचे जागचा पगार १०० रुपये. येणें प्रमाणें फेरफार झाले आहेत.

रा. रा. गणपतराव दाढिगांवकर हे आपल्या वाशीम येथील क्लार्क आफ् कोर्टचे जागीं रजेवरून परत आल्यामुळें रा. रा. नारायण राघवेंद्र हे येथील स्मालकाज कोर्टचे क्लार्कीचे जागीं परत आले व रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री हे आपल्या जुडिशियल कमिशनरचे डे० क्लार्क आफ् कोर्टचे जागीं परत रुजूं होतील.

के० चिंतामण मोरेश्वर आपटे यांच्या रजिस्टेशन खात्यातील इनस्पेक्टरच्या जागीं रा. रा. व्यंकटराव रंगराव देशपांडे यांस नेमिलें. कर्नल लेन साहेबांच्या नेमणुका अशाच नेहमीं योग्य व स्तुत्य असतात.

यंदाचे युनिव्हरसिटी मॅट्रिक्युलेशन परिक्षेंत ३०६७ विद्यार्थ्यां पैकी ६४१ पसार झाले. त्यांतील वऱ्हाडांतील विद्यार्थ्यांची नांवें स्कूल वारीनें येणें प्रमाणें:—

आकोला हायस्कूल

( १० पैकीं ८ )

रामचंद्र पुरुषोत्तम देशमुख; वामन वासुदेव थत्ते; सदाशिव वासुदेव सोमण; दामोदर नारायण मोहोळकर; श्रीधर रामकृष्ण साळवेकर; बाळकृष्ण गोविंद बोधनकर; सुंदर गुलाबचंद अगरवाल; आणि बुलाखी किसन टापर;

उमरावती हायस्कूल.

( १८ पैकीं ९ )

दामोदर व्यंकटेश केतकर. लक्ष्मण. गणेश वाईकर. नारायण रघुनाथ भिडे. गोविंद गोपाळ हवालदार. मुरलीधर श्रीनिवास हवालदार. देवराव रंभाजी देशमुख. वासुदेव लक्ष्मण चिपळोणकर. धांगो यादव नरखेडें आणि शेख वाहिद.

खासगी

व्यंकटेश बाळकृष्ण देशपांडे

मुंबई युनिव्हरसिटीच्या बी. ए. परीक्षेस २८३ विद्यार्थी बसले होते त्या पैकीं १८३ पसार झाले. पास झालेल्या गृहस्था मध्यें खालील आठजण वऱ्हाडांतील आहेत: —

सेकंड क्लास—भास्कर वामन जोशी, रामचंद्र विष्णु महाजनी ( 'भाऊ दाजी' प्राइझमन ) आणि खुशाल नारायण पांगरकर,

वर्ग ३ —मोरो भिकाजी आगाशे, गणेश रामचंद्र दामले, कृष्णाजी गोपाळ देशपांडे, दत्तात्रय विठ्ठल सरंजामे, आणि, श्रीधर परशराम सोमण.

मि. रुस्तुमजी फरदुनजी असि. कमिशनर मलकापूर यांस एक महिन्यांची हक्काची रजा आज तारखे पासून मिळाली आहे.

नोटीस.

मे. नुरमहमद वल्लद अलीमहमद रहाणार ताजनापेठ अकोले यांसः—

खाली सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं ताजनापेठ येथील मोमिन पुऱ्यांतील मसजिदीची व्यवस्था ठेवण्या करितां ह्मणजे येईल तो पैसा घेऊन लागणारा खर्च करावा व हिशेब ठेवावा व शिलक ठेवावी या करितां सर्व पंचाचे तर्फे वहिवाटदार नेमिलें होतें. आपण सदहू पैशाचा हिशेब आम्ही मागितला तेव्हां बरोबर रीतीनें देऊं शकला नाहीं. वही मात्र आमचे स्वाधीन केली. या वहीप्रमाणेंच आपल्याकडे रुपये निघत आहेत. ते रुपये देण्याविषयीं बहुतवेळां म्हटेंल असतां रुपये देत नाहीं. व हिशेबाची पुष्कळ मानगड दाखवितां. हल्लीं या नोटिशीनें तुह्मांस असें कळविलें जातें कीं ही नोटीस पावल्या पासून चार दिवसांचे आंत, योग्य हिशोब देऊन आपले जवळ निघत असलेली शिलक बाकी आम्हांस आणून द्यावी. तसें आपण न केल्यास कोर्टमार्फत दाद मागणें भाग पडेल. तसा प्रसंग येऊं नये व घरांत निकाल व्हावा म्हणून ही नोटीस तुम्हांस दिली आहे. कळावें तारीख २४–१२–९३ इ०

( सही )

मोमिन पुऱ्यांतील लोकांतर्फे सही—
शेखचांद वल्लद जरूर महमद
मुल्ला याची निशाणी.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करीता येण्या साठी सरर्टािफकीट मिळावें म्हणुन त्यांनें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा आक्ट ७
कलम ६ प्रमाणें.

दि. कि. क्ला. १९ मि. नंबर २०/१८९३

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— बजी
मर्द भिवसन अलोकार
राहणार कापुसतळणी
ता० दर्यापूर जि. एलिचपूर यांस मयत.

भिवसन बापाचें नांव सोनाजी माळी राहणार कापुसतळणी ता. दर्यापूर जि. एलिचपूर याचें कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटिफिकीट मिळावे म्हणून सदहू अर्जदार याणे अर्ज केला आहे त्याज करिता सदहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणुन ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वार मिळण्यांत येत आहे कीं त्याणी तारीख ६ माहे जानेवारी सन १८९४ इ० रोजी सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हका विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. आज तारीख १२ माहे १२ सन १८९३ इ०

W. Hastings
Deputy Commissioner
Ellichpoor District
जज्ज.

## वर्तमानसार

काबुलास गेलेल्या डुरंड मिशनाशीं अमिराचें बोलणें होऊन उभयतांची जी सरहद्द कायम झाली त्या प्रमाणें अमिरानें सरहद्दीवरच्या लोकांस ताकीदही देवून टाकली. तुह्मी, आमच्या हद्दींत नमून तुमचा प्रांत इंग्रजी हद्दींत दाखल झाला आहे असें हीं कळविलें असें सांगतात यावरून आतां सरहद्दीवर चांगली शांतता होईल असें दिसतें.

नेमणूक झाल्या प्रमाणें मि. प्रमाद चरण बानर्जी हे अलाहाबाद हायकोर्ट जज्याच्या जागीं कामकीच रुजूही झाले.

बाहेरून हिंदुस्थानांत जी चांदी येईल त्याच्यावर आयात जकात बसविण्याचा विचार चालू झाला आहे.

फ्रेंच रशियन यांच्या बरोबरीचें आपलें आरमार करावयाचें असल्यास येत्या चार वर्षांत आपणांस त्या कामाकरतां १,२,००,००० पौंड खर्च केले पाहिजेत असें विलायतच्या कांहीं लोकांचें ह्मणणें आहे.

तोफखान्याच्या कामाकरितां ठेवलेल्या शिकणाऊ लोकांत डोवर येथें मोठा दंगा झाला व त्यांणीं लश्करी बराकींतील सामान सुमानाची फोड तोड करून कांहीं सरकारी इमारतींत लूटही केली. शहरांतले लोक अगदीं भिऊन दारें बंद करून आपापल्या घरांत कोंडून घेऊन होते. शेवटीं मिलिटरी व पोलीस यांणीं लोकांस कैद करून दंग्याची शांतता केली. या दंगेखोरांस दाहा दाहा वर्षें शिक्षा होतील काय! मुंबईच्या दंगेखोरांस दाहा दाहा वर्षें तुरुंगांत पाठविणाऱ्या वेळी साहेबांनीं याचा विचार करावा हें चांगलें आहे.

इटालीच्या राज्यांत बहुकडे सुधारक पक्षाच्या लोकांनीं मोठाले दंगे चालविले आहेत, आगी लावण्याचा क्रमही चालू आहे. एका ठिकाणच्या दंगेखोरांनीं तेथील गावकारकुनास व त्याच्या बायकोस ठार करून त्यांचीं शिरें गावभर फिरविलीं. लष्करी लोकास आणून हत्यार सुरू केलें व दंगेखोरांपैकीं कित्यकांस ठार करून कित्येकांस घायाळही केलें.

निझामाच्या हैदराबादच्या इंग्रज रेसिडेन्टांच्या हिमायतीनें सुरवार जंग नावाचा एक माणूस हैदराबादेस सर्वाधिकारी झाला, रेसिडेन्टापुढें ९ महिने चाललेल्या एका दाव्यांत सुरवार जंग हा एक पक्षकार असून रेसिडेन्टनानें उघडपणानें त्याच्या तर्फेनें पक्षपात केला असा गवगवा आहे; सुरवारंजग याणें मुख्य प्रधानापासून धमकी देवून १,००,००० रुपये उपटले; मुख्यप्रधानाच्या मुख्य सल्लागारांस हद्दपार केलें व त्यांतील एकास तरी रेसिडेन्टाच्या उघड हुकमानें केलें व ती रकम खाणारा सुरवाद जंग यांस दोषमुक्त केलें; दिवाण व त्याचे सल्लागार यांस चाकरींतून काढून टाकण्याचा रेसिडेन्टानें यत्न केला हें तुह्मास कळलें आहे काय व तें दुरुस्त करण्याची हिंदुस्थासरकारास सूचना केली आहे काय असें मि. के यांणी अंडर सेक्रेटरी यांस विचारलें व त्याच्या उत्तरांत असें सांगण्यांत आलें कीं, तुमचे हे प्रश्न ज्या बाबतींत आहेत त्या बाबतींत हिंदुस्थान सरकार व स्टेट सेक्रेटरी यांच्या दरम्यान पत्रव्यवहार चालू आहे, त्या संबंधाचे हिंदुस्थानसरकारा कडून जे कांहीं कागद आले आहेत ते तुमच्या प्रश्नांच्या विरुद्ध आहेत, पण हिंदुस्थानसरकाराकडून आणखीं जी कांहीं माहिती यावयाची आहे ती येण्यापूर्वीं तुमच्या प्रश्नास खुलासेवार जबाब देतां येत नाहीं.

ठा० अ०

राज्य विध्वंसी लोकांनीं फ्रेंच पार्लमेंटांत केलेला भयंकर प्रकार— स्पेन, फ्रान्स, जर्मनी, इटली वगैरे यूरोपांतील कित्येक देशांत राज्य विध्वंसकमताच्या ( अनार्किस्ट ) लोकांनीं फारच अनर्थ चालविला आहे. तारीख ९ रोजीं फ्रेंच पार्लमेंट गच्च भरून कामकाज चाललें असतां एका मार्चेल नांवाच्या राज्यसत्ता विध्वंसी मनुष्यानें एक कलपी बाण पार्लमेंटांत सोडला. बाच्या आंत खिळे काच्या, चाकू असले पदार्थ भरले होते तो बाण वर उडाला, पण त्यांतले खिळे वगैरे पदार्थ चोहोंकडे उडून सुमारें ८० मनुष्यांस लहान मोठी इजा झाली आहे. ह्या दुष्ट लोकांच्या बंदोबस्तासाठीं सभागृहा भोवतीं व आंत पोलिसचे जय्यत पहारे, गुप्त पोलिसची चोहोंकडे व्यवस्था असतां हा दुष्ट सभागृहांत गेला कसा, त्यानें तो बाण उडविला कसा वगैरे गोष्टी बद्दल राहून राहून खरोखर नवल वाटतें.

शु० सू०

श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड हे तूर्त प्रकृतीच्या संबंधानेंच विलायतेस जाण्यासाठीं गेल्या शनवारच्या आगबोटीनें रवाना झाले. बरोबर राणी साहेब असून आणखी कांहीं थोडे निवडक लोक आहेत. व ते जात आहेत असें बाहेर आलें आहे. व ते आणखी दोन वर्षांच्या मुदतीनें तिकडे गेले आहेत असें कळतें. ह्या खेपेस हे महाराज राज्यभाराचें ओझें आपल्यावर ठेवून जात नसून राज्यकारभार हाकाण्यास एक काउन्सिल नेमीत आहेत. ह्या काउन्सिलानें सर्व कारभार स्वतंत्र रीतीनें चालवावा असें ठरलें असल्याचें कळतें.

पु० वै०

अनार्कीस्ट लोकांबद्दल युरोपांतील सर्व राष्ट्राचा कायदे करण्याचा विचार ठरला आहे.

सर मार्टिमर डूरंड हे काबूल मिशनचा रिपोर्ट तयार करण्यांत गुंतले आहेत.

मद्रास व मुंबई येथील निराजराळीं लष्करी सेक्रेटरियट बंद केलीं ह्मणजे १ लक्ष रुपयाचा खर्च कमी होईल.

पामिर संबंधानें पत्रव्यवहार करण्या करितां चीनचा एक वकील सेंटपिटर्सबर्ग येथें गेला आहे.

नाताळची छुटी आटपल्या बरोबर पार्लमेंटच्या कामास पुनः सुरुवात होईल.

ऐंटवर्प येथें भयंकर आग लागून धान्याचा सांठा जळून गेला.

सर्व स्थानिक सरकारांकडून गोरक्षणाबद्दल झालेल्या दंग्याबद्दल रिपोर्ट हिंदुस्थानसरकाराकडे जाताहेत.

सु. प.

सन १८८४ चे फैसल्यांतील ठरावावरून असें सिद्ध होत आहे कीं, एकत्र कुंटुबांत कर्तेपणाच्या नात्यानें लोकांस सर्व प्रकारचा अधिकार प्राप्त होतो पण तो मेल्यावर सर्व कुटुंबांतील माणसें पक्षकार केल्याशिवाय दावा चालणार नाहीं.

(इंडियन ला० रि० ४ मुंबई पान ६२८ ) यांत हायकोर्टानें ठरविलें कीं, शेतकीचा जो हंगाम आहे त्या एका हंगामाचा काळ भरेपर्यंत जो मनुष्य शेतकीवर निर्वाह करील तो शेतकरी समजावा.

म. मि.

सुपे तालुक्यांत जुलाब उलटीचें झाड ह्मणून एक आहे. बुडाची साल उगाळून पोटांत घेतल्यास उलटी होते, व शेंड्यावरील साल घेतल्यास जुलाब होतात. या झाडाचीं फळें उगाळून घेतल्यास कफाचा नाश होतो ह्मणतात.

सुचिन्ह — बंगाल इलाख्याचे हल्लींचे लेफ्ट. गव्हरनर यांची इच्छा गोरक्षण सभा सरकारच्या मदतीनें चालाव्यात अशी असून, गोवध होतील तितके कमी होण्याचा प्रयत्न त्यांनीं चालविला आहे. युरोपियन सोल्जरांस रोज गोमांस दिलें नाहीं तर त्यापासून काय होईल याचा अनुभव पहाण्याकरितां त्यांनीं दिनापूरच्या छावणींतील सोल्जरांस आठवड्यांतून चार दिवस गोमांस देण्याचें बंद करविलें आहे.

शिकंदराबाद येथें २,८४,००० रुपये खर्चून पाणी आणण्यास सरकारची परवानगी मिळाली.

ला. आफिसरांचा सर्व वेळ सरकारी नोकरींत जात नसल्यामुळें त्यांस ए. का. पेन्शन मिळूं नये असा ठराव करण्यांत आला आहे.

कर— सरकारच्या मनांत आगकाड्यांच्या पेट्यावर प्रथम कर बसवून पुढें केरोसिन आईलवर कर बसवावा असें आहे पण ह्या व्यवस्थेनें इंग्लंडचें नुकसान होईल याची वाट काय?

क. त.

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या जाहिरातीनें खालीं सही करणार असें कळवितो कीं बटवडी गांव पाहिल्यांदा ज्या ठिकाणीं होता तो नदीच्या पाण्यामुळें दुसरीकडे बसविला. व गांव बसविण्यास सरकारांतून जी जागा मिळाली त्यांतील जागा निम्मी मजला मिळाली. त्या निम्मे जागेतील मी आपले भाउबंदास तिघाजणांस तीन घरें बांधण्यापुरती जागा रुपये घेऊन दिली. घराजवळील रिकामी जागा कोणासही दिली नाहीं. आतां ज्याची ज्याची तीन घरे आहेत त्यापैकीं गणपती वा॥ येकोजी हा रिकामी जागा घराभवतालची कोणास खरेदी, किंवा गहाण, किंवा कर्ज देऊन घेइल तर त्याबद्दलची सर्व प्रकारची नफा नुकसानीची जबाबदारी ज्याची त्याच्यावर आहे. तीन घाराखेरीज जितकी जागा आहे ती सर्व माझी आहे. ह्मणून कोणीही ती माझे संमती शिवाय घेऊन नये ह्मणून दिली जाहिरात ता० २०।१२।९३ इ०

( सही ) •

सहीची निशाणी बखर फकीरा वा॥ पीर्थमजी पाटील राहणार बटवडी ता० बाळापूर याच्या हातची असे.

नोटीस

देवकी मर्द विठु राहणार अडगांव प्रगणे अडगांव अज्ञान हिचे पालन करणार गुणी मर्द केसोजी राहणार अडगांव. यास नोटीस देणार पुंजाजी वल्लद रामजी माळी गिरे राहणार सिरसोली तालुके अकोट नोटिशीनें कळवितों कीं, एक वाडेलोपार्जित विठुजी वल्लद रामजी या खात्याचें शेत तुझे नांवानीं खातें सरकारांतून झालें आहे. सर्वे नंबर ७६ पैकीं मौजे सिरसोली येथील हें शेत तूं कोणास गहाण किंवा खरेदी अगर कर्ज काढून त्याच्या बद्दल तारण वगैरे असें कांहीं करू नये. केल्यास शेताचें खातें तुझें नांवचें आहे तें आह्मी आमचे नांवानीं सरकारांतून करून घेऊं. तू आमचे जवळ येऊन चाली रीतीनें राहा. ह्मणजे तुझे राहणें पर्यंत आह्मी तुजला अन्न वस्त्र देत आहों. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २० माहे दिसेंबर सन १८९३ इ०

( सही )

सहीची निशाणी— पुंजाजी वल्लद रामजी माळी गिरे राहणार सिरसोली याचे हातचा बखर असे. दस्तुर पांडुरंग एकोबा गडकरी राहणार सिरसोली.

नोटीस.

मी गणपती वल्लद येकोजी राउत कुणबी राहाणार बटवाडी खुर्द तालुके बाळापूर यास नोटीस देणार फकीरा वल्लद पीरथमजी पाटील राहाणार बटवाडी खुर्द. नोटिसीनें असें कळवितो कीं बटवाडी हे गांव अजमासें बारा वर्षां पूर्वीं मणनदीच्या काठी होते व नदीस पाणी येऊन दर वर्षीं गावास पाण्याचा वेढा पडून भीती उत्पन्न होत असे. यास करीता रामजी वल्लद राघोजी पाटील कारभारी हे व आम्ही व इतर गावकरी मिळून सरकारास त्यां वेळी अर्ज देऊन सदहू बटवाडी गांव जेथें आहे तेथून उठवुन दुसरी कडे बसावा म्हणून मागणी केली त्या प्रमाणे सरकारानी गाव दुसरीकडे वसाविण्यास निराळी जागा दिली. व त्या जागेत हल्ली गांव वसविला आहे. जी जागा सरकारानी गाव वसविण्यास दिली त्यातील निमी जागा मजला व निमी जागा गाव वसविण्यास लोकास दिली. निमी जागा मजला सरकारानी जी दिली त्यांत तीन घरें बांधण्या पुरती जागा पैसे घेऊन मी भाऊबंदास दिली घरा शिवाय खुली जागा काहीं दिली नाहीं येणे प्रमाणे हकीकत आहे. आतां सदर्हू गणपती वल्लद येकोजी हा घरा पुढील रिकामी जागा विकणार आहे असें कळतें आता सदर्हू तीन घरा शिवाय जितकी रिकामी जागा आहे ती सर्व माझी आहे. याजकरितां ती कोणीहि विकू नये. विकल्यास त्याजबद्दल सर्व तऱ्हेची जी माझी नुकसान वगैरे होईल ती भरून घेतली जाईल. म्हणुन दिली नोटीस तारीख २०।१२।९३ इ.

( सही )

सहीची निशाणी बखर फकीरा वल्लद पिरथमजी पाटील राहणार वटवाडी तालुके बाळापूर याच्या हातची असें.

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० रुद्रमाधवराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.